काव्य
५०४

श्री सरस्वती वाङ्मय ग्रंथमाला

गेल्या दहा वर्षांत मेळ्यांत म्हटलेल्या निवडक पद्यांचा संग्रह

अर्थात्

## श्री. रामचंद्र वासुदेव दाते उर्फ

# रामशाहीर यांची कविता.

पुष्प १ लें.

३८६१

संपादक

[illegible]ंत गोपाळ जोशी.

REFBK-0003961

किंमत ग्लेज कागद १ रुपाया. ] १९२९ [ किंमत रफ कागद १२ आणे.

# प्रस्तावना.

दरसालच्या श्रीगणेशोत्सवाच्या वेळीं येथील प्रसिध्द "रामशाहीर" यांनीं निरनिराळ्या मेळ्यांना जीं पद्यें पुरविलीं, तीं व आणखी कांहीं स्वतंत्र पद्यें एकत्र करून या पुस्तक रूपानें छापण्यांत आलेलीं आहेत. सदर पद्यांपैकीं बरीचशीं पद्यें, निदान त्यांचीं कांहीं तरी कडवीं, आबालवृद्धांच्या तोंडीं बसलेलीं आहेत, यावरून तीं किती सरस वठलेलीं आहेत, हें स्पष्ट सांगावयास नकोच. रामशाहीरांच्या कवितेंत उज्वल प्रतिभा तर पदोपदीं दृग्गोचर होतेच, पण त्यांतल्यात्यांत तिजमधून रसरसणारी जळजळीत देशभक्तीही अनुभवास येते ! इतर कवी व रामशाहीर यांच्या कवितेंतील ठळक फरक हाच कीं, पहिले जर प्रेमानें वेडावलेले दिसतात, तर दुसरे देशाभिमानानें स्वतः स्फुरलेले व दुसऱ्यांस स्फुरविणारे असे दिसतात ! रामशाहीरांची कविता ऐक्य, समता, बंधुप्रीति, गतकालाबद्दलचा जाज्वल्य अभिमान, स्वातंत्र्याविषयींची जिव्हाळ्याची उत्कंठता इत्यादि नानाविध तेजस्वी भावनांनीं नटलेली आहे ! बहुतेक सर्व प्रचलित राष्ट्रीय प्रश्नासंबंधानें त्यांनीं पद्यें केलेलीं असून, त्यामध्यें आपले विचार त्यांनीं अत्यंत कुशलतेनें गोंविलेले आहेत, व ते तरुणतरुणींना मार्गदर्शक असेच आहेत. कवितेचा आत्मा जो कीं, मनुष्याच्या ठायीं उत्कृष्ट भावना उद्दीपित करून त्या स्थिर व दृढ करावयाच्या, व त्याची सद्गुणांकडे प्रवृत्ति व दुर्गुणांपासून निवृत्ति घडवून आणावयाची, तो रामशाहीरांच्या कवितेंत बऱ्याच यशस्वीपणानें प्रतिबिंबित झालेला आहे ! जगामध्यें प्रेम या एका भावनेशिवाय दुसरी भावना जणूं काय अस्तित्वांतच नाहीं अशा भ्रामक समजुतीनें बऱ्याचशा कवींच्या कवितेंतून प्रेमाचा बाष्कळ फापड पसारा जो आढळून येतो, व ज्यामुळें 'परमेश्वरा, यांतून शक्य तितक्या लवकर आमच्या तरुण पिढीला सोडीव,' असे उद्गार साहजिकपणें कोणाच्याही तोंडून निघतात, असला प्रकार रामशाहीरांच्या

प्रकाशक—
विश्वनाथ गणेश ताम्हणकर,
मॅनेजिंग डायरेक्टर,
महाराष्ट्र पब्लिशींग हाऊस लिमिटेड, पुणें.

[ सर्व हक्क प्रकाशकांचे स्वाधीन. ]

मुद्रक—
लक्ष्मणराव भाऊराव कोकाटे,
हनुमान प्रेस, ३०० सदाशिव
पेठ, पुणें शहर.

# प्रस्तावना.

दरसालच्या श्रीगणेशोत्सवाच्या वेळीं येथील प्रसिध्द " रामशाहीर " यांनीं निरनिराळ्या मेळ्यांना जीं पद्यें पुरविलीं, तीं व आणखी कांहीं स्वतंत्र पद्यें एकत्र करून या पुस्तक रूपानें छापण्यांत आलेलीं आहेत. सदर पद्यांपैकीं बरीचशीं पद्यें, निदान त्यांचीं कांहीं तरी कडवीं, आबालवृद्धांच्या तोंडीं बसलेलीं आहेत, यावरून तीं किती सरस वठलेलीं आहेत, हें स्पष्ट सांगावयास नकोच. रामशाहीरांच्या कवितेंत उज्वल प्रतिभा तर पदोपदीं दृग्गोचर होतेच, पण त्यांतल्यात्यांत तिजमधून रसरसणारी जळजळीत देशभक्तीही अनुभवास येते ! इतर कवी व रामशाहीर यांच्या कवितेंतील ठळक फरक हाच कीं, पहिले जर प्रेमानें वेडावलेले दिसतात, तर दुसरे देशाभिमानानें स्वतः स्फुरलेले व दुसऱ्यांस स्फुरविणारे असे दिसतात ! रामशाहीरांची कविता ऐक्य, समता, बंधुप्रीति, गतकालाबद्दलचा जाज्वल्य अभिमान, स्वातंत्र्याविषयींची जिव्हाळ्याची उत्कंठता इत्यादि नानाविध तेजस्वी भावनांनीं नटलेली आहे ! बहुतेक सर्व प्रचलित राष्ट्रीय प्रश्नासंबंधानें त्यांनीं पद्यें केलेलीं असून, त्यामध्यें आपले विचार त्यांनीं अत्यंत कुशलतेनें गोंविलेले आहेत, व ते तरुणतरुणींना मार्गदर्शक असेच आहेत. कवितेचा आत्मा जो कीं, मनुष्याच्या ठायीं उत्कृष्ट भावना उद्दीपित करून त्या स्थिर व दृढ करावयाच्या, व त्याची सद्गुणांकडे प्रवृत्ति व दुर्गुणांपासून निवृत्ति घडवून आणावयाची, तो रामशाहीरांच्या कवितेंत बऱ्याच यशस्वीपणानें प्रतिबिंबित झालेला आहे ! जगामध्यें प्रेम या एका भावनेशिवाय दुसरीं भावना जणूं काय अस्तित्वांतच नाहीं अशा भ्रामक समजुतीनें बऱ्याचशा कवींच्या कवितेंतून प्रेमाचा बाष्कळ फापड पसारा जो आढळून येतो, व ज्यामुळें 'परमेश्वरा, यांतून शक्य तितक्या लवकर आमच्या तरुण पिढीला सोडीव,' असे उद्गार साहजिकपणें कोणाच्याही तोंडून निघतात, असला प्रकार रामशाहीरांच्या

कवितेंत मुळींच दिसून येत नाहीं. रामशाहीरांच्या प्रतिभेचें ध्येय एकच, व तें स्वातंत्र्यप्राप्ति; व तें संपादन करण्याचा मार्गही एकच, व तो म्हणजे राष्ट्रीय सद्गुणांची जोपासना ! मग ही करतांना त्यांनीं महाराष्ट्राच्या इतिहासाची कांस धरलेली असो, नाहीं तर प्रचलित विषयांचा आश्रय केलेला असो ! अशा प्रकारची ही स्फूर्तिकारक कविता प्रत्येक तरुणतरुणीच्या हातांत पडणें अत्यंत इष्ट व अवश्यक आहे.

पुणें, ता. ३ सप्टेंबर १९२९.

ल. व. भोपटकर
एम्. ए. एल् एल् बी.

सं. काव्य ८०८

३९६१

# ' रामशाहीर यांच्या कवितेचा अल्पपरिचय. '

साधी भोळी काव्यवैखरी राम शाहिराची
आहे जागीं वाट पाहते स्वराज्य उदयाची ॥ (पृ. ३६)
सह्याद्रीचे तुम्ही लाडके जिवंत शाहीर
निसर्गस्फूर्ती वारूवरती चढवा खोगीर ॥ (पृ. ३०)
टिळक श्रीगुरुचा चेला रामशाहीर
लोकशाहिची नौबद वडवित राहणार ॥ (पृ. १२८)
कवि रामाचा थाट शाहिरी स्फूर्ती तडाखा खंबीर
यथायोग्य जें तेंच वदाया कधीं न घे तो माघार ॥ (पृ. १०३)
कवि रामाचा थाट शाहिरी भिगार नाहीं रूढीला
का न तडाखे लगावील तो समाज वहकुनि जर गेला? ॥ (पृ. १११)

रामशाहीरांची कविता महाराष्ट्रापुढें मांडावयास फारशी प्रस्तावना नको, कारण पुण्याच्या गणेशोत्सवांतील मेळ्यांकरवीं त्यांचीं अनेक कवनें समाजामध्यें गाइलीं गेलीं असून तीं सरस ठरलीं आहेत. आणि बाहेरगांवींहि पुष्कळ मेळे पुण्यांत चांगलीं ठरलेलीं हीं पदें निवडून घेऊन म्हणत असतातच. गणेशोत्सव जवळ आला कीं, मेळेवाल्या लोकांची रामशाहीरांकडे ये—जा सुरू होते व अशा अनेक मेळ्यांना रामशाहीर हे आजपर्यंत हौसेनें पदें पुरवीत आले आहेत. या पुस्तकांत पदांखाली घातलेलीं मेळ्यांचीं निरनिराळीं नांवें वाचलीं असतां ही गोष्ट कोणासही दिसून येईल. त्यांत मावळी मेळ्यासाठीं मावळी भाषेतहि त्यांनीं पदें करून दिलीं असून तींही या पुस्तकांत छापलेलीं आढळतील. पण रामशाहीर हे मेळ्यांची मागणी आली म्हणजे मागणी-पुरवठ्याच्या अर्थशास्त्रीय तत्वाप्रमाणें तांतडीनें पदें करून देण्यापुरतेच केवळ सांगकामे कवी नाहींत. याच पुस्तकांतील 'पेशव्यांचा शनिवार वाडा,' नवरदेवांना शेलापागोटें, विलायती वाटाणा, व ' हें तो स्वराज्यप्राप्तीचें साधन ' हीं कवनें मेळ्यांसाठीं केलेलीं नसून कवीनें आपल्या ऐतिहासिक, सामाजिक व राजकीय मनोभावना प्रगट करण्यासाठींच तीं स्वतंत्रपणें लिहिलेलीं आहेत.

राम कवीच्या कवितेचें वैशिष्ट्य वर उद्धृत केलेल्या त्यांच्याच चार पांच

कडव्यांवरून दिसून येईल. लोकशाहीची नौबद वडविणारा हा शाहीर आहे. जनसमुदायाचें अंतःकरण ज्या गोष्टींनीं उचंबळतें व ज्या गोष्टींचा आकर्षणानें अगर त्वेषानें जनसमाजास चटका लागतो तेच या कवीचे काव्यविषय होत. ..वैयक्तिक सूक्ष्म मनोभावना सुसंस्कृत वाचकापुढें कलाकुसरीच्या शब्दयोजनेंत मांडणाऱ्या कवींची जात निराळी व " साधी भोळी काव्य वैखरी " समुदायापुढें जाणाऱ्या या शाहीरांची जात वेगळी. रामशाहीर हे महाराष्ट्राच्या ऐतिहासिक परंपरेचे अभिमानी, टिळकांचे भक्त, धार्मिक परंपरेबद्दल जिव्हाळा बाळगणारे, स्वराज्याच्या कोणत्याही तडफदार चळवळीचे चाहते, व निर्भीडपणें आपला उमाळा उकलणारे शाहीर आहेत. ज्ञानप्राप्तीचे दोन मार्ग आहेत. " तत्स्वयं योगसंसिद्धः कालेनात्मनि विंदति " हा तीव्र व कुशाग्र बुद्धीच्या लोकांचा बौद्धिक मार्ग होय. पण ही बुद्धी ज्याला नसेल त्याला " भक्त्या माम् अभिजानाति यावान् यश्चास्मि तत्वतः " हा दुसरा सुलभ राजमार्ग खुला आहे. एकाद्या विषयाच्या भक्तीनेंहि त्या विषयाचें मार्मिक ज्ञान होऊं शकतें याचें प्रत्यंतर रामशाहीराच्या काव्यांत मिळेल. रामशाहीरांची टिळकभक्ति उत्कट आहे—

बाळ टिळक विठ्ठला । आवतार संपला ।
स्वराज्यमंदिरांतला । बाळकृष्ण चालला ।
बेल—पुष्प राहिले । स्वराज्यकार्य ठेविलें ।
टिळकगुण गाइले । काव्यसिंधु आटले ॥ ( पृ. १५ )

अशी त्याची निःस्सीम टिळक भक्ति आहे. पण या भक्तीनेंच त्यानें टिळकचरित्राचें रहस्य ज्ञानी अनुयायांइतकेंच मार्मिकपणें आकलन केलें आहे हें त्याच्या पुढील उद्गारांवरून दिसून येईल—

गोष्ट घेतली करावयाला त्यांत न माघार
श्रीटिळकांच्या कर्तृत्वाचें हेंच बीजसार ॥ ( पृ. ४० )
तेहतिस कोटींचें । सुखदुःख । तेंचि लोकमान्यांचें ।
नैतिक कर्मबल । हा योगी । निर्मल गंगाजल ॥ ( पृ. १२ )

आणि यामुळेंच टिळक दिवंगत झाल्यावर—

काळाच्या खोल दरींत । केसरी जाउनी निजला
हा महाराष्ट्राचा झोला
कर्तव्यरज्जु घेवोनी । हलवील कोण हें बोला? ॥ ( पृ. १६ )

असा करुणरसपूर्ण सवाल या कवीनें केला आहे.

लोकमान्यांच्या चरित्राप्रमाणेंच कर्मयोगाचें रहस्यहि कवीनें बौद्धिक दृष्ट्या नव्हे तर भावनेच्या दृष्टीनें जागोजाग समर्पक रीतीनें मांडलें आहे.

निष्काम कर्म करी तोचि नर खरा जनतेचा नेता ।
कर्म कुणाचें चुकलें नाहीं साक्ष पटविते गीता ॥
ईशें नेमुनि दिलें तुम्हां तें कार्य करीत रहावें ।
जगत्पटावर यशापयश तें भगवंताला ठावें ॥ ( पृ. २४ )

बोलणें टाकुनी द्यावें । करणेंचि करोनी जावें ।
आपुलें ध्येय गाठावें ॥ ( पृ. ४७ )

चहुंकडे दृष्टि रोखावी
कार्याची दिशा ठरवावी
ना ढळूं स्थिरता द्यावी
कर्तव्यपालनासाठीं । घे कर्म योग–तलवार ॥
गीतेचें मार्मिक बोल
गंभीर अर्थ बहु खोल
जीवाचें जीवा मोल
हें रहस्य गीतासार । घे कर्मयोग–तलवार ॥ ( पृ. ४४ )

REFBK-0003961

कवीचा महाराष्ट्र विषयक अभिमानहि असाच जाज्वल्य आहे.

बाहुबलानें दिल्लीपतिला हादरून सोडियलें ।
महाराष्ट्राच्या दास्यतटाचे तुकडे तुकडे केले ॥
महाराष्ट्र–केसरिचे छावे आम्ही हें न कधीं विसरूं
सत्व राखण्या समरभूमिवर मरूं किंवा मारूं ॥ ( पृ. ५३ )

अर्थात् कवीची स्फूर्ती स्वराज्याचे धडे देतांना लहानमोठ्या महाराष्ट्र–वीरांकडे वळते—

शिवाजी बाजि येसाजी । वीर ताऱ्हा नका विसरूं
स्वराज्याचे धडे शिकण्या । गुरु आपुले धैर्यमेरू ॥ ( पृ. ४१ )

किंवा—

कैक मावळे कैक मराठे लढतां लढतां मेले
मायभूमिच्या यशोमंदिरीं कळस चढवुनी गेले ॥ ( पृ० ४९ )
कर्तृत्वावर वैभव मिळतें
उच्चनीच हा भाव न तेथें
ऋद्धी सिद्धी पाणी भरते
धन्य सरदार । मल्हारराव होळकर ॥ ( पृ. ९३ )
गड आला पण सिंह गमविला
नाम सिंहगड पावला
हा तान्हाचा स्मारक झाला
जगांत हालत राहिला ( पृ. ७८ )

या वीरांच्या चरित्राप्रमाणेंच त्यांच्या पराक्रमाचे स्मारकरूप असे आजचे अवशेष पाहूनहि कवीला त्यांच्या पराक्रमाची स्मृति होते—

स्वातंत्र्यसंगरीं लढले । ते वीर चिरंजीव झाले
हे दूत तयांचे किल्ले ॥
सह्याद्री पर्वतावरती । स्मारकें दृष्टिला पडती
गडदुर्ग बोलके होती ।
किल्यांची भाषा मुग्ध । जोवाला करिते दग्ध
सुचवितें काय प्रारब्ध ।
ठकवाया जो ठक आला । पाहिजे उलट ठकवोला ।
श्रीकृष्ण भारती वदला ॥ ( पृ. ५१ )

याप्रमाणें या वीरांचा पराक्रम व यश न कंटाळतां कवीची वैखरी गात असली तरी आजचा लोकशाहीचा नवा काल कवी विसरत नाहीं—

" हा काळ नसे व्यक्तीचा । हा काळ लोकशाहीचा
हा नसे राजमुकुटाचा ॥ ( पृ. ६४ )

असें ती समुदायास बजावीत आहे.

काळानुरूप वागावे । आपुले मार्ग बदलावे
परि ध्येय कधिं न सोडावें ॥ ( प. ५५ )

अशी त्यानें काळाची जाणीव ठेविली आहे.

परंपरेचा अभिमान असला तरी आज जगण्यासाठीं व टिकण्यासाठीं नवी परंपरा पाडली पाहिजे याचीहि कवीला जाणीव आहे. शुद्धीकरणासंबंधानें त्याचे हे कळकळीचे उद्गार पहा—

सक्तिनें धर्म इस्लामी । सेविला कां पूर्वजांनीं ॥
खिस्तधर्मीं कितिक गेले । खुशीनें का आणा ध्यानीं
आम्ही तुमचे जातभाई । देशबंधू पूर्विचे ना ? ॥
हृदय अमुचें आर्य आहे । नाहिं विकलें अजुनि कोणा
आमुचा सर्व आचार । विधी सगळे आर्यधर्मी
'बाटलेला' घोषणा ही । सोसवेना घाव वर्मीं. ॥

त्याचप्रमाणें उदात्त विवाह संस्कारांची स्वार्थी हेतूनें विटंबना करणाऱ्या समाजांतील शिष्टांचे कवीनें उदाहरणें देऊन कान उपटले आहेत व विवाहाला व्यापारी स्वरूप देणाऱ्या रूढींचें आविष्करण केलें आहे. मेळ्यांतून स्त्रियां-संबंधीं विचकट पदें करणाऱ्यांना कवीनें तडाखा दिला असून " अजुनि उमजाना " ( पृ. ६३ ) व ' वीरमाता कधीं होणार " ( ३७ ) अशीं स्त्रियांसंबंधीं उद्बोधक व कोणासहि आक्षेप न घेतां येणारीं पदें केलीं आहेत. स्त्रियांना त्यांनीं केलेला पुढील सोज्वळ उपदेश पाहा—

मायभूमिच्या भावि पिढ्यांना, तुम्हीच माताना ?
जबाबदारी, ओळखून द्या, शिक्षण बालांना ॥
जागृति ठेवा, मातृपदाची तुम्ही वागतांना ॥ ( पृ. ६३ )

या पदाची एका गणेशोत्सवाचे समारोपप्रसंगीं श्री. तात्यासाहेब केळकर यांनीं स्तुति करून स्त्रियांविषयीं चांगलीं व आक्षेप न घेण्यासारखीं पदें कशीं करतां येतात याविषयींचें हें उदाहरण म्हणून सांगितलें होतें.

आपल्या देशाची सध्याची अवनत स्थिति पाहून रामकवीचें अंतःकरण तळमळत आहे व ही तळमळ हृदयस्पर्शी उद्गारांनीं बाहेर पडली आहे.

आसेतु हिमाचल जावें ।
जनिं करुणध्वनि ऐकावे ।
हे असे दिवस कां यावे ? ॥ ( पृ. २५ )

पण या निराशेचे करुणालापच ते नुसते गात बसलेले नाहींत तर भारताला व महाराष्ट्राला " चला उठा चला फोडा । निराशेच्या फत्तराला ॥ " असा

त्यांनीं उपदेश केला आहे. सह्याद्रीचा स्वराज्यदिनकर मावळल्याबद्दल दुःखोद्गार काढण्याबरोबरच

उठा मराठे करा जागृती हरहर जय बोला
जगणें मरणें महाराष्ट्राचें नांव राखण्याला ॥

असेंच त्यांनीं जागोजाग या दुःखोद्गारांचें कार्यप्रेरक पर्यवसान केलें आहे. आज सत्ताधारी असलेल्या नोकरशाहीला त्यांनीं बजावलें आहे कीं—

सद्दैवें चक्र तें फिरतें ।
फिरवोनि जगाला पापपुण्य दाखवितें ॥
हें असें । चक्र फिरतसें । चिरंजिव नसे । कुणाची सत्ता ॥

याप्रमाणें नोकरशाहीला बजावून आपल्या हिंदी बांधवांनीं " हिंद देश हा हिंदांकरितां " हें ध्येय स्पष्टपणें जगापुढें मांडावें असें कवींनीं सांगितलें आहे.

एकंदरींत कवीचें काव्य कार्यप्रेरक व लोकांना कर्मयोगी बनविण्याच्या बुद्धीनें स्फुरलेलें आहे व त्याचा तसा परिणाम झाला तरच कवीला खरा संतोष होणारा आहे.

ग. वि. केतकर. बी ए. एल एल बी.

# संपादकीय निवेदन.

माझे मित्र श्री. **रामचंद्र वासुदेव दाते** उर्फ **रामशाहीर** यांच्या निवडक पदांचा संग्रह आज वाचकांपुढें आहे. सदर पद्यें निरानिराळ्या सालीं निरनिराळ्यां मेळ्यांकडून म्हटली गेल्यामुळें बहुजनसमाजाच्या तोंडीं त्यांतील कित्येक पद्यें वा पद्यचरण ऐकूं येतात. आजपर्यंत **रामशाहीरांनीं** आपल्या पदांमधून क्वचितच आपलें नांव गोंविल्यामुळें त्यांची पदें जितकीं प्रसिद्ध आहेत तितके स्वतः **रामशाहीर** हे प्रसिद्ध नाहींत. 'वर्तमानपत्रीं वाङ्मय' हें जसें धावतें वाङ्मय, त्याप्रमाणें 'मेळ्यांच्या पद्यावल्या' हेही वाङ्मय या दृष्टीनें पळतें वाङ्मय होय. म्हणून **रामशाहीर** यांची काव्य कुसुमें निवडून काढून आज त्यांचा हा गुच्छ रसिक वाचकांपुढें ठेविला आहे. जी पद्य--कुसमें नैमित्तिक होती तीं तो काळ फिरल्यामुळें कोमेजल्या सारखी झाली. अर्थात् ती वगळून चिरकाल टिकणारी अशी चिरंजीव पुष्पें निवडून त्यांचा हा गुच्छा बनविला आहे. गुच्छाखालीं असणाऱ्या पानांप्रमाणें क्वचित् कांहीं कोमेजलेल्या पुष्पांचाही उपयोग केला गेला आहे !

देशभक्त श्री. आण्णासाहेब भोपटकर यांनीं आपल्या छोट्या प्रस्तावनेंत **रामशाहीर** यांचा काव्यविशेष सांगितला आहे. तर दे. भ. श्री ग. वि. केतकर यांनीं आपल्या ' अल्प परिचयांत ' रसिकतेनें फुलांचे कांहीं निवडक वेंचे घेऊन त्याच्या सुगंधाची चर्चा केली आहे.

माझ्या दृष्टीनें रामशाहीर यांच्या काव्याचा **नकारात्मक विशेष** म्हणजे रामशाहीर यांनीं अद्याप एकही प्रेमकाव्य छापलेलें नाहीं, केलेलें नाहीं ! कवी, आणि प्रेम काव्य नाहीं, मग काय छाती आहे कवी म्हणवून घेण्याची ! म्हणूनच त्यांच्या काव्यास **रामशाहीर यांची कविता** असें नांव दिलें आहे.

**रामशाहीर** यांची कविता कलाकुसरीची नाहीं. साफसुफी बेतावाताचीच, पण कवितेंत तडफ दांडगी आहे. त्यांची सर्व कविता म्हणजे अंतःकरणाचा उमाळा आहे ! हृदयाचें जें खळबळतें तें कांहींशा ओबड धोबड स्वरूपांत धडाडीनें बाहेर पडतें !

राम शाहीर यांची बहुतेक कविता श्रावण मासीं जन्म घेतें. रामशाहीर यांच्या अंतःकरणांत वर्षांचे अकरा महिने देशकाल परिस्थित्यनुरूप ज्या संवे-

दना होतात, परिस्थितीची जी बोचक जाणीव होते, गतेतिहासाबद्दल जे चटके बसतात, ते श्रावण मासांत काव्यरूपानें जन्म घेतात.

पदांचे ध्रुवपद तयार करण्यांत तर रामशाहीरांचा हात खंडा आहे! त्यांच्या कांहीं कांहीं पदांची ध्रुवपदें तर इतकी तडफेची आहेत कीं कुस्ती खेळण्याला सुरवात करण्यापूर्वी पेहेलवान जसा दंडावर थाप ठोकून सलामी देतो त्याप्रमाणें रामशाहीर पदांच्या आरंभी ध्रुवपदांची छातीठोक सलामी देतात !

असे वाटतें, की रामशाहीरांच्या काव्यमय अंतःकरणाचे विसाव्याचे ठिकाण म्हणजे लोकमान्य टिळक ! आजपर्यंत लोकमान्यांना निरनिराळीं विशेषणें मिळाली पण ' टिळक टिळक विठ्ठला । राम शरण ये तुला ' यांतील टिळक टिळक विठ्ठला! हे विशेषण—एकट्या रामशाहीरानींच दिलेले असावें !

वारकऱ्यांचा जसा पंढरीचा विठोबा तसा रामशाहीरांचा विठोबा म्हणजे लोकमान्य !

पंढरीचा वारकरी ज्याप्रमाणें—पंढरीच्या वाटेवर असतांना भक्तिभावानें बेभान होऊन स्वदेहाचाही विसर पडून नाचत असतो—ओरडत असतो—

' नाचत पंढरी जाऊ हो । डोळ्यानीं विठ्ठल पाहु हो ' !

त्याप्रमाणें लोकमान्यांचा हा वारकरी ' टिळक भक्तिची ' निशाण कांठी संभाळून गात आहे—

" पैसा ज्यांचा । हक्क तयांचा ।
वदतो टिळकांचा दौरा । स्वराज्य तोरण उभें करा ! "

कवींच्या काव्यांत ' चांदणे ' असते—रामशाहीर यांच्या कवितेत सूर्याचे किरण आहेत ! कवी—' काल्पनिक प्रियेच्या सौंदर्याकडे ' पाहत असतो, रामशाहीर ' मातृभूमिच्या ' आपल्या आईच्या मुद्रेकडे कष्टी अंतःकरणानें पहात आहेत ! कवी काव्य देवतेवर नाजुक साजुक—ललित शब्दाची आभरणें चढविण्यासाठीं धडपडत असतो पण आमच्या ' रामशाहीराचे ' शब्दलालित्य ' गोफण फेकीं ' सारखे आहे ! कवी ' नंदनवन बाग बगिचे ' धुंडाळीत असतो तर आमचा रामशाहीर " सह्याद्री दऱ्याखोऱ्यांत " काय झालें, याचा विचार करतो ! थोडक्यांत सांगायचे म्हणजे आधुनिक कवींची काव्यें म्हणजे तलम मलमल आहे अशी कल्पना केली तर रामशाहीर यांचे काव्य म्हणजे पांढरी शुभ्र पण धुवट खादी आहे !

रसिकांना विनंती येवढीच कीं तलम मलमल व खादी यांच्या विक्रीचे प्रमाण जे आज बाजारांत दृष्टीस पडते त्या प्रमाणें या काव्याचा स्वीकार न करितां आपल्या पुस्तकाच्या कपाटांत—रामशाहीर यांचा हा प्रथम काव्यखंड—जरूर संग्रहीत करावा.

'रामशाहीर यांच्या कवितेचें' हे प्रथमपुष्प कल्पून आजपासून—'**श्री सरस्वती वाङ्मय ग्रंथमाला**' चालू केली आहे. मालेचे नियम सोबत छापले आहेत व मालेचीं पुढें प्रसिद्ध होणारीं पुष्पें पृष्ठ भागावर छापिलीं आहेत. मालेंतून कादंबऱ्या व चरित्र वाङ्मय प्रसिद्ध करण्याचा मानस आहे. रसिकांनीं मालेचे वर्गणीदार होऊन आश्रय द्यावा, अशी विनंती आहे.

पुणें, तारीख.
६।९।१९२९ } **यशवंत गोपाळ जोशी.**

# श्री सरस्वती वाङ्मय ग्रंथमालेचे नियम.

( १ ) या मालेचें पुष्प जास्तींतजास्ती चार महिन्यांच्या अंतरानें निघेल.

( २ ) मालेचे वर्गणीदार कोणत्याही पुष्पापासून होतां येईल.

( ३ ) पुस्तकाची किंमत १ रुपयापासून १॥ रुपयापर्यंत असेल.

( ४ ) प्रवेश फी ८ आणे पडेल. प्रवेश फी मनीऑर्डरीनें पाठवावी किंवा व्ही. पी. नें आकारण्यास लिहावें. ट. ख. निराळा पडेल.

( ५ ) वर्गणीदार झाल्यापासून पुढें होणारीं सर्व पुस्तकें वर्गणीदारांनीं घेतलीं पाहिजेत.


## महाराष्ट्र पब्लिशिंग हाऊस लिमिटेड, पुणें यांजकडे मिळणाऱ्या कांहीं पुस्तकांची यादी

| | |
|---|---|
| सुधारक खण्डकाव्य | १–८–० |
| आंबराई ,, | १–०–० |
| सरलाबाला ,, | ०–५–० |
| गंगावर्णन ( चिंतामण पेठकर ) | १–०–० |
| अभिनव काव्यमाला भाग ४ था | १–०–० |
| पोपटपंची. ( उपाध्ये. ) | ०–१२–० |
| काव्योपहार न. चिं. केळकर | ०–५–० |
| ज्योत्स्नागीत | ०–४–० |
| खरा सत्यशोधक ( कादंबरी ) | ०–१२–० |
| ब्रह्मलिखीत ( कुमारिकेची हांक ! ) | १–०–० |
| रंकाचें राज्य. ( नाटक ) | १–०–० |
| सं. हनुमान युद्ध ( नाटक ) | ०–१२–० |

सं. क्रमांक ५०७
५०४ काव

# अनुक्रमणिका.


| पद | | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ | अभयवर द्यावा ... | १ |
| २ | प्रारंभी नमन. ... | १ |
| ३ | कलिमदहरणा ... | २ |
| ४ | वाजवा मुरली. ... | २ |
| ५ | मधुर मुरली वाजवा.... | २ |
| ६ | आनंद भुवन माझें .... | ३ |
| ७ | अटक न त्याला. ... | ३ |
| ८ | हरहर जय बोला. ... | ४ |
| ९ | लग्न घटीं भरली. ... | ४ |
| १० | जय स्वतंत्रते ! ... | ५ |
| ११ | लोकशाही गंगे. ... | ६ |
| १२ | तुझ्याच उदरीं जन्म पुन्हां घ्यावा! | ६ |
| १३ | स्फूर्ति पवाडे गाऊं कुणावर ? | ८ |
| १४ | आज पवाडे धूळ खात पडले ! | ९ |
| १५ | पगडी श्रेष्ठ ठरणार !... | १० |
| १६ | हा कर्मयोगी अवतार- ... | ११ |
| १७ | दावा गे कोणी— ... | १२ |
| १८ | टिळक कवच. ... | १३ |
| १९ | चैतन्य रवी मावळला. | १५ |
| २० | किंकाळी फोडिती घुवडें सारी- | १८ |
| २१ | कालाय तस्मै नमः | १९ |
| २२ | स्वराज्य किरणें उदया आली. | २० |
| २३ | स्वातंत्र्य कलश उघडावा. | २१ |
| २४ | हे महाराष्ट्र बीज. | २२ |
| २५ | असे हा हिंद हिंदाचा. | २२ |
| २६ | कर्मयोग श्रेष्ठ | २३ |
| २७ | सतींचें वाण ... | २४ |
| २८ | उठ बांधुनी चंग | २५ |
| २९ | स्वदेश प्रेमाश्रुंच्या लाटा. | २६ |
| ३० | चला या देश सेवेला. | २७ |
| ३१ | देशार्थ देह झिजवा. | २८ |
| ३२ | सुंदर मंदीर. ... | २९ |
| ३३ | प्रभू तारी भारत भूला. | ३० |
| ३४ | असे लाडका सह्याद्रीचा. | ३५ |
| ३५ | भारतभूच्या अवनतकाला. | ३६ |
| ३६ | वीर माता कधीं होणार ? | ३७ |
| ३७ | स्वातंत्र्य संगरी लढला. | ३८ |
| ३८ | बाळ टिळक धन्य. | ३९ |
| ३९ | दरखनचीं गर्जना. ... | ४० |
| ४० | चला फोडा निराशेच्या फत्तराला | ४१ |
| ४१ | हरहर जय बोला. ... | ४२ |
| ४२ | टाकून घोर निद्रा. ... | ४३ |
| ४३ | चल उठ, भारता उठ.... | ४३ |
| ४४ | नसे टिकाऊ एकतंत्री सत्ता. | ४४ |
| ४५ | द्यावा ठोशासी ठोसा. ... | ४६ |
| ४६ | वजाव वजाव रणडंका. ... | ४७ |

| पद | पृष्ठ | पद | पृष्ठ |
|---|---|---|---|
| ४७ उडवं उडंव सरवत्ती. ... | ४८ | ७५ मुसलमानी कावा. ... | ८६ |
| ४८ मर्द मराठे चिरंजीव झाले. | ४९ | ७६ कांहीं तरी लाज ... | ८७ |
| ४९ अन्याय न्याय ठरला. ... | ५० | ७७ आपल्या रायबाचं लग्न होऊं द्या | ८८ |
| ५० वाजवा दुडुंम दुडुंम नौबत. | ५१ | ७८ सारं वाटोळं समद्याचें क्याल! | ८९ |
| ५१ तुमकू नही डरनेवाला. ... | ५२ | ७९ मरा किंवा मारा .... | ९० |
| ५२ लपव लपव कुक्कुट. ... | ५३ | ८० अफझुल खानाचा वध. | ९१ |
| ५३ तू येथून जावें निघून ... | ५४ | ८१ लपला होता हिरा मातींत | ९३ |
| ५४ एकच आहे तोड ! ... | ५४ | ८२ सुधारणा ही ओकाळली आज. | ९४ |
| ५५ राष्ट्रहितास्तव. ... | ५५ | ८३ तुझें वाटोळं होईल. | ९५ |
| ५६ वीर ते चिरंजीव झाले. ... | ५६ | ८४ धडगत नाहीं दिसत. | ९६ |
| ५७ विजय पुढें दारांत. ... | ५७ | ८५ ऐका लीला गमतीच्या. | ९७ |
| ५८ मूठ माती द्या वादांना. ... | ५८ | ८६ नाहीं तुमच्या सदना कौल. | ९८ |
| ५९ पुरे आता अंगाई ! ... | ५९ | ८७ नवरदेवांना शेला पागोटे. | ९९ |
| ६० सह्याद्रिचा स्वराज्य दिनकर. | ५९ | ८८ हा हुंडाच हुंडा. | १११ |
| ६१ वादांत शेवटीं नाश. ... | ६० | ८९ वरकांतीं दिखाऊ चळवळ. | ११२ |
| ६२ काल चक्र उलटे. ... | ६१ | ९० फाजिल डौल किती. | ११३ |
| ६३ येती गांडुळे प्रत्यही जन्माला. | ६२ | ९१ विलायती वाटाणा. | ११४ |
| ६४ शांति युगाच्या विश्वकल्पना. | ६२ | ९२ दारुचें व्यसन अनिवार. | ११८ |
| ६५ अजुनि उमजाना. ... | ६३ | ९३ ह्या पुरे करा बाता., | १२० |
| ६६ हे व्यर्थ शांतिचे बंड. | ६४ | ९४ नराचा नारायण होतो. | १२१ |
| ६७ पुरेपुरे वटवट. ... | ६५ | ९५ सुतानें जाऊं स्वर्गाला. | १२१ |
| ६८ हा का तुमचा असहकार... | ६५ | ९६ वाढवा शारीरिक शक्ति. | १२२ |
| ६९ पेशव्यांचा शनवार वाडा. | ६६ | ९७ घेऊं कधीं नच विदेशी माला. | १२३ |
| ७० करूनि पोरके महाराष्ट्राला. | ७६ | ९८ धंदा निंदा करण्याचा. | १२३ |
| ७१ हे तों स्वराज्य प्राप्तीचे साधन. | ७९ | ९९ धन्य तव कुसवा. | १२४ |
| ७२ घ्या बंधु पुन्हां धर्मांत. | ८४ | १०० स्वराज्य तोरण. | १२५ |
| ७३ कवाडें आर्य धर्माची. | ८५ | १०१ मस्तानी ठेवा–पण ? | १२६ |
| ७४ धर्म डंका वाजवा. ... | ८५ | १०२ लोक शाहिची आरती. | १२७ |

# रामशाहीर यांची कविता.

## अभयवर द्यावा

( चाल— भगवान भुवन कल्याण )

शिवनंद गौरी बाळा । अभय वर द्यावा ॥ धृ० ॥
धर्म रक्षणा साधु तारणा । अवतार झणीं घ्यावा ॥ १ ॥
हिंद भूमिवर स्वराज्य भानु । तेजें तळपावा ॥ २ ॥
धेनु हंबरे करुण स्वरानें । तिचे हेतु पुरवा ॥ ३ ॥
तुजविण कवणा स्वातंत्र्याचा । प्रसाद मागावा ॥ ४ ॥
सार्थ करावें वचन आपुलें । चला उठा देवा ॥ ५ ॥

जुना मावळी मेळा १९२७.

---

## प्रारंभीं नमन

( चाल— अर्पिलें सुमन तें )

प्रारंभीं नमन हें प्रेमें बळवंतासी । जो भोगि
हद्दपारीसी । त्या आर्य भाल तिलकासी ॥
सू–मनें, सु–माला, अर्पु या, अहर्निशी ॥ १ ॥

हिन्दसमाज मेळा १९०८.

---

## कलिमदहरणा

कलिमदहरणा साधु तारणा । गिरिजा रमणा घे धांव झणीं ॥धृ०॥
विद्या यश बल ऋद्धि-सिद्धि । वसो भारतीं विनवी चरणीं ।
अज्ञ बालकें तुझीच आम्हीं । कृपाकटाक्षें घे सांभाळुनी ॥ १ ॥

जुना मावळी मेळा.

---

## वाजवा मुरली

( चालः— भगवान भुवन कल्याण. )

गोपाळ कृष्ण भगवान् । वाजवा मुरली ॥ धृ० ॥
युगे युगे जी धर्मरक्षणा । गीतार्थी स्फुरली ॥ १ ॥
गोकुलवासी गोपगणांची । मती मोहविली ॥ २ ॥
धनंजयाची बुद्धि म्लानता । जीनें घालविली ॥ ३ ॥
कुरु क्षेत्रावर मोक्ष-सुखाची । ओळख पटवीली ॥ ४ ॥
विश्व मंदिरीं मंजुल नादें । असे भरुन उरली ॥ ५ ॥
जिनें प्रतापें गोपगोपिंची । तहान भूक हरली ॥ ६ ॥
धर्मनीतीचीं राजनीतिचीं । तत्वें शिकविलीं ॥ ७ ॥
स्वराज्य मंदिर उघडायाची । दाखविली किल्ली ॥ ८ ॥
सांप्रत-कालीं कलिमद-हरणा । वेळ नजिक आली ॥ ९ ॥

अनाथ विद्यार्थीगृह मेळा, १९२३.

---

## मधुर मुरली वाजवा

( चालः— पद्य देशाची. )

उठा गोपाळा । धेनु हांक मारी । विघ्न हें निवारी । धांव श्री मुरारी॥धृ०॥
ऊठ केशवा। मधुर मुरली वाजवा । वासुदेव माधवा ।
रहस्यगीत ऐकवा । धांव गदाधारी ॥ १ ॥

वचन विसरला । काय हरी आजला । प्रबळ कली जाहला ।
कोण तारी धेनूला । धांव चक्रधारी ॥ २ ॥
धेनु कापिती । रक्तपाट वाहती । असुर माजले अती ।
न्यायनीति तुडविती । काय तुझी थोरवी ॥ ३ ॥
धर्मस्थापना । साधुसंत रक्षणा । कोण करिल तुजविना ।
श्रीहरी जनार्दना । भारतासि तारी ॥ ४ ॥

भारतमित्र मेळा १९२५.

---

## आनंदभुवन माझें

( चाल— भगवान भुवनकल्याण. )

आनंदभुवन माझे, सुखाचा ठेवा ॥ धृ० ॥
शिवरायाच्या कीर्ति सुगंधें दर्वळुनी जावा ॥ १ ॥
समर्थ गुरूंचा बोध स्फूर्तिचा, प्रसाद मागावा ॥ २ ॥
मायभवानी समशेरीचा आशिर्वाद घ्यावा ॥ ३ ॥
हरहर नादें गिरी सह्याद्री दुमदुमुनी जावा ॥ ४ ॥
शूर वीरांच्या चारित्र्याचा आश्रय जोडावा ॥ ५ ॥
इतिहासाची ही पुष्कर्णी, कलश भरून घ्यावा ॥ ६ ॥
स्वयंप्रकाशित स्वराज्यभानू उदया झणिं यावा ॥ ७ ॥

राष्ट्रहितैषी मेळा १९२४

---

## अटक न त्याला !

( रागः— सिंधुरा. )

झेंडा भगवा । अटक न त्याला । अखिल जगभर । चला फडकवा ॥
घ्या भाला करिं । पळवा अरिला ॥ धृ० ॥

शिव शाहिचा । अभिमान ज्यांत । चैतन्य ज्योत । गुरुदासांचा ।
स्फूर्तिदायक । प्रसाद ठेवा ॥ १ ॥
आळस सोडा । बसतां घरांत । जग विसरलांत । ह्मणिं जाय पुढें ।
ह्याची लाज न । वैभव मिळवा ॥ २ ॥
धन्य मराठे । मिरवा जगांत । कफनी अंगीं । क्रांति घडवा ।
भूमातेचे । हेतु पुरवा ॥ ३ ॥

अनाथ विद्यार्थीगृह मेळा १९२५.

---

# हरहर जय बोला

( चालः— भारत भू माय. )

हर हर जय बोला । शुभवेला । स्वराज्य प्राप्तीला ॥ धृ० ॥
रत्नें निलमणी । ही खाणी । वीरांची जननी ॥ १ ॥
गनिमी काव्याची । तुज कुंची । समर्थ सद्‌गुरूंची ॥ २ ॥
तान्हा शिवबाजी । रणगाजी । धनाजी तो संताजी ॥ ३ ॥
घोडे नाचविले । गाजविले । कर्मवीर झाले ॥ ४ ॥
सह्याद्री क्षेत्र । मोक्षार्थ । हे आहे रणतीर्थ ॥ ५ ॥

सार्वजनिक काका.

---

# लग्नघटी भरली

( चालः-- भूपाळी. )

अवधि न उरला मांगल्याची । लग्नघटी भरली ।
स्वराज्य देवी मळवट भरुनी । पाटावर बसली ॥ १ ॥
वाजंत्र्यांनो तुम्ही वाजवा । तोफांचे चौघडे ।
लोकशाहीचे ताशे बडवा । जशी वीज कडकडे ॥ २ ॥

रणशिंग फुंकुनी देशबंधूना । आमंत्रण धाडा ।
चला आणुंया स्वातंत्र्याचा । मिरवीत वरघोडा ॥ ३ ॥
वाटे माजीं उतरूनि दुहिचा । नारळ फोडावा ।
भ्याडपणाचा दहीभात मग । उतरुनी टाकावा ॥ ४ ॥
द्वारामाजी दिव्याभितांची । दक्षणार्थ दाटी ।
कुबेर धनही पडेल अपुरें स्वतंत्रतेसाठीं ॥ ५ ॥
लग्नविधी निर्विघ्नपणानें । पारची पाडावा ।
स्वदेश घातुक नीच वृत्तीचा आधीं बळी द्यावा ॥ ६ ॥

+ + + +

स्वतंत्रेतेचें रम्य सरोवर । चला पोहण्याला ।
सुंदर कमळें निवडक काढुनि । वाहूं देवीला ॥ ७ ॥
स्वतंत्र सारे स्वतंत्रतारें स्वतंत्रता वारें ।
नाश जवळ ये परवशतेच्या ! अभेद्य दुर्गारे ॥ ८ ॥

ऐक्यवर्धक मेळा १९२१.

---

# जय स्वतंत्रते

( चालः— हे प्रभो विभो अगाध किती तव करणी )

जय स्वतंत्रते नमो नमो जय माते । करि सार्थ मातृपद नातें ॥ धृ० ॥
तव भक्त पाहती वाट । होईल कधीं गे पहाट ॥
स्वातंत्र्य उषेचा थाट । गाऊंदे स्फूर्तिचीं गीतें ॥ १ ॥
नको अंत बघूं गे आई । परदास्य लयाला नेई ॥ २ ॥
बालका कडेवर घेई । पाठिचीं पळवी गे भूतें ॥ ३ ॥

नको आई चोरू पान्हा । मी असें भुकेला तान्हा ॥ ४ ॥
तुजवीण विनवुं गे कोणा । करि सार्थ मातृपद नातें ॥ ५ ॥

सार्वजनिक काका मेळा.

---

# लोकशाही गंगे

( चालः— शुभ वेळ मंगला आज. )

हे लोकशाही गंगे, नमो जयमाते ॥ धृ० ॥
दीन लेकरें मागति तुजला स्वराज्य दुग्धातें ॥ १ ॥
वत्सालागीं जैसी धेनू नको विसरूं नातें ॥ २ ॥
पुण्यशाली तूं नाम तुझें गे पावन पतितातें ॥ ३ ॥
सत्वर सोडिव सदा पाठिचीं पारतंत्र्यभूतें ॥ ४ ॥
मदांध पापी नम्र तुजपुढें पापक्षालनातें ॥ ५ ॥
परवशतेची घोर यातना अधःपात करिते ॥ ६ ॥
प्रसंग दारुण जर्जर झालों व्याकुल मन होतें ॥ ७ ॥

सार्वजनिक काका मेळा.

---

# तुझ्याच उदरीं जन्म पुन्हां व्हावा

( चाल— भूपाळी. )

नमो नमस्ते नमो नमो जय माय भूमि वंदे ।
तुझ्या यशाचा वैभव डंका गर्जत राहूं दे ॥ १ ॥
जय मातरं वंदे जय जय माय भूमि वंदे ।
तुझ्याच स्तवनीं झिजो वैखरी आशिर्वचना दे ॥ २ ॥
गंगा यमुना सिंधु नर्मदा शरयू कावेरी ।

कृष्णा गोदा पावन सरिता भीमा पंढरपुरीं ॥ ३ ॥
पावन दायक पुण्य क्षेत्रें काशी रामेश्वर ।
भगवंताचे झाले होतील असंख्य अवतार ॥ ४ ॥
आद्य सनातन वेदांताचें निर्मल गंगोदक ।
तूंचि पाजिलें म्हणुनी मारितो अजि तुजला हांक ॥ ५ ॥
तुझी आवडी असे फार गे मुरलीधर श्रीधरा ।
म्हणुनि स्तविल्या कृष्ण–मुखानें गीतामृतधारा ॥ ६ ॥
तुझ्याच मुगुटीं गडे शोभतो भूषण हिमनग हिरा ।
वनौषधींचा असे खोंविला मुगुटावरती तुरा ॥ ७ ॥
स्वयंसिद्ध तूं सर्व बाजुंनीं उणीव कोठें नसे ।
निसर्गसौंदर्याचा शाल्ल तुजला खुलवितसे ॥ ८ ॥
भाल माळवा राजपुताना बंगाल पूर्व भागीं ।
वामांगाला पंजाबाची तलवार खडी नंगी ॥ ९ ॥
नितांत रमणीय प्रांत काश्मीर शिरोभागीं खुले ।
समुद्रांतलीं रावणलंका पायाखालीं डुले ॥ १० ॥
संत महात्मे कुठें तुझे ते शककर्ते राजे ।
तुझ्या यशाचा वैभव डंका अद्यापिही गर्जे ॥ ११ ॥
नव्हति कशाची कुठें न्यूनता सुखसमृद्धी सदा ।
विजय लक्ष्मी दुर्दैवाला स्पर्शुं न देई कदा ॥ १२ ॥
जयें जन्मुनी सार्थक केला धन्य तुझा कुसवा ।
ह्याच कारणें तुझ्याच उदरीं जन्म पुन्हां व्हावा ॥ १३ ॥
मंगळ शुभकर स्वराज्य दिनकर क्षितिजावर आला ।
कवि रामाची उभी स्वागता स्फूर्ति–देवि बाला ॥ १४ ॥

अनाथविद्यार्थीगृह मेळा १९२३

———

# स्फूर्ति पवाडे गाऊं कुणावर ?

( चालः— घनश्याम सुंदरा. )

उठी उठी गे स्वतंत्रेश्री ऊठ ऊठ आतां ।
काकुळतीनें हांक मारिते भारत–भू–माता ॥ धृ० ॥
अहोरात्र तो जसा तळमळे जलावीण मीन ।
तसेच वाटे स्वतंत्रेविण धिग् जिणे जगुन ॥ १ ॥
असा काय अपराध जाहला कोपलीस कां तूं ।
काय करावे प्रसन्न होशिल काय मनीं किंतू ॥ २ ॥
अंधार गडद हा परवशतेचा भयाण भेसूर ।
मात कलीची असुर मातले सोसवेना भार ॥ ३ ॥
तुझ्या कृपेस्तव शतवरुषे गे प्रयत्न वहु केले ।
इतुकी कां गे निष्ठुर झालिस नाहीं मन द्रवलें ॥ ४ ॥
कोणी कोणी प्रयत्न केले किती सांगूं नांवें ।
सर्व–रूपते नांव एकची लोकमान्य घ्यावे ॥ ५ ॥
ज्या देशावर सतत नांदते पूर्ण तुझी प्रीती ।
आनंदानें देशभक्त ते स्वराज्य भोगीती ॥ ६ ॥
अवकृपेची नजर वांकडी आमुच्यावर केली ।
मरण ओढलें तदा, आमुची भाग्यसद्दि सरली ॥ ७ ॥
प्रथमचि बसला अजब तडाखा, शस्त्रहीन बनलो ।
वीर्य तेज तें बुद्धि धनादि घालवून बसलो ॥ ८ ॥
दडपशाहिनें कहर उडविला, नको नको जीव ।
ऊठ दयाळे निजलीस कागे, कशी नये कींव ॥ ९ ॥
दिवसा ढवळ्या लाखो घडती धेनू संहार ।
जुल्म अनन्वित नोकरशाही झाली शिरजोर ॥ १० ॥
धन्या धत्तुरा मिळे चाकरा खावयास मलिदा ।

काल कलीचा देवघेवीचा कसा उलट सौदा ।। ११ ।।
वसुंधरा ही सुवर्णभूमी नांव मात्र उरलें ।
सुवर्णपात्रे जाऊनि हातीं टीनपाट आलें ।। १२ ।।
खंडो गणती धान्य येथलें जाते परदेशी ।
न्याय उलट हा घरांत आमुच्या आम्ही वनवासी ।। १३ ।।
परिस्थिती ही बिकट पातली निर्वाण समय आला ।
नको आटवूं तव हृदयींचा कृपा झरा अपुला ।। १४ ।।
भारत भूची दीन लेकरें महाग तुकड्याला ।
लाचर स्थिति ही केविलवाणी सांगू कोणाला ।। १५ ।।
किती आठवूं कर्म कहाणी किती किती सांगूं ।
विचार करितो प्रसन्न होता काय काय मागू ।। १६ ।।
फार मागणे नसे कांहीं गे, वैभव जें गेलें ।
तेच पाहिजे आम्हांस आमुचे पुन्हां सर्व पहिले ।। १७ ।।
तूंच सर्व गे, तूंच प्राण गे, जीवन तूं आमुचे ।
काय कुडीला मान कोण दे गेल्यावर प्राण ।। १८ ।।
परोपरीनें किती आठवूं किती किती विनवूं ।
स्वतंत्रेश्री विन्मुख हस्तें परत नको लावूं ।। १९ ।।
स्फूर्ति पवाडे गाऊं कुणावर स्वतंत्रता नाहीं ।
कवि रामाचा थाट शाहिरी प्राण धरुनि राही ।। २० ।।

विद्यार्थीमंडळ मेळा १९२४.

---

# आज पवाडे धूळ खात पडले !

( चालः— घनश्याम सुंदरा श्रीधरा. )

स्वतंत्रते जय स्वतंत्रते जय मंगल जय घोष ।
आज मराठा होय पारखा, आला वनवास ।। धृ० ।।

तुझ्याच साठीं सिंहगडावर, केला जोहार ॥
सडे शिंपडी पानिपताचें, युद्धही घनघोर ॥ १ ॥
वैर साधण्या चहाडखोरीं, बसली चघळीत हाडें ॥
घिरट्या घालित स्वैर नाचती, पारतंत्र्य घुबडें ॥ २ ॥
शेवट शेवट बापू जागला, कडवा ब्राह्मण ॥
पेशवाईचा आशातरु हा, पडला उन्मळून ॥ ३ ॥
हराम–जादे फितूर झाले, निमक खाउनी तुझे ॥
स्वराज्य कुंकुम पुसण्या कारण हेचि कावळे तुझे ॥ ४ ॥
पुढें अवदसा आकाबाई फितुरी घुसली घरा ॥
तुझ्या सर्दीचें फिरवी पारडें मारुनि छातींत सुरा ॥ ५ ॥
पारतंत्र्य जूं मानेवरती घेऊन थकलीस गडे ॥
दमलिस माते शोक सिंधुचे घडे वाहुनी कडे ॥ ६ ॥
कुऱ्हाडीचा दांडा झाला गोताला काळ ॥
हृदय पोळतें गळा पाहुनी कवड्यांची माळ ॥ ७ ॥
तुझ्या यशाचे जिथें पवाडे डफावरि झडले ॥
बंद कवाडें आज पवाडे धूळ खात पडले ॥ ८ ॥
अधर्म राहू ग्रासुन टाकी कली करी मात ॥
पारतंत्र्य थैमान घालतें नाचतसे भूत ॥ ९ ॥

विद्यार्थीमंडळ मेळा १९२३

---

# पगडी श्रेष्ठ ठरणार

( चालः— रणशींग फुंकिलें. )

कांहीं झालें तरी शेवटीं पगडी श्रेष्ठ ठरणार ॥ धृ० ॥
शिंदेशाही पगडीबहाद्दर सेना कोणाची ।

वीर जनकोजी दत्ताजींची पाटील बोवाची ॥ १ ॥
मल्हारराव होळकर तयाची कंगणीदार पगडी ।
गनिमी कावा लढवुनि रिपुचें गंडस्थळ फोडी ॥ २ ॥
दमाजीनें गुजराथ व्यापुनि गादी स्थापन केली ।
प्रजाजनांनीं गायकवाडी पगडी स्वीकारिली ॥ ३ ॥
झोकदार जरतारी पगडिची सातारी ऐट ।
कोल्हापुरची तशीच पगडी वीरश्री थाट ॥ ४ ॥
पुणेरि पगडी प्रसिद्ध आहे मुत्सद्दी म्हणुनी ।
बुद्धिबलानें साक्ष पटविली फडणिस नानांनीं ॥ ५ ॥
व्यापार तागडीमध्यें श्रेष्ठ ही गुजराथी पगडी ।
तिचे जोडिला तराजु बहाद्दर मारवाडी पगडी ॥ ६ ॥
क्षात्रवृत्तिची रजपुत पगडी भूषण देशाला ।
वैभव श्रीची स्वातंत्र्याची पगडी ऐक्याला ॥ ७ ॥
प्रसिद्ध असती अठरा पगडया हिंदुस्थानांत ।
म्हणुनी पडलें नांव आपुलें अठरा पगडी जात ॥ ८ ॥
कवि रामाची स्फूर्ति पगडी शाहिरी पेशाची ।
लोकमान्य गुरु श्री टिळकांची राजकारणाची ॥ ९ ॥

भारतमित्र मेळा १९२५.

---

# हा कर्मयोगी अवतार

हा कर्मयोगी अवतार लोकमान्यांचा ॥ धृ० ॥
आज भारतीं परिमल सुटला, रहस्य गीतेचा ॥ १ ॥
त्रिभुवनीं साऱ्या गर्जत राहे डंका कीर्तीचा ॥ २ ॥
सुपुत्र प्यारा राजस चिमणा भारत भूमीचा ॥ ३ ॥

रत्नगिरीला हिरा गवसला, अमोलीक साचा ॥ ४ ॥
स्वराज्य तारू वल्हविणारा, नावाडी अमुचा ॥ ५ ॥
घटासि व्हा घट, बोध शिकविला समर्थ दासांचा ॥ ६ ॥
आत्मतत्वाचा, स्वयंस्फूर्तिचा, गड्डा बुद्धीचा ॥ ७ ॥
कवी रामाचा, थाट शाहिरी स्वराज्यस्फूर्तीचा ॥ ८ ॥

जुना मावळी मेळा १९२५.

---

# दावा गे कोणी

( चालः — पाळण्याची. )

भारत भू माय । हळहळते । धाय धाय बहु रडते ॥ धृ० ।
दावा गे कोणी । बाळगुणी । मम सौख्याची खाणी ॥ १ ॥
हें धन मानाचें । केसरिचें । हे राष्ट्रीय तेजाचें ॥ २ ॥
गीतेची मुरली । वाजविली । जनता जागी केली ॥ ३ ॥
हें पुण्य । पुण्यवान नगर विभूषण । विद्वत्तेची खाण ॥ ४ ॥
आजवरी झाले । सर्व गुणीं । ह्या सम एक न कोणी । ५ ॥
लोपुनिया गेले । अहंपण । सुखस्थान हिंदुस्थान ॥ ६ ॥
तेहतिस कोटींचें । सुखदुःख । तेंचि लोकमान्यांचें ॥ ७ ॥
ऐसा सुत गुंडा । बलवंत । त्रिभुवनि गाजे झेंडा ॥ ८ ॥
गंगाधर बाळा । स्नेहाळा । पाहुं कुठें वेल्हाळा ॥ ९ ॥
घडि घडि आठवण । गहिंवरुन । कंठ येत भरुन ॥ १० ॥
सगळें शून्यवत । तुजवीण । वाहिल चिंता कोण ॥ ११ ॥
प्रकाश अंधुकहि । ना उरला । चहूंकडे अंधार ॥ १२ ॥
चरित्र चित्रपट । मनोहर । हा सागर गंभीर ॥ १३ ॥
नैतिक कर्मबल । हा योगी । निर्मल गंगाजल ॥ १४ ॥

झुलई एकतीस । दिन नष्ट । एकोणिसशें वीस ॥ १५ ॥
निर्घृण काळानें । बाळाला । नेलें वैकुंठाला ॥ १६ ॥
चिर सुख शांती घे । वैकुंठीं । घे देवांच्या भेटी ॥ १७ ॥
भारत भूसाठीं । स्वर्गांत । बाळ जाऊनी झटत ॥ १८ ॥
विनवी देवांना । स्वराज्य मी । घेऊन जाईन जन्मीं ॥ १९ ॥

तिलक शोकगीत. १९२०.

---

# टिळककवच

राष्ट्र मुकुट झळकतो । कोहिनूर चमकतो ।
प्रकाशसूर्य प्रगटतो । तिमिर दूर लोटितो ।
स्फूर्ति वायु वाहतो । कुंद हवा पळवितो ।
कर्मयोग शिकविला । आम्र वृक्ष लाविला ।
राजशास्त्र पढविलें । राज दंड कळविले ।
मायभूमिची दशा । मीन तळमळे जसा ।
अहोरात्र झगडला । राजदंड भोगिला ।
स्वराज्य भोगणें मला । जन्म हक्क लाधला ।
सांगतो जनांप्रति । त्याविणें नसे गति ।
मोक्ष देशभक्तिला । कृष्ण सखा भेटला ।
वरदहस्त ठेविला । रहस्य ग्रंथ जाहला ।
शत्रु मित्र जाहले । मित्र चरणिं लागले ।
लोकमान्य वंदिले । राजगुरु शोभले ॥ १ ॥
अष्टपैलु हा चिरा । भंग पावे ना हिरा ।
स्वराज्यसंघ काढिला । इष्ट हेतु साधिला ।
विलायतेसि चालला । रामचंद्र शोभला ।

मजूर पक्ष वळविला । आत्मघात कळविला ।
द्या स्वराज्य मागणी । तव हितार्थ सांगणी ।
शतक वीस लागले । स्वराज्य बोलुं लागले ॥ २ ॥

परान्नपुष्ट कावळे । सोवळे न ओवळे ।
नयन असूनि आंधळे । परावलंबनामुळें ।
कर्मयोगि जन्मला । बोध जनां ठसविला ।
महाराष्ट्र हलविला । जीव त्यांत घातला ।
यादवी, पुरे करा । क्षुद्र भेद आवरा ।
देश उन्नतीविणें । काय जगुनि धिःक् जिणें ।
सुखें भीक मागुनी । वाढिली कधीं कुणीं ।
स्वराज्य कार्य सेविलें । ऋणी करोनि ठेविलें ।
उदासीनता पळे । लोकसिंधु खळबळे ।
जनप्रवाह चालला । काळ योग्य पातला ॥ ३ ॥

सार्थ नांव केसरी । वीर गर्जना करी ।
राष्ट्रतारु वल्हविलें । वादळीं बचाविलें ।
राजक्षोभ जाहला । त्यांत मार्ग काढिला ।
संकटें शत जरी । हीच परीक्षा खरी ।
कसोटिला टिकालरे । पहाल स्वराज्य भानुरे ॥ ४ ॥

धांवतसे संकटीं । अहर्नीश खटपटी ।
मद्यपान करि निषेध । अज्ञ बांधवांसि बोध ।
मद्यपान घालवा । व्यसनसक्त सोडवा ।
दिनबंधु वांचवा । मायभगिनी द्या दुवा ।
देहनाश दारूनें । देशघात दारूनें ।
आत्मघात करूं नका । देशद्रोह करूं नका ।
स्वदेशी माल वापरा । बहिष्कार ये धरा ।

माल सर्व आपुला । म्हणुनि वाढवा कळा ।
आत्मतेज प्रगटवा । मूळ वृत्ति जागवा ।
जातिभेद घरगुती । त्यजा क्षुद्र समजुती ।
निरक्षरासि साक्षर । ज्ञानदान सत्वर ।
आर्यपुत्र म्हणविणें । मातृऋण फेडणें ।
स्वावलंबना शिका । टिळकबोध आयका ।
यशोदुंदुभि वाजवी । स्वराज्यबोल ऐकवी ॥ ५ ॥
बाळ टिळक विठ्ठला । आवतार संपला ।
स्वराज्य मंदिरांतला । बाळकृष्ण चालला ।
बेल पुष्प राहिलें । स्वराज्य कार्य ठेविलें ।
टिळक गुण गाईलें । काव्यसिंधु आटले ।
काव्य छंद लागला । एक बिंदू लाधला ।
अज्ञ राम लेंकरूं । काय काव्य मी करूं ।
चार वेडे वांकुडे । असति मांडिले खडे ।
स्वराज्य कार्य चालवा । हेंच गणित सोडवा ।
स्वावलंबना शिका । टिळकबोध आयका ।
टिळक टिळक विठ्ठला । राम शरण ये तुला ॥ ६ ॥

टिळक शोकगीत १९२०.

---

# चैतन्य रवी मावळला !

( चालः— उद्धवा शांतवन कर जा )

चैतन्य रवी मावळला । शुक्राचा तारा तुटला ॥ धृ० ॥
हा नील मणी चोरोनी । मिळविलेसी काळा काय
भक्षिलीस, चुकवुनि डोळा । कां दुग्धावरली साय

वांझोटी म्हणतील आतां । ही काळी कपिला गाय
तो राजस माझा चिमणा
मम छकुला गोजिरवाणा
येईना दया कशि कवणा
गे दावा मशिं कुणि दावा । भेटवा लाडक्या बाळा ॥ १ ॥

राजकीय आखाडयांत । झुंजला बाळ नरवीर
कर्मयोग स्थापन केला । गीतेचि करी समशेर
कर्तव्य रणांगणिं घोडी । हा शिकवी चाबुकस्वार
मोहरा असा नच कोणी । झाला न पुढें होणार
ही महाराष्ट्राची आई
दुर्दैव आडवें येई
तो काळ हिरावुनि नेई
काळाच्या खोल दरींत । केसरी जाउनी निजला ॥ २ ॥

धरपडा आतां अंधारीं । हा पुण्यदीप मालवला
कोरडीं बोलकीं पात्रें । हा उगम झऱ्याचा अटला
अश्रूंच्या दर्यामाजी । लोटुनी महाराष्ट्राला
किर्र्रेशा घोर रानांत । सोडुनी महाराष्ट्राला
चाललांत वैकुंठाला
लोकमान्य बोला बोला
हा महाराष्ट्राचा झोला
कर्तव्य रज्जु वेढोनी । हलवील कोण हें बोला ॥ ३ ॥

उदयोन्मुख महाराष्ट्राला । गीतामृत पाजिल कोण
राष्ट्रीय काढुनी शाळा । कर्मयोग शिकविल कोण
राजनीति शिकविल कोण । धर्मशास्त्र पढविल कोण

गुरुमंत्र कोण सांगेल
आत्मत्व धडा देईल
अज्ञानतिमिर पळवील
अज्ञान बांधवा कोण । दे राष्ट्रहितैषी सल्ला ॥ ५ ॥

जन्मसिद्ध माझा हक्क । स्वातंत्र्य मेळविन माझें
भूमाय उद्धारायातें । सेवेचें उचली ओझें
आजन्म झिजविलें त्यानीं । चंदनापरी तनुखोड
आशांकुर भावि यशाचा । येतील फळें त्या गोड
आशेचा भावी वृक्ष
काळानें केला भक्ष
उद्यान जाहलें रुक्ष
कर्तृत्व बुडालें पीक । हा चतूर माळी गेला ॥ ५ ॥

आर्यांचा वैदिक धर्म । आर्यांचें वसतिस्थान
तात्वीक शोध लावून । राखिला आईचा मान
सोशिले कष्ट अनिवार । देशाच्या भाग्यासाठीं
काळजी न घे देहाची । उलटून जाय जरि साठी
हें कोण जाहलें नसतें । बोलणें फोल ठरणार
केलेंचि काय तें नाहीं । सांगणें कठिण जाणार
ठेविलें ऋणी महाराष्ट्र । कल्पांति जे न फिटणार
टिळकांच्या राष्ट्रिय पक्षा । काय तूं रडत बसणार
चल ऊठ लाग कार्याला
हो गुरु सवाई चेला
जो मार्ग गुरूनें दिधला
संकटें शत जरी आलीं । धुडकावुनि पुढतीं चाल ॥ ६ ॥

राष्ट्रीय तटाची भिंत । हा अभेद्य किल्ला कोट
थोपवूं रिपूंच्या रांगा । आम्हीं न देऊं त्या वाट
चालुंद्या धडाडुनि आतां । राष्ट्राचा प्रगति ओघ
खवळुंद्या उसळुंद्या लाटा । सागरापरी जनसंघ
लाविला तरू टिळकांनीं । कोणिही शकेना तोडूं
भांडणें झुगारुनि देऊं । टाळकें दुहीचें फोडूं
टिळकांचे व्हावे शिष्य । देशाच्या काजा झगडूं
द्या तिलांजली स्वार्थाला । अंशानें ऋण तरि फेडूं
ते धन्य टिळक नरवीर । टिळकांचा जयजयकार
स्फूर्तिच्या विण्याची तार । गातसे रामशाहीर
चणे खाई लोखंडाचे
मग ब्रम्हपदावरि नाचे
मार्मीक बोल तुकयाचे
निश्चयें भाग्य वांटयाला । टिळकांच्या ऐका बोला ! ॥ ७ ॥

---

# किंकाळी फोडिती घुबडें सारीं—

( चालः— सबसे राम भजन करलेना )

किंकाळी फोडिती घुबडें सारी । टिळक रवि जातां ॥ धृ० ॥
श्री टिळकांचा—राजकारणी कर्मयोगी थाट ॥
आज तयांचे चेले कांहीं निव्वळ बनले भाट ! ॥ १ ॥
कल्लोळ विजेचा तेजोमय रवि दिपवी ज़गताला ॥
आज परंतु दिसे चहूंकडे अंधकार पडला ॥ २ ॥
सिंह गर्जना जिथें गर्जली तिथें काय आज ॥
कोल्हे मूषक टुर टुर करिती नसे कुणाला लाज ! ॥ ३ ॥

कुठें हिरा तो कुठें हीर हे नथणींतील तीर ॥
शंखध्वनि करण्यांत पटाईत थूः त्यांचा व्यवहार ! ॥ ४ ॥
जोंवरी होते जिवंत स्फूर्ती सणसणीत सोटे ॥
तोंवर कोठें दडले होते नर्मदेंतले गोटे ! ॥ ५ ॥
यंव करावें त्यंव करावें ठोकिती निव्वळ गप्पा ।
प्रसंग येतां भरे कांपरें टाकित बसले धापा ! ॥ ६ ॥
श्री टिळकांच्या नांवावरती जनता झुलविती ॥
कृती होईना भाव आणिती पोकळ वरकांती ॥ ७ ॥
बलवंताची तडफ कुणीकडे धडाडी छातीठोक ॥
शिष्यगणांचा पहावा रडका देशभक्तिचा थाट ॥ ८ ॥
भारतभूच्या राष्ट्रिय पक्षा ऊठ ऊठ आतां ॥
चल सोड श्वानपण कर्मयोगी हो वंदुनि बलवंता ॥ ९ ॥

मन्वंतर मेळा.

---

# कालाय तस्मै नमः

( चालः— सबसे राम भजन )

दुर्दैव नाहिं अद्यापि संपलें, भारत देशाचें ॥ धृ० ॥
एकामागुनि एक तडाखे बसती काळाचे ।
मोहरे हरपती कार्य धुरंधर स्वराज्य चळवळीचे ॥ १ ॥
भूमातेची मौक्तिकमाला बघवेना काळा ।
बॅरिस्टर सी. आर. दास हा हिरा गळुन पडला ॥ २ ॥
स्वराज्य कलिका जों न लागते विकसित व्हायाला ।
तोंच तियेला कीड लागली दोष प्राक्तनाला ॥ ३ ॥

मतामतांचें वादळ मोठें शांत करायाला ।
　समर्थ होते दास एकटे नेते व्हायाला　　॥ ४ ॥
दणदणीत पुढारी दासांच्यासम आज नसे कोणी ।
　स्वराज्य तारूं वादळांतही वांचविलें त्यांनीं ॥ ५ ॥
कौन्सिल वरला बहिष्कार हा घातुक देशाला ।
　स्पष्टपणें हे दास बोलती मी कौन्सिलवाला ॥ ६ ॥
तेव्हांपासुन स्वराज्य चळवळ धूमधडाक्याची ।
　कौन्सिलमध्यें लढाई चाले गनिमी काव्याची ॥ ७ ॥
स्वराज्य चळवळ येऊं लागली रंगारूपाला ।
　तोंच विझाला **दास** दीप हा अंधकार पडला ॥ ८ ॥
निर्घृण काळा ! तुझी न तृप्ति झाली का अजुनी ।
　ओस पडलि का दुनिया होती दासावांचोनी ॥ ९ ॥
तूं दुर्दैवी भारत देशा खडतर नशिवाचा ।
　वरचेवर तुज प्रसंग यावा पुत्रशोक करण्याचा ॥ १० ॥

अनाथविद्यार्थीगृह, मेळा १९२६.

---

# स्वराज्यकिरणें उदया आलीं

( चालः— मी नव बाला. )

स्वराज्यकिरणें उदया आलीं ॥ धृ० ॥
शुभकर दिनकर क्षितीजा येता ।
परवशतेची रात्र संपली ॥ १ ॥
उठा बंधूनों माला गुंफा ।
जागृती कुसुमें विकसित झालीं ॥ २ ॥

झडे चौघडा नौबद् वाजे ।
ऊठ भारता मंगल वेळीं ॥ ३ ॥
स्वातंत्र्याचा असे महोत्सव ।
स्वयंस्फूर्तीची बाला नटली ॥ ४ ॥
द्वेष संपला मत्सर गेला ।
देशघातकी फूट पळाली ॥ ५ ॥
मांगल्याची पावित्र्याची ।
विजयशालिनी उषा पातली ॥ ६ ॥
काव्यस्फूर्तीची थाप डफाची ।
स्वराज्य–गीतें गाऊं लागलीं ॥ ७ ॥
आर्य सनातन सद्धर्माची ।
खुली कवाडें प्रभात कालीं ! ॥ ८ ॥

श्रीपादसमाज मेळा १९२३.

---

## स्वातंत्र्यकलश उघडावा

( चालः— सुनो सुनोजी मेरे यार )

हे दयानिधे देवा, स्वातंत्र्यकलश उघडावा ॥ धृ० ॥
ही तृषाक्रांत भू झाली, परदास्यें कोरड पडली, ।
सद्धर्म सरीता आटली, पीयूष कलश उघडावा ॥ १ ॥
मागणें तुला भक्ताचें, करि सार्थ वचन गीतेचें ।
ऐकवा गान मुरलीचें, माधवा वाजवा पांवा ॥ २ ॥
प्रख्यात कुरुक्षेत्राचें, प्रख्यात तुझ्या गीतेचें ।
तें ज्ञान विश्वधर्माचें, केशवा आम्हांला शिकवा ॥ ३ ॥

ही कर्मभूमि विख्यात, अवतरले साधूसंत ।
शिकविला जगीं वेदांत, मग आज लोप कां व्हावा ॥ ४ ॥
आत्मीक तेज दाखविसी, अज्ञान–तिमीर घालविसी ।
मीं कोण जगा शिकवीसी, हरि आज प्रत्ययां दावा ॥ ५ ॥
दुष्टांचा कर्दनकाळ, साधूंचा करि प्रतिपाल ।
करि सार्थ नांव गोपाळ, स्वातंत्र्यकलश उघडावा ॥ ६ ॥

निंबाळकर तालीम मेळा १९२३.

---

# हें महाराष्ट्र बीज

( चालः— विश्ववंद्य गणराज. )

हे महाराष्ट्र बीज, दासबोधांत ॥ धृ० ॥
रहस्य जीवन निसर्ग सुंदर, समर्थ ग्रंथांत ॥ १ ॥
जगरहाटीचें चित्र मनोहर । तात्विक वेदांत ॥ २ ॥
आधीं केलें मग सांगितलें । अनुभव सिद्धांत ॥ ३ ॥
करावयाचें लाग कराया । पुरे करी बेत ॥ ४ ॥
प्रसंग पाहुन शक्ति तोलुन, उडी संकटांत ॥ ५ ॥

बालराष्ट्र मेळा १९२४.

---

# असे हा हिंद हिंदाचा

( चालः— कवाली. )

असे हा हिंद हिंदाचा । नसे हा अन्य कोणाचा ॥ धृ० ॥
असे हा आर्य धर्माचा । हरिच्या वेद्वाणीचा ॥ १ ॥

जगाच्या मूळ धर्माचा । जगाच्या आदितत्वांचा ।
जगाला ज्ञान देण्याचा । मिळे पहिला मान गुरुचा ॥ २ ॥
हरिच्या पूर्ण प्रीतीचा । निसर्गाच्या आवडीचा ।
संत योगी तपस्व्यांचा । राजयोगी कर्मठांचा ॥ ३ ॥

स्वदेशी कन्या मेळा १९२६.

---

# कर्मयोग श्रेष्ठ

( चालः— सबसे रामभजन. )

संदेश हरीचा हाचि जगाला कर्मयोग श्रेष्ठ ॥ धृ० ॥
फलासक्तिनें कार्य यशस्वी कधीं होत नाहीं ॥
वांट्या आलें कार्य करावें भगवंताची ग्वाही ॥ १ ॥
कुरुक्षेत्रावर युद्ध कराया उभा राहिला पार्थ ॥
गणगोत पाहुनी युद्ध कशाला म्हणे नको हा स्वार्थ ॥ २ ॥
त्या वेळेला भगवंतांनीं धनंजया बोधियलें ॥
कुठवर माया ? येतील आडवें साफ पाहिजे केलें ॥ ३ ॥
धर्म सत्य हें जगवायाला कांहीं जरी केलें ॥
तरी न पाप हें समरभूमिवर भाऊबंद जरि मेले ॥ ४ ॥
वदे कसाई गाय कुणिकडे, असत्य उत्तर द्यावें ॥
धर्म सांगतो दहा जगविण्या एका मारावें ॥ ५ ॥
चोरासंगे चोर बनावें सावासंगें साव ॥
भगवंतांनीं हाचि शिकविला धनंजयाला डाव ॥ ६ ॥
नम्रपणानें कधीं कुणाचा निभाव लागत नाहीं ॥
धिटाइ खाई सदा मिठाई, न्याय जगाचा पाहीं ॥ ७ ॥

निष्काम कर्म करी तोचि नर खरा जनतेचा नेता ॥
कर्म कुणाचें चुकलें नाहीं साक्ष पटविते गीता ॥ ८ ॥
ईशें नेमुनि दिलें तुम्हां तें कार्य करीत राहावें ॥
जगत्पटावर यशापयश तें भगवंताला ठावें ॥ ९ ॥

भारतमित्र समाज मेळा. १९२५.

---

## सतीचें वाण

( चालः— तूं टाक चिरुनि ही मान. )

स्वातंत्र्य स्वर्ग सोपान । सतीचें वाण ।
वाटेंत बैसलें आडवायाला पारतंत्र्य सैतान ॥ धृ० ॥
जागजागीं खळगे खाचा । ढीगच्या ढीग काचांचा । कांटेरी निवडुंगाचा ॥
मार्ग काढुनि त्यांतून जाणें फार असें कठिण ॥ १ ॥
पर्वा न तिथें देहाची । ना गणती तिथें जखमांची । प्रत्यहीं भीति प्राणाची
निधडी छाती असेल ज्याला देशाचा अभिमान ॥ २ ॥
आजवरी कैकजण चढले । चढतांना खालीं पडले । हें असें सदोदित चाले
चढणें, पडणें, पडणें, चढणें नित्य सुरू सोपान ॥ ३ ॥
स्वातंत्र्य स्वर्गमंदीर । जावया गर्दी अनिवार । बळी तोचि पुढें जाणार ।
उठा बंधुहो जगा दाखवा भारत म्हणजे कोण ? ॥ ४ ॥

जुना मावळी मेळा. १९२४.

---

# ऊठ बांधुनी चंग

( चालः— लगाव लगाव लगे ढोल. )

चल ऊठ बांधुनि चंग । भारता । फुंक फुंक रणशिंग ॥ धृ० ॥
हा नोकरशाही जाच । हा हुतुतु नंगा नाच ।
ही अधोगतीची खांच ॥ भारता ॥
तुमच्यांत पाडुनी फूट ।
मिळविती सदोदित लूट ।
येईना कधीं त्या तूट ! ॥ भारता० ॥ २ ॥
हे होमकुंड शिक्षेचें ।
घे नित्य बळी लोकांचे ।
हे धंदे व्यूराक्रासिचें ॥ भारता० ॥ ३ ॥
ये ऊत दडपशाहीला ।
मांडिलें घोर सत्राळा ।
नावरे 'खैस' कोणाला ! ॥ भारता० ॥ ४ ॥
आसेतुहिमाचल जावें ।
जनीं करुण ध्वनि ऐकावे ।
हे असे दिवस कां यावे ? ॥ भारता० ॥ ५ ॥
येथले धंनी जे मूळ ।
ये त्यांना पडता काळ ।
ते निर्बळ बनले कूळ ॥ भारता० ॥ ६ ॥
कां पुरे न झाली झोंप ।
ओळखीं विषारी सर्प ।
रज्जुला नको म्हणुं साप ! ॥ भारता० ॥ ७ ॥
आवदसा लयाला जावी ।

सुस्थिती आपणा यावी ॥
कारणें दुहीं टाकावी ॥ भारता० ॥ ८ ॥
चल ऊठ लाग कार्याला ।
हा सांप्रत मोका आला ।
तूं अजिंक्य हो जगताला! ॥
भारता फुंक फुंक रणशिंग ॥ ९ ॥

महाराष्ट्र मेळा. १९२२

---

# स्वदेशप्रेमाश्रूंच्या लाटा

( चालः—फटक्याची. )

स्वदेशप्रेमाश्रूंच्या लाटा महाराष्ट्राभर उसळूं द्या ।
शिंग फुंकुनी मायभूमिची हाक बंधुना ऐकवूं द्या ॥ धृ० ॥
स्वतंत्रतेच्या सतारिच्या मज स्वराज्य तारा छेडूं द्या ।
भूमातेला स्वातंत्र्याचा तिलक कपाळीं लावूं द्या ॥
आत्मत्वाच्या इतिहासाचें स्वराज्यमंदिर उघडूं द्या ।
स्वातंत्र्याच्या महोत्सवाची एकच गर्दी उसळूं द्या ॥
चाल ॥ विजयी तोरण बांधूं द्या ।
मुहूर्तझेंडा रोवूं द्या ।
श्वानवृत्तिला पिटाळुं द्या ॥
महाराष्ट्राची विजय पताका नेउनि गगना भिडवूं द्या ॥ १ ॥
कलह जळूं द्या, भेद मरूं द्या, एक घोषणा होऊं द्या ।
जन्मसिद्ध मी स्वतंत्र आहे, माझें मीपण जगवूं द्या ॥
कुऱ्हाडीचे सगळे दांडे मोडुन तोडुन टाकूं द्या ।
आत्मघातकी निवडुंगाला समूळ उपटुन काढूं द्या ॥

चाल ॥ स्वतंत्रसरिता वाहूं द्या ।
स्वराज्य विरार्णे लावूं द्या ।
विकसित सुमनें होऊं द्या ।
मायभूमिचा स्वातंत्र्याचा सुखसोहाळा पाहूं द्या ॥ २ ॥
वीर मराठे मूळ वृत्तिची ओळख सकलां पटवूं द्या ।
आत्मत्वाच्या समशेरीचें पाणी रिपुना पाजवुं द्या ।
धर्मासाठीं देशासाठीं कफनी अंगा चढवूं द्या ।
समर्थगुरुचा शिवरायाचा निरोप सकलां कळवूं द्या ॥
चाल ॥ विजयी भाला चमकवुं द्या ।
नांव मराठा गर्जूं द्या ।
मायभवानिस भेटूं द्या ।
सह्याद्रीचा भक्कम पाया, स्वराज्यमंदिर बांधूं द्या ॥ ३ ॥

सार्वत्रिक मुळशी सत्याग्रह मेळा.

---

## चला या देशसेवेला

(चालः— कवाली)

चला या देशसेवेला । त्यजोनी स्वार्थबुद्धीला ॥ ध्रु० ॥
दुहीनें आजपर्यंत । कसा केला राष्ट्रघात ।
म्हणोनी ना आज तुम्ही । लोळतां दास्यपंकांत ॥ १ ॥
स्वार्थ सारा झुगारोनी । देशकार्या पुढें यावे ।
आपसांतील वैरभाव । सर्वसारे लया न्यावें ॥ २ ॥
एकिनें ध्येय साधेल । भारता सुदिन येतील ।
करामतिनें साध्य हो सारे । निराशा ठार बुडवील ॥ ३ ॥
मातृभूची हांक ऐका । चला सारे सर्व मिळुनी ।

वाद कसला करित असला। शहाणे कां तुम्ही म्हणुनी ॥ ४ ॥
कुणी सत्याग्रही म्हणतो। कुणी नाफेर फेरवाला।
मातृभूला स्वराज्याचे। घिवर मांडे खाऊं घाला ॥ ५ ॥
वाद भेदा मरूं द्यानां। दुहीला द्या, मूठमाती।
फितूरीला, तिलांजलि द्या। कसा लावा मातृभक्ति ॥ ६ ॥

भारतमित्र मेळा १९२४.

---

# देशार्थ देह झिजवा

( चाल— भाइहो रडत बसणार. )

देशार्थ देह झिजवा। रणीं लढवा।
हिन्द देश हा हिन्दांकरितां स्पष्ट जगा कळवा ॥ धृ० ॥
आमुचा देश आम्हांला। तो जरी कसाहि असला।
नको उठाठेव दुसऱ्याला।
आम्हीं आमुचे पाहुन घेऊं, स्पष्ट जगा कळवा ॥ १ ॥
येथलें धान्य धन आमुचें। ईश्वरें दिलें हक्काचें
स्वातंत्र्य बहु मोलाचें।
निसर्गनिर्मित प्रकाशतारा, स्पष्ट जगा कळवा ॥ २ ॥
वेदांत ज्ञानभांडार। हें असे मोक्षमंदीर।
धार्मीक तेज खंबीर।
श्रीहरीची ही निवासभूमी, स्पष्ट जगा कळवा ॥ ३ ॥
श्रीहरी घेत अवतार। जाहले पुढें होणार।
जाणार लयाला असुर।
झगडत राहूं स्वराज्य मिळवूं, स्पष्ट जगा कळवा। ॥ ३ ॥

राष्ट्रहितैषी मेळा.

---

# सुंदर मंदीर

( चाल— असा मोहरा झाला नाहीं. )

राजशास्त्र हें कर्तृत्वाचें सुंदर मंदीर
तिथें जावया अवश्य लागे शक्तीचा जोर ॥ धृ० ॥
उदात्त तत्त्वें ठेवुन केवळ नाहीं भागणार
धकाधकीचा इथें मामला कोण सोसणार ॥ १ ॥
सामर्थ्य पाहिजे अंगामध्यें मनगटांत जोर
कॉलेजांतिल ज्ञान पुस्तकी पोकळ ठरणार ॥ २ ॥
बालपणीचीं कमावलेली शरीरसंपत्ती
जीवितयात्रा सुखकर व्हाया राहे सांगाती ॥ ३ ॥
ऐहिक जग हें, मान मरातब नसे निर्बलाला
शक्ति पाहिजे परिस्थितीशीं टक्कर द्यायाला ॥ ४ ॥
निःसत्व बालकें झालि निकामी, शक्ति नसे म्हणुनी
स्वतंत्रतेच्या उच्च कल्पना जाति सर्व जिरुनी ॥ ५ ॥
उपयोगि कधींही पडे न केवळ तात्विक वेदांत
शक्ति युक्तिची जोड लागते अनादि सिद्धांत ॥ ६ ॥
देश उद्धरावया कारणें शक्ती कमवावी
राजकारणी नंतर आपुली बुद्धि चालवावी ॥ ७ ॥
आर्यभूमिचीं तुम्ही बालकें भावी आधार
शक्तीच कमवा स्वराज्यांतले व्हा घोडेस्वार ॥ ८ ॥
शक्तीशी शक्तीच पाहिजे युक्तीशी युक्ती
सूत्र वाक्य हें शिकाल तेव्हां स्वतंत्रताप्राप्ती ॥ ९ ॥

राष्ट्रहितैषी मेळा.

# प्रभू तारी भारतभूला

## सद्यः स्थितीवर पोवाडा

( चालः-- इतिहास पुराणी लिहिला )

प्रभू तारी भारतभूला । कठिण हा पातला घाला ।
( चाल ) शोधिता राजद्रोहाला । दक्षिणेंत मोर्चा फिरला ॥
मांडिलें घोर सत्राला । हो मुंबईला ॥ धृ० ॥
मंडलिक विहारीवाला । कुंडांत प्रथम तो पडला ॥
वर्षद्वय भोगायाला । कारागृह मिळलें त्याला ।
( चाल ) ते स्वराज्य हिंदी दुसरें । सावज किं सत्वर घसरें ।
ठाण्यावर आलें वारें । स्वःकाराला ॥ १ ॥

अरुणोदय फडके यांनीं । इंग्रजी पत्रा बघुनी ॥
जरी केली नक्कल जपुनी । आहुतीस ने ओढोनी ।
आठ मास बंदीखानीं । लोटला, ऐकला कानीं ॥
(चाल) मुंबईचीं सावजें सरलीं । परि पुण्यांत मोठीं उरलीं ॥
पारधी मंडळी फिरली । वेढा दिधला ॥ २ ॥

वाघोबा काळा धरती । मुंबईला खेंचुनि नेती ॥
ॲस्टना पुढें ढकलीती । नांवासम केली कीर्ति ॥
(चाल) नच वकिल दिला काळानें । हायकोर्टि स्वतः धैर्यानें ॥
बहु केलें भाषण मानें । अविचारच झाला ॥ ३ ॥

हो विटंबना न्यायाची । आहुती पडे **काळाची** ।
न्यायनीति इंग्लंडाची । गेली ती वाया साची ।
एक वर्ष सात महिन्यांची । दिली सजा सक्तमजुरीची ।
(चाल) मुंबईस 'सिंह' तो होता । काळाचे कामाकरितां ।
अस्ताचल भानू असतां । पोलिस आला ॥ ४ ॥

बा. गं. टि. निर्भयें चित्तीं । वारंट पाहतां उठती ।
पोलिसासवें ते जाती । चौकीवर जाऊनी बसती ।
सौभाग्यतिलका नेती । आर्य भूरत्न चोरीती ।
(चाल) राष्ट्रावर संकटमाला । येत ती दावायाला ।
सावध जो करि सर्वांला । त्यावर घाला ॥ ५ ॥

नऊ लोक ज्यूरीचे कोण । हिंदु नच, पारशी दोन ॥
बाकी सात यूरोपियन । आशेची ही धुळधाण ॥
समजेना मराठी कोणा । मत देणें त्यांचा बाणा ॥
( चाल ) पुरावा न गोळा झाला । जामीन घेति नच त्याला ॥
**बलवंत** तरि न घाबरला । बोलायाला ॥ ६ ॥

एकवीस तास तो बोले । कायदा कलम समजविलें ॥
ती सभा सगळी डोले । कोठें त्या उपमा न मिळे ॥
जागजागीं शिपाई बसले । रस्त्यावर कोणि न चाले ॥
( चाल ) कडेकोट तयारी केली । चहूंकडे गर्दी बहु जमली ॥
दंग्याची भीति पडली । सरकाराला ॥ ७ ॥

हा पोपट मोर्ले कानीं । सांगतो हळुच शब्दांनीं ॥
द्या तिलका काळें पाणी । जाई राष्ट्रपक्ष मोडोनी ॥
या घरच्या घरभेद्यांनीं । कशि कसाब केली करणी ॥
( चाल ) चहाडीखोर घरांतील असतां । दुसऱ्यांस दोष कां देतां ॥
ते तयार भारत माता । कापायाला ॥ ८ ॥

कायदा कोर्ट सरकारी । ते न्यायदेवता मारी ॥
खाटीक झाली ज्यूरी । घेतली लेखणी सुरी ।
ती हिन्दु काळजा भारी । झोंबली कोण त्या तारी ।
(चाल) आश्चर्यचि त्या बुधवारीं । हायकोर्ट होय निशिचारी ।
गुपचीप कृत्य करिती परि । बेतच फसला ॥ ९ ॥

गुरुवारीं प्रातःकाळीं । चहुदेशीं वार्ता कळली ।
हाय ! न्यायदेवता मेली । हिन्दबाला, सुतकी बनली ।
रडतची आर्यभू बसलीं । प्रियवस्तु तिची कां नेली ।
(चाल) जनहीत सदोदित चिंती । जन त्याला पूजित चित्तीं ।
तो उपटूं ही हो कुमती । सरकाराला ॥ १० ॥
'बालाचि' कराया फेड । मजुरांनि मांडिला मांड ।
व्यापार पडे मग थंड । बहु चिडे मुंबई खंड ।
गिरण्यांतुनि झाली झुंड । सरकार म्हणे हें बंड !
दिन सहा सोडिती काम । सत्पुरुषावरचें प्रेम ।
भेटवा म्हणती प्राण । त्यास कां देतसा शीण ।
(चाल) ठायिं ठायिं गर्दी जमली । मोडण्यास पलटण आली ।
आटपे न वर्दी दिधली । गोळ्या घाला ॥ ११ ॥
किति लोक नाहक मेले । मुंबईत लष्कर भरलें ।
निशस्त्र बिचारे दुबळे । त्यांच्यांत शौर्य गाजविलें ॥
(चाल) टिळकांना वर्षें साहा । ठेवतील तितके दिन हा ।
बसणार आम्हि घरीं पहा । हट्ट तो धरला ॥ १२ ॥
राष्ट्रहिरा नेल्यावरती । स्वारि ये शिक्षणावरती ।
**विजापूरकरांना** धरिती । विद्यालय समर्थ म्हणती ।
तच्चालक **जोशी** यासी । छत्रपति ठेवि बंदीशी ।
**देशसेवक** नागपुरीचा । तो हिन्द केसरी साचा ।
सर्वांचा एक हमामा । मांडियला काय रिकामा ।
(चाल) हो जळीं स्थळीं कृष्ण जसा । कीं मानुनिया कंस कसा ।
फसतसे सर्व जागीं तसा । बॉंबहि गमला ॥ १३ ॥
हरिकिशोर **भाव** याला । पांच वर्षे तुरुंगचि झाला ।
राजद्रोह खटला झाला । **लिमयावर** सोलापुरला ।

फेंकितो बॉंव **खुदिराम** । परि त्याचा चुकला नेम ।
मग त्याला दिधला फांशीं । मारि गोरा नेटिवाशी ।
दंडावर सुटतो खाशी । न्यायाची थट्टा ऐशी ।
हा न्याय असे जातींचा । हा न्याय असे शक्तीचा ।
(चाल) हा न्याय दिने स्वार्थाचा । सरकाराला ॥ १४ ॥

सत्रांत पडे मद्रास । जन्मठेप **पिल्ले** यांस ।
शिवगुरु आणि स्वामीस । दहा बरस देत शिक्षेस ।
**ब्रम्हण्य अयर** मित्रास । अव्हान होई सत्रास ।
नच देत तया शिक्षेस । दुर्दैवि अयर हो खास ।
(चाल) द्वय पिले आणि गुरुनाथ । पंच बरस जाती तुरुंगांत ।
लोक नाथा वर्षे सात । दे भोगाला ॥ १५ ॥

या राजद्रोहसत्रांत । किति आहुत्या पडती सतत ।
नसे गणती बंगाल्यांत । बाल वृद्ध निवड नसत ।
परि इकडे **देशी विजय** । **परमाल पडे धुळ खाय** ।
(चाल) कार्याचा निश्चय होय । मधुर फळें अंतीं सहाय ।
आनंद होत असमाय । भारतभूला ॥ १६ ॥

ब्राह्मण सुशिक्षित असती । सर्वांत श्रेष्ठ म्हणवीती ।
उपदेश स्वदेशी करिती । परदेशी माला घेती ।
नच लज्जा त्यांच्या चित्तीं । चापोनी भलतें खाती ।
(चाल) **घरभेदपणाला सोडा । निज देशभक्तिला जोडा** ।
तरि नवीन धंदे काढा । या समयाला ॥ १७ ॥

नच राजद्रोह टिळकांचा । म्हणती तो वीर न कच्चा ।
घात करी दारू आमुचा । पक्ष ती बंद करण्याचा ।
हरएक गुत्त्याजवळी । उभी स्वयंसेवक टोळी ।
दारूबाजांचे धरिती पाया । म्हणे द्रव्य न दवडा वाया ।

ठेव म्हणे सदृढ काया । देति दुवा आया बाया ।
(चाल) पिकेटिंग फक्त करण्याला । आरंभ पुण्याला झाला ।
जोडिलें बहुत पुण्याला । दोषच ठरला ॥ १८ ॥
मुंबईस जाय बलवंत । मजुरांना उपदेशीत ।
सोडाया दारु लावीत । सन्मार्ग तया दाखवीत ।
द्रव्याशीं बसला चिमटा । शिस्तिचा सलतो कांटा ।
आणिला आरोपहि खोटा । दाविला कळवळा मोठा ।
पिकेटिंग धनाची सारी । ही वृथा सबब सरकारी ।
(चाल) पिकेटिंग मुळे हो दंगा । हा आव **धनाचा** पिंगा ।
घालुनि काय हा नंगा । नाच तो केला ॥ १९ ॥
टिळक ते सदोदित झटले । दंडाचे रुपयें भरले ।
शेवटीं म्हणुनि त्या नेलें । तोंडास कुलुप लाविलें ।
(चाल) जाती देश सोडुनी पाल । तैसेचि पंजाबी लाल ।
मग उरले सारे हाल । भारतभूला ॥ २० ॥
बंधुनो, देशसेवेची । मति धरा उद्योगाची ।
धुळधाण उडे देशाची । कां तुह्मां हौस बसण्याची ।
आठवा वाडवडिलांची । कशी करणी होती त्यांची ।
विनती करी तुम्हां राम । घ्या देशसेवेचें काम ।
घ्या गणरायाचें नाम । या समयाला ॥ २१ ॥
अन्याया भरती आली । न्यायनीति सत्यता बुडली ।
राजनीति ऐशी झाली । कुणि नुरला अमुचा वाली ।
प्रळय काळ वेळा आली । प्रभु धांव संकटकालीं ।
( चाल ) हीं सर्व दुरीतें वारी । गणराय तूंच कैवारी ।
बा **भारतभूला** तारी । हे **शिववाला** ॥ २१ ॥

हिंद समाज मेळा.

———

# असे लाडका सह्याद्रीचा–

चालः— फटक्याची.

असे लाडका सह्याद्रीचा महाराष्ट्र बोला ।
महामंत्र जप पावित्र्याचा रघूवीर बोला ॥ धृ० ॥
शिवराजाची जन्मभूमि तूं मंगल शिवनेरी ।
सह्याद्रीच्या महाराष्ट्राला शिकवी रणभेरी ॥ १ ॥
प्रतापशाली विजयी भाला नेउनि अटकेला ।
धन्य काळ तो महाराष्ट्राचा झेंडा फडकविला ॥ २ ॥
शिवबाजीच्या प्रभावळीची प्रभा तेजदार ।
महाराष्ट्र मुगुटीं झळकती मोतिं पाणिदार ॥ ३ ॥
हे दख्खनचे वीर मराठे स्वयंस्फूर्तिवाले ।
परिस्थितीला पडताळोनी तेजा प्रगटविलें ॥ ४ ॥
अटकेसन्निध सिंधुनदाचें पाणी प्यायाला ।
भीमथडीचीं तट्टें नेऊनि झेंडा रोंवियला ॥ ५ ॥
धर्मरक्षणा कुणी धाडिलें वारकरी संत ।
तूंच शिकविला क्षात्रवृत्तिचा महाराष्ट्र पंथ ।
भगवा झेंडा महाराष्ट्राचा रामदासि पेशा ।
परंपरेची स्फूर्तिदेवता गेली वनवासा ॥ ७ ॥
इतिहासाच्या उज्ज्वलतेची जागृति ठेवावी ।
गमिनी कावा महाराष्ट्राचा संस्कृति राखावी ॥ ८ ॥
ऊठ भारता पहा पहा रे हिमालयावरतीं ।
हिंद–देवता बसून पाहे, काय पुत्र करिती ॥ ९ ॥
हतबल झालीं दीन लेंकरें तुकड्याला महाग ।
काय करावें आज तयांनीं भगवंता सांग ॥ १० ॥
असाह्य झाली कपिला धेनु दुःखाश्रू गाळी ।

उठा सत्वरीं घ्या अवतारा श्रीहरि वनमाळी ॥ ११ ॥
साधी भोळी काव्यवैखरी राम शाहिराची ।
आहे जागीं वाट पाहते स्वराज्यउदयाची ! ॥ १२ ॥

अनाथविद्यार्थी गृह १९२२

---

## भारतभूच्या अवनत काला

( चालः— गड आला पण सिंह. )

भारतभूच्या अवनतकाला चल हो बाजूला ।
होमरूलचा राम जन्मला लंकादहनाला ॥ धृ० ॥
लोकशाहिची पवित्र गंगा वाहतसे सरिता ।
मांगल्याचा सुयोग आला महाराष्ट्राकरितां ॥ १ ॥
प्रभाकरा ये सगनभाउ ये, ये ये होनाजी ।
गोविंदाग्रज विनायका ये केशवसुत आजी ॥ २ ॥
सह्याद्रीचे तुम्ही लाडके जिवंत शाहीर ।
निसर्गस्फूर्ती–वारूवरती चढवा खोगीर ॥ ३ ॥
थाप डफाची जोड स्फूर्तिची शाहिरि पेशाला ।
आज पाहिजे जिवंत वाणी वाङ्मयकोशाला ॥ ४ ॥
पुढें हजारों किरण शिपाई प्रकाश देवीचे ।
दिशा उजळल्या स्वागत करण्या स्वराज्यभानूचें ॥ ५ ॥
निशा संपली ऊठ भारता कुक्कुट आरवला ।
थाट शाहिरी थाप डफाची घेउनियां आला ॥ ६ ॥
सह्याद्रीचे वाहति वारे तसे गोड नीर ।
इतिहासाला जगवायाला हे गड शाहीर ॥ ७ ॥
सिंहगडा तूं रायगडा ये मंगल शिवनेरी ।

प्रतापगड रांगणा खिंडि गे वाजिव रणभेरी ॥ ८ ॥
या या सगळे महाराष्ट्राचे कलिजे शाहीर ।
काव्यौघाचे पाट वाहुंद्या येऊं द्या पूर ॥ ९ ॥
परिस्थितीनें काल बदलला रंग नकाशाचा ।
इतिहास घडतसे उत्क्रांतीचा नवयुग जागृतिचा ॥ १० ॥

ऐक्यवर्धक मेळा १९२०.

---

## वीरमाता कधीं होणार ?

( चालः—कवाली. )

तुम्हीं ललना वीर कन्या वीर माता कधीं होणार ॥
सुभद्रेचा धन्य कुसवा अभिमन्यु बाळ वीर ॥ ध्रु० ॥
बाळ प्रल्हाद ध्रुव तैसा अढळ तारा कोहिनूर ।
शिवाजीला बनवी राजा वीर माता जिजाबाई ॥ १ ॥
वीर कन्या होऊं शकते महाराणी लक्ष्मीबाई ।
वीर युवती तीच होते वीर कांता वीरमाता ॥ २ ॥
आज तुम्हां मायभूमी हाक मारी उठा आतां ।
मायभूच्या रक्षणाचें कार्य आहे आपणांला ॥ ३ ॥
मराठयांचा वीर कुसवा या पुढें का वांझ होणार ।
पूर्वजांचें स्मरण करुनि भगीनींनो पडा बाहेर ॥ ४ ॥

जुना मावळी मेळा, १९२३

---

# स्वातंत्र्यसंगरीं लढला

(चालः—आजि हौस जिवाची पुरवा.)

स्वातंत्र्यसंगरीं लढला । तो देह चिरंजिव झाला ॥ ध्रु० ॥
कडेपठार सह्याद्रींत । गवसले हिरे खाणींत ।
शिवराय छत्रपति झाला ॥ १ ॥
रणशूर मावळा तान्हा । देशार्थ अर्पि तो प्राणा ।
प्रभु बाजी करामतवाला ॥ २ ॥
धर्मार्थ राज संभाजी । डरला न मृत्युला गाजी ।
अलमूगीरनें छळियलें त्याला ॥ ३ ॥
संताजी धनाजी वीर । मावळे कैक झुंजार ।
जोहार तयांनीं केला ॥ ४ ॥
मल्हारराव होळकर । जनकोजी शिंदे रणशूर ॥
रणशार्दूल बाजी झाला ॥ ५ ॥
चिमाजी आप्पा वसईंत । दाखवी फिरंग्या हात ।
हिंदुधर्म तारायाला ॥ ६ ॥
गर्जला भाऊ झुंजार । देशार्थ करुनि जोहार ।
दाखवी क्षात्रतेजाला ॥ ७ ॥
पाटील बुवा शिंद्याची । चमकली फेंक भाल्याची ॥
शह दिला थेट दिल्लीला ॥ ८ ॥
गोखले बापू झुंजार । ही अखेरची समशेर ।
पडतांचि, दास्य देशाला ॥ ९ ॥
महाराष्ट्रीय गनिमी कावा । जरीपटका झेंडा भगवा ।
हा ! हाय दिवंगत झाला ॥ १० ॥
इतिहास धडा गिरवावा । ध्येयार्थ मार्ग काढावा ।
ओळखा नव्या काळाला ॥ ११ ॥

जय भवानिकी जय बोला । जय महाराष्ट्र जय बोला ।
जय वंदेमातरम् बोला ॥ १२ ॥

कुंजीर तालीम मेळा

---

# बाळटिळक धन्य

( चालः—असा मोहोरा )

धन्य धन्य जय, जयजय बोला बाळ टिळक धन्य ।
कर्मयोगि आणि राजयोगि हे धन्य लोकमान्य ॥ ध्रु० ॥
लोकशाहीच्या मुगुटावरला हिरा कोहिनूर ।
देवेंद्र येउनि घेउनि गेले ठेवियली गार ॥ १ ॥
रणसिंह टाकुनि गेला म्हणुनि काय स्वस्थ बसणार ? ।
स्वराज्यप्राप्ती ध्येयासाठीं काय पुढें करणार ? ॥ २ ॥
हा ध्रुवतारा किर्तीरूपें झळकत राहील ।
महाराष्ट्राला स्वयंस्फूर्तिचा प्रकाश देईल ॥ ३ ॥
चला उठा रे शिष्य म्हणविणें फुका न टिळकांचें ।
व्रत पाळावें असें लागतें समर्थपंथाचें ॥ ४ ॥
काय सांगुनि गेले अपणा बोध आठवावा ।
' शठयं–शाठय ' हें सूत्र शिकविलें स्वराज्यदिन यावा ॥ ५ ॥
श्री टिळकांचा अभयवर असे पूर्ण आपणांला ।
काय उणें मग चला लागुं या स्वराज्यसेवेला ॥ ६ ॥
वैकुंठपुरीला देवगणांचा भरतां दरबार ! ।
बाळ प्रतिनिधी आपल्यातर्फे तिथें बोलणार ॥ ७ ॥
साह्य तयांचें पुनरपि घेऊनि येतिल या ठायां ।
स्वराज्यार्थ हे प्रयत्न त्यांचे जाति न कधिं वाया ॥ ८ ॥

महाराष्ट्राच्या परंपरेची लज्जा राखावी ।
तरुण वर्ग हो ! बलवंताची आज्ञा पाळावी ॥ ९ ॥

टिळकरोड सत्याग्रह मेळा १९२१

---

# दख्खनची गर्जना.

( चालः--कांहीं झालें तरी शेवटीं पगडी )

दख्खनची गर्जना श्री टिळकांची वाजे रणभेरी ॥ ध्रु० ॥
होमरूलची प्राणप्रतिष्ठा करावयासाठीं ।
कष्ट जिवाला कितीक पडले भुतें लागतां पाठीं ॥ १ ॥
वदे निश्चयें ‘ स्वराज्य माझा जन्मसिद्ध हक्क ’ ।
अलम् दुनियेला निरोप ऐसा कळवि छातीठोक ॥ २ ॥
कोर्टामार्जी किंमत ठरली ‘ स्वराज्य ’ शब्दाची ।
चळवळ करुनी बंद पाडली टुरटुर कोल्ह्यांची ॥ ३ ॥
आधीं केलें देशस्थितीच्या निदान रोगाचें ।
त्यावर लावी जलाल औषध अचूक वर्माचें ॥ ४ ॥
धडाडिनें ही जनतेमार्जी खळबळ उडवीली ।
सर्व बाजूच्या विरोधकांची हकालपट्टी केली ॥ ५ ॥
गोष्ट घेतली करावयाला त्यांत न माघार ।
श्रीटिळकांच्या कर्तृत्वाचें हेंच बीजसार ॥ ६ ॥
भवितव्यता जाणुनि आधीं योजि उपायाशीं ।
दूर दृष्टिची काय कुशलता बलवंतापाशीं ॥ ७ ॥
दुर्दैवाची कमान चढती बाल दिवंगत झाला ।
होमरूलचा आशा-तरूचा कोंब करपुनी गेला ॥ ८ ॥
विस्कळीत जी घडी जाहली न ये घालता कोणा ।

कार्यचिकाटी कुणांत नाहीं मतें वदलतीं नाना ॥ ९ ॥
कर्तृत्वाच्या विश्वासाचा कुणा न आधार ।
बाळ कोहिनुर हिरा हरपला खालीं राहिलें हीर ॥ १० ॥
जो बाळानें मार्ग तुम्हाला दिला असे आंखून ।
त्यांतच आहे स्वराज्यप्राप्ति नको मार्ग भिन्न ॥ ११ ।
देशबंधुना हीच विनंती भारतमित्राची ।
ध्येय साधण्यासाठीं पाळा आज्ञा बाळाची ॥ १२ ॥

भारतमित्र मेळा.

---

# चला फोडा निराशेच्या फत्तराला !

( चालः— कवाली )

मिळेना देश भिक्षेनें । मिळेना देश वादानें ।
मिळेना देश शांतीनें । मिळेना देश गोडीनें ॥ १ ॥
मिळावा देश जरि वाटे । तरी मोहासी द्या फाटे ।
त्यजा स्वार्थांध बुद्धीला । एकमेकांमधील तंटे ॥ २ ॥
खेळुनी गनीमी कावा । देश आपुला मेळवावा ।
बंधुनो कार्य करितांना ऐतिहासिक दृष्टि ठेवा ॥ ३ ॥
शिवाजी, बाजी, येसाजी । वीर तान्हा नका विसरूं ।
स्वराज्याचे धडे शिकण्या । गुरु आपुले धैर्य मेरु ॥ ४ ॥-
चला उठा चला फोडा । निराशेच्या फत्तराला ।
रान दुहिचें खच्चि करुनि । सुधारावा मार्ग आपुला ॥ ५ ॥

जुना मावळी मेळा १९२३.

---

# हरहर जय बोला

( चालः— सबसे राम भजन. )

विजयीं गर्जना शुभदिनीं बोला हरहर जय बोला ॥ धृ० ॥
अमोलिक ही मंगल वेळा दवडुं नका वाया ।
लोकशाही ही पवित्र गंगा आली तुम्हा भेटाया ॥ १ ॥
त्या वेळेला गृहकलहांचें भूत गाडुनी टाका ।
स्वराज्यार्थ तुम्ही मतामतांचा नका चालवूं हेका ॥ २ ॥
निराशतेचे फत्तर फोडुनि मार्ग आक्रमावा ।
कार्य चिकाटी निश्चय बल फल मधुर खवा मग खावा ॥ ३ ॥
केविलवाणी स्थिति कशानें देशाची झाली ।
ध्यानीं आणा सत्वर आतां एकी पाहिजे केली ॥ ४ ॥
राष्ट्रहिताच्या आड येतसे क्षुद्र स्वार्थ तुमचा ।
मायभूमीच्या कल्याणास्तव करा होम स्वार्थाचा ॥ ५ ॥
महाराष्ट्र केसरी छावे तुम्हि, आज मेंढरें बनला ।
ह्याचें कारण परंपरेचा इतिहास पारखा झाला ॥ ६ ॥
इतिहास आदर्शामध्यें पहावें आत्मस्वरूप आपुलें ।
कळोन येईल आपण मराठे शिवाजीचे चेले ॥ ७ ॥
उठा बंधुहो उठा उठा रे वेळ नजिक आली ।
कराल कांहीं आजच होईल ! पुन्हां वेळ ही गेली ॥ ८ ॥

सार्वजनिक काका मेळा.

———

# टाकून घोर निद्रा

( चालः--हा हिंद देश माझा. )

टाकून घोर निद्रा । चल ऊठ हिंदबाला ॥ धृ० ॥
देशार्थ देह झिजवा । धर्मार्थ देह लढवा ॥
कर्तव्य दीप लावा । द्या सौख्य मायभूला ॥ १ ॥
भूमाय दीन दुबळी । तारील कोण तिजला ।
टाकून द्या दुहीला । तिजपायिं घात झाला ॥ २ ॥
अभिमानशून्य बनला । त्यानेंच देश बुडला ।
परदेश मोहनीला । भुललांत ठार झाला ॥ ३ ॥
आत्मत्व तेज दावा । मन हें स्वतंत्र ठेवा ।
इतिहासबोध सेवा । टाकून द्या भिकेला ॥ ४ ॥
मागून काय मिळतें । तंडून काय मिळतें ।
रुसण्यांत काय मिळतें । दवडा न पर्वकाला ॥ ५ ॥
या सर्व हिंदभाई । भू-माय हाकि मारी ।
कलिकाल भार झाला । कशि झोंप ये तुम्हाला ॥ ६ ॥
कर्तव्यसंगरांत । ना भेद जात गोत ।
व्यामोह सोडूनी द्या । मिळवाल भाग्यश्रीला ॥ ७ ॥

जुनां मावळी मेळा १९२७.

---

# चल ऊठ भारता ऊठ

चल ऊठ भारता ऊठ । घे कर्म-योग तलवार ॥ धृ० ॥
तुज विचार कसला पडला ।
करूं काय ? म्हणत कां बसलां ।

का हताश पंगू बनला ।
चल सोड निराशा ऊठ । घे कर्म-योग तलवार ॥ १ ॥
चहूंकडे दृष्टी रोखावी ।
कार्याची दिशा ठरवावी ।
ना ढळूं स्थिरता द्यावी ।
कर्तव्यपालनासाठीं । घे कर्म-योग तलवार ॥ २ ॥
मुरदाड आळशा वाणी ।
वाढीना भीक तुज कोणी ।
कां बसला दिनावाणी ।
चल तुझें तूंच मिळवाया । घें कर्म-योग तलवार ॥ ३ ॥
आपुलें आपण मिळवावें ।
आपुलें आपण राखावें ।
कर्तव्य पार पाडावें ।
निश्चयें भाग्य वांट्याला । घे कर्म-योग तलवार ॥ ४ ॥
गीतेचे मार्मिक बोल ।
गंभीर अर्थ बहु खोल ।
जीवाचे जीवा मोल ।
हें रहस्य गीतासार । घे कर्म-योग तलवार ॥ ५ ॥

जुना मावळी मेळा १९१७.

---

# नसे टिकाऊ एकतंत्रि सत्ता

( चालः— हा उलट कलीचा काळ )

ह्या अखिल जगामध्यें नसें टिकाऊ एकतंत्रि सत्ता ॥ धृ० ॥
चिरकाल टिकेना गोष्ट एकही घडामोड नित्य ।
प्रत्येक आदिच्या अंत नशीबा निसर्ग सिद्धांत ॥

सम्राट जाहले कैक तयांचा मागमूस नुरला ।
काळ पाश हा देव दानवां नाहीं कुणा सुटला ॥
( चाल ) स्थिर कांहीं नाहीं जगतांत ।
जगतांत नाहीं अभिमान कुणाचा टिकत ।
ना टिके राजमद क्षणांत नक्षा जिरत ।
जिरणार गुर्मि जे अहंमन्य ताठ्यांत ॥
ताठ्याचा शेवट नाश होय हालांत ।
नांदते । दंडिले तिथें । स्वैर वागते । लयाला जातां ॥ १ ॥

चाले न अबाधित राज्य कोणतें नित्य बदल होतो ।
आज ना पूर्वींचा उद्यां न आजचा काळ फिरत राहतो ॥
उदयास येत जो तया पाठिचा अस्त कधिं न चुकतो ।
कांहीं काळ जरि रवि मावळला दिक्कल्पांति पुन्हां येतो ॥
( चाल ) वैभवा आज जे चढले ।
चढलेच रंगले गर्वानें ते फुगले ।
फुगलेच धुंदिनें मदोन्मत्त बनले ।
बनलेच असें जें मरण जवळ त्यां आलें ॥
आलेचि भाग्यदिन, दास्य पर्कि जे रुतले ।
जो चढे । उद्यां तो पडे । पुन्हां तो चढे । खेळ ना सरतां ॥२॥

हे ब्रिटानियेचे नोकरशाही पुरे तुझी ऐट ।
तूं खूप समज गे आम्ही आपुला पुन्हां मिळवुं थाट ॥
कां मदांध झालिस कैक जणांची लाविलीस वाट ।
वाढून ठेविलें असें तुज पुढें अधोगती ताट ॥
( चाल ) सद्दिचें चक्र तें फिरतें ।
फिरवोनि जगाला पापपुण्य दाखवितें ।
दाखवी रहाटी कशी दृष्टीला पटते ।

पडते न कुणी गे सदि जोंवरी असते।
असतेंच तयाचें भाग्य लयाला जाते।
हें असें। चक्र फिरतसें। चिरंजिव नसे। कुणाची सत्ता॥ ३॥

भारतमित्र समाज मेळा १९२५

---

# द्यावा ठोशासि ठोसा !

( चालः—नारायण अडला. )

ही टिळकनिती परिसा। द्यावा ठोश्यासि ठोसा॥ ध्रु०
नम्रपणानें काय कुणाचें कार्य तडीला गेलें।
प्रसंग येईल तसे वागती तेंच शहाणे ठरलें॥ १॥
साम दाम हा कुठें योजणें दंड भेद ही नीती।
राजकारणीं कळे न हे ज्या तेच पुढारी फसती॥ २॥
मागे पुढती चहूं बाजूला नजर खेळती ठेवी।
तोचि खरा मुत्सद्दी धोरण दूरदृष्टिनें ठरवी॥ ३॥
केव्हां कोठें प्रतिपक्षासी समोर करणें झुंज।
प्रसंग पाहून पडतें घेणें हीच यशस्वी मौज॥ ४॥
शिवरायानें ह्याच धोरणें स्वराज्य स्थापन केलें।
पडतिल दृष्टीस कैक दाखले इतिहासांतरी असले॥ ५॥
समबल योध्दे दोन्ही बाजूंचे तेथें एकी होते।
बलवानाचे कमकुवतासी घटकाभर ना पटते॥ ६॥
हिंदुमुसलमानांची एकी केव्हां होणें शक्य।
दोन्ही जातिचि समान ताकद होईल तेव्हां ऐक्य॥ ७॥
शक्ति आपुली अजमावोनी रिपुशीं टक्कर द्यावी।
ताकद नसतां प्रसंग पाहुन वेळ निभाउन न्यावी॥ ८॥

जसें असावें तसें दिसावें ह्यांत वावगें काय ।
वाऱ्यासंगे पाठ फिरविणें हाचि जगाचा न्याय ॥ ९ ॥
जागृति ठेवा, कुण्या दिशेचा कसा वाहतो वारा ।
देशबंधुहो आपापसांतील दुराग्रहातें वारा ॥ १० ॥

सन्मित्र समाज मेळा सन १९२५.

---

# बजाव बजाव रणडंका

( चालः— लगाव लगाव लगे ढोल. )

बजाव बजाव रणडंका ॥ भारता ॥ बजाव बजाव रणडंका ॥ धृ० ॥
तूं मायभूमिचा चिमणा । तूं बालक गोजिरवाणा ।
तूं मोती सुर्ती दाणा ॥ भारता ॥ १ ॥
कर्तव्य करीं घे भाला । तुज सांप्रत मोका आला ।
चल ऊठ लाग कार्याला ॥ भारता ॥ २ ॥
पूर्वीचा मिळवा थाट । छातीचा करणें कोट ।
बघुं नका कुणाची वाट ॥ भारता ॥ ३ ॥
जो बसला दीनवाणी । त्या जगीं विचारि न कोणी ।
हें तत्त्व आण तूं ध्यानीं ॥ भारता ॥ ३ ॥
बोलणें टाकुनि द्यावें । करणेंचि करोनि जावें ।
आपुलें ध्येय गांठावें ॥ भारता ॥ ५ ॥
टाळकें दुहीचें फोड । हें भूत फितुरिचें गाड ।
चल श्वानवृत्ति तूं सोड ॥ भारता ॥ ६ ॥
इतिहास पुढें ठेवावा । आपुला मार्ग रोखावा ।
मग स्वराज्य मेवा खावा ॥ भारता ॥ ७ ॥

सन्मित्र समाज मेळा १९२५

---

# उडव उडव सरबत्ती !

(चालः— भलोबा लगाव.)

उडव उडव सरबत्ती । भारता । उडव उडव सरबत्ती !
ही हमरीतुमरीची कुस्ति । भारता ॥ धृ० ॥
चहुंकडे निराशा पटल । आपसांत दुहि दंगल ।
कारणें पळे मंगल । भारता ॥ १ ॥
ह्या नाशा कारण कोण । आपुले असो आपण ।
ना कुणामधें अभिमान । भारता ॥ २ ॥
आत्मत्व राहिलें नाहीं । अवदसा नांदते गेहीं ।
उरलें न आपुलें कांहीं । भारता ॥ ३ ॥
चाललें काय जगतांत । स्वातंत्र्य नगारा झडत ।
अद्यापि तुम्ही झोंपेंत । भारता ॥ ४ ॥
ना मिळे देश शांतीनें । ना मिळे देश भिक्षेनें ।
ना मिळे देश वादानें । भारता ॥ ५ ॥
ना मिळे देश खादीनें । ना मिळे देश चरक्यानें ।
ना मिळे श्वानवृत्तीनें । भारता ॥ ६ ॥
शत्रुशीं नित्य झुंजावें । लागती कष्ट सोसावे ।
देशार्थ हाल भोगावे । भारता ॥ ७ ॥
गृहकलह आधीं मिटवावा । स्वार्थाचा होम करावा ।
गनिमासीं गनिमी कावा ॥ भारता ॥ ८ ॥
स्वातंत्र्यदेवीची भेट । होतसे भोगितां कष्ट ।
परि प्रयत्न आटोकाट ॥ भारता ॥ ९ ॥
उद्धार मायभू व्हावा । कारणें ऐक्यध्वज रोवा ।
मग स्वराज्य मेवा खावा । भारता ॥ १० ॥

निंबाळकर तालीम मेळा १९२३.

# मर्द मराठे चिरंजीव झाले

( चाल—हा नारायण अडला. )

स्वातंत्र्य संगरीं मर्द मराठे चिरंजीव झाले ॥ धृ० ॥
शिवरायानें देह झिजविला स्वातंत्र्यासाठीं ।
सिंहगडावर तानाजीचा देह पडे त्यासाठीं ॥ १ ॥
स्वातंत्र्यसंगरीं मुरारबाजी लढतां लढतां पडला ।
खिंड रांगणा बाजि प्रभुचा हलवी स्मारक झाला ॥ २ ॥
कैक मावळे कैक मराठे लढतां लढतां मेले ।
माय भुमिच्या यशोमंदिरीं कळस लावुनी गेले ॥ ३ ॥
विजापूरची आदिलशाही अभेद्य हा किल्ला ।
तरी मराठे वीरांनीं तो जमिनदोस्त केला ॥ ४ ॥
घमेंडिनें जो औरंगजेबहि दक्षिणेंत आला ।
घमेंड जिरतां करूं लागला या तोबा या अल्ला ॥ ५ ॥
अलमगिराच्या कळस तंबूचे कापोनि आणिले ।
संताजि बहाद्दर वीर मराठा नांव सार्थ केलें ॥ ६ ॥
संभाजिवधानें सर्व मराठा खवळुन जो गेला ॥
सूडश्रीनें रणकुंडाच्या भडकविल्या ज्वाळा ॥ ७ ॥
धन्यवीर तो धन्य काळ तो सतरावें शतक ।
तसें गर्जलें पेशवाईचें अठरावें शतक ॥ ८ ॥
समशेर यशस्वी विजयी सेना बाजी लढनेवाला ।
भाऊसाहेब समरधुरंधर माधव गुणि झाला ॥ ९ ॥
जनकोजि दमाजी मल्हार बाबा पाटीलबोवा शूर ।
तशी चमकली बापू गोखले शेवटली समशेर ! ॥ १० ॥
गतस्मरणानें जीव तळमळे कासाविस होतो ।
काय करावें सुचे न कांहीं भ्रम मतिला पडतो ॥ ११ ॥

खालिल पोहरा वरती येतो तत्व ध्यानीं ठेवा ।
इतिहासाची पुनरावृत्ती बोध मनीं ठेवा ॥ १२ ॥

सन्मित्रसमाज मेळा १९२६

---

# अन्याय न्याय ठरला

( चाल—सबसे रामभजन )

अन्याय न्याय ठरला । कारण षंढ तुम्ही बनला ॥ धृ० ॥
राष्ट्राज्ञेचें शिंग वाजलें करा कायदेभंग ।
नका चालवुं देऊं आतां ब्यूराक्रसींचे ढंग ॥ १ ॥
दडपशाही थैमान घालिते रोज कायदे नवीन ।
देशबंधुनो कराल कुठवर यांच्या लीला सहन ॥ २ ॥
ब्रिटानियेची न्याय देवता भ्रष्ट कलंकित केली ।
ब्यूराक्रसीला विनाशकाले विपरीत बुद्धी झाली ॥ ३ ॥
जुल्म क्रूर सैतान बोकळे स्वैर करी संचार ।
अरेराविच्या मदांधतेनें झाले जन बेजार ॥ ४ ॥
सावपणाचा आव घालुनी सार्थ कृती चोरांची ।
नदीकाठचे बगळे जैसे तैशी वृत्ती यांची ॥ ५ ॥
अन्यायाची कमान चढती कसा उडविला कहर ।
ब्रिटानियेची न्यायप्रियता दुर्गंधि कालवी जहर ॥ ६ ॥
आसेतुहिमाचल असे पेटलें होमकुंड शिक्षेचें ।
नोकरशाही नित्य बळी घे सानथोर धुरिणांचे ॥ ७ ॥
केव्हां येईल नित्य कुणावर बकासुराची स्वारी ।
मुस्कटदाबी करावयाची यांची खटपट सारी ॥ ८ ॥
देश बुडाला, धर्म लोपला छंद दारुचा सोडा ।

३८६९

असें बोलणें गुन्हा ठरविती म्हणुनि कायदे मोडा ॥ ९ ॥
बकासुराची पुनरावृत्ती व्यूराक्रंसीनें केली ।
भीमशक्ति अवतार व्हावया वेळ नजिक रे आली ! ॥ १० ॥

निंबाळकर तालमि मेळा १९२२

---

# वाजवा दुडूंम दुडूंम नौबद !

(चालः—चल ऊठ भारता.)

दुडुंम दुडुंम नौबद । वाजवा, दुडुंम दुडुंम नौबद ! ॥ ध्रु० ।
जय छत्रपतीचा बोला । जय भवानीकि जय बोला ।
स्वातंत्र्य देवी जय बोला । वाजवा ॥ १ ।
महाराष्ट्र देश हा आमुचा । मावळे मराठे ह्यांचा ।
तो नाहीं अन्य कोणाचा । वाजवा० ॥ २ ॥
सह्यादि दऱ्याखोऱ्यांत । अद्यापि नाद हा घुमत ।
स्वातंत्र्यघोषणा होत । वाजवा० ॥ ३ ॥
श्रीसमर्थ झेंडा भगवा । शिवराय गनिमी कावा ।
जरिपटका शाबुद ठेवा ॥ वाजवा ॥ ४ ॥
स्वातंत्र्यसंगरीं लढले । ते वीर चिरंजीव झाले ।
हे दूत तयांचे किल्ले । वाजवा० ॥ ५ ॥
सह्याद्री पर्वतावरती । स्मारकें दृष्टिला पडती ।
गडदुर्ग बोलके होती । वाजवा० ॥ ६ ॥
किल्ल्यांची भाषा मुग्ध । जीवाला करते दग्ध ।
सुचवितें काय प्रारब्ध । वाजवा० ॥ ७ ॥
ठकवाया ठक जो आला । पाहिजे उलट ठकवीला ।
भारती कृष्ण हे वदला । वाजवा० ॥ ८ ॥

देशार्थ देह ठेवावा । धर्मार्थ देह वेंचावा ।
नरजन्महेतु साधावा ! वाजवा० ॥ ९ ॥
स्वातंत्र्य मिळे इहलोकीं । देतसे मोक्ष परलोकीं ।
तो धर्म सत्य अवलोकीं । वाजवा० ॥ १० ॥

महाराष्ट्र मेळा, १९२४.

---

# तुमकू नहिं डरनेवाला !

[ चालः—सबसे रामभजन ].

हम मर्द मराठे है ! तुमकू नहि डरनेवाला ॥ धृ० ॥
महाराष्ट्रावर परदास्याची रजनी ज्या वेळीं !
महा प्रतापी भानु प्रगटला, शिवाजी नृप त्या वेळीं ॥ १ ॥
धन्य जिजाई धन्य माउली शिवनेरी किल्ला ।
प्रचंड अरिला लावि म्हणाया, या तोबा या अल्ला ॥ २ ॥
इथेंच लिहिला महाराष्ट्राचा, मन्वंतर इतिहास ।
लिहावयाला मराटमेळा साह्य करीं शिवबास ॥ ३ ॥
दिग्विजयी वीरांच्या नादें घुमलें वातावरण ।
येथिल तट्टें करुनी आलीं सिंधु नदाचें पान ॥ ४ ॥
स्वराज्यार्थ ही शिवरायानें, इथें घातली शाळा ।
शिकुनि शिष्यगण बाहेर पडतां, अजिंक्य हो कळिकाळा ॥ ५ ॥
शिवाजी राजा, तान्हा येसू, धनाजी, संताजी ।
मर्द मराठे वीरांचे कीं वंशज आम्ही आजी ॥ ६ ॥
गगन कोसळो, वीज कडाडो, रसरस अग्नी येवो ।
कृतांत काळा भिणार नाहीं, शीर तुटो वा राहो ॥ ७ ॥
सह्याद्रीचे जिवंत निर्झर, अद्यापी वहाती ।
अभेद्य किल्ले स्मारकरूपें दृष्टीला पडती ॥ ८ ॥

सह्याद्रीवर वीरांचे, हे हालती स्मारक झोले ।
स्वातंत्र्याच्या रणांगणीं ते चिरंजीव झाले ॥ ९ ॥
बाहुबलानें दिल्लीपतिला, हादरून सोडियलें ।
महाराष्ट्राच्या दास्यतटाचे तुकडे तुकडे केले ॥ १० ॥
महाराष्ट्र केसरीचे छावे आम्ही, हें न कधीं विसरूं ।
सत्त्व राखण्या समरभूमिवर, मरूं किंवा मारूं ॥ ११ ॥

मन्वंतर मेळा.

---

## लपव लपव कुक्कुट

( चालः— बडव बडव रणढोल. )

लपव लपव कुक्कुट ॥ म्हातारे ॥ लपव लपव कुक्कुट ॥
होणार निश्चयें पहाट ॥ म्हातारे ॥ धृ० ॥
पोहरा रिता होणार । पुनरपी तोचि भरणार ।
हें चक्र सदा फिरणार । म्हातारे० ॥ १ ॥
वृद्धत्व तयारी करितें । शिशुपणा पुन्हा घ्यायातें ।
मरताचि बालपण येतें । म्हातारे० ॥ २ ॥
हा जन्ममृत्युचा खेळ । चालेना टाळाटाळ ।
भोगणें जया ये काळ । म्हातारे० ॥ ३ ॥
जो जाय आज अस्ताला । येणार उद्यां उदयाला ।
कुणीं हटवूं शकेना त्याला । म्हातारे० ॥ ४ ॥
जे आज वाळवंटांत । ते उद्यां गर्द छायेंत ।
बसणार सुखानें डुलत । म्हातारे० ॥ ५ ॥

जुना मावळी मेळा १९२६.

---

# तूं येथून जावें निघुन

( चालः—वडव वडव रणढोल. )

उठव उठव कुरघोडी । पाशवी । उठव उठव कुरघोडी
गांजिशी आह्मा हरघडी । कशी तूं ? । उठव उठव कुरघोडी ॥ धृ० ॥
आजवरी जाहले गेले । दिन तुझे सद्दिचे सरले ।
हें लोकशाही युग आलें । पाशवी । उठव उठव कुरघोडी ॥ १ ॥
तूं येथून जावें निघुन । वेळींच धडा हा शिकुन ।
फायदा न येथें बसुन । पाशवी । उठव उठव कुरघोडी ॥ २ ॥
चहुंकडे भरतखंडांत । आत्मत्व पेटली ज्योत ।
एकची घोषणा होत । पाशवी । उठव उठव कुरघोडी ॥ ३ ॥
गे नोकरशाही तुजला । आजवरी बोध बहु केला ।
परि नाहीं तुला मानवला । पाशवी । उठव उठव कुरघोडी ॥४॥
आमुचें आम्ही सांभाळू । समजलीस तूं कनवाळू ।
या पुढें तुला आम्ही टाळू । पाशवी । उठव उठव कुरघोडी ॥ ५ ॥

जुना मावळी मेळा १९२३.

---

# एकच आहे तोड

( चालः—बजाव बजाव लगे ढोल. )

फोड फोड मग झोड । भारता । एकच आहे तोड । भारता० ॥ धृ० ॥
जो जसा तुला भेटेल । वागेल जसा बोलेल ।
दे उलट तसाचि सवाल । भारता० ॥ १ ॥
आजना पूर्वीची दुनिया । हें हवे काय सांगाया ।
पाहिजे सहज समजाया ॥ भारता० ॥ २ ॥
ज्या गोष्टी सत्य युगांत । त्रेतायुगीं द्वापारांत ।

कलियुगीं फोल त्या ठरत ॥ भारता० ॥ ३ ॥
काळानुरूप वागावें । आपुले मार्ग बदलावें ।
परि ध्येय कधि न सोडावें ॥ भारता० ॥ ४ ॥
येतील झुकानेवाले । पाहिजे तया दाखविले ।
आम्ही अट्टल गुरुचे चेले ॥ भारता० ॥ ५ ॥
जें निसर्गनिर्मित सत्य । त्यापुढें फोल पांडित्य ।
फोडूनि घुसावें आंत ॥ भारता० ॥ ६ ॥

जुना मावळी मेळा १९२५.

---

# राष्ट्रहितास्तव

( चालः—रणशिंग फुंकिलें. )

राष्ट्रहितास्तव भगवी कफनी वेष फकिरीचा ॥ धृ० ॥
महाराष्ट्राची परंपरेची समर्थ गुरुकिल्ली ॥
स्वराज्य मंदिर उघडायाचि योग्य वेळ ही आली ॥ १ ॥
कफनी अंगावर चढल्यावर सर्व भीती जाते ।
स्फुरण येतसे रक्त उसळतें काळिज सळसळतें ॥ २ ॥
अंतःचक्षूपुढें मागला काळ उभा राहतो ॥
कुठें वीर ते कुठें वीर आह्मी ओळख पटवितो ॥ ३ ॥
महाराष्ट्राचा क्षात्रवृत्तीचा सिंह दरीमाजी ॥
घोरत पडला वरांत शिरला कोल्हा मूषक पाजी ॥ ४ ॥
विजयी भाला घालुनि घाला अटकपार गेला ॥
जाय यशस्वी भगवा झेंडा दिगंत कीर्तिला ॥ ५ ॥
वीर मराठे काळासंगे टक्कर देतील ॥
विक्रमशाली त्यांचा लौकिक पुन्हा कधीं प्रगटेल ॥ ६ ॥

धन्य काळ तो तुमची ख्याती जगांतले गाजी ॥
हतबल झाला भगवा झेंडा धूळ खातसे आजी ॥ ७ ॥
आह्मी आमुच्या हिंदभूमिचें पूर्ण धनी आहों ॥
मायभूमि ही हाक मारिते फोडीते टाहो ॥ ८ ॥
वीरांचे तुम्ही अस्सल बच्चे काय आजला षंढ ।
वडिलोपार्जित क्षात्रवृत्तीला नका पाडुं तुम्ही खंड ॥ ९ ॥
महाराष्ट्रिय मी ह्मणवुनी घेणें कठिण असें जाणा ॥
देशासाठीं तयार रहावें कधीं न भ्यावें मरणा ॥ १० ॥

भगवा झेंडा मेळा १९२३.

---

# वीर जे चिरंजीव झाले !

( चालः— असा मोहरा झाला नाहीं. )

स्वातंत्र्याच्या रणांगणीं जे चिरंजीव झाले ।
त्या वीरांना कार्यारंभीं वंदन हें पहिलें ॥ धृ० ॥
देशभक्तीनें तळमळणाऱ्या अंतःकरणाला ।
रक्त उसळुनी सळसळणाऱ्या स्वतंत्र जीवाला ॥ १ ॥
महाराष्ट्राच्या जरीपटक्याला भगव्या झेंड्याला ।
प्रणाम भावें समर्थ गुरुंच्या अनंदभुवनाला ॥ २ ।
ताना, येसू, बाजि फसलकर, मुरारबाजीला ।
बाजी प्रभूतें, प्रताप गुर्जर संत धनाजीला ॥ ३ ॥
बाजी, नाना, भाऊ, माधव, फडणीस नानाना ।
मल्हारराव, जनकोजि दमाजी पाटील बाबांना ॥ ४ ॥
पटवर्धन सरदार पानसे बापु गोखल्यांना ।
शिवशाहीच्या उरल्या सुरल्या स्वदेशभक्तांना ॥ ५ ॥

प्रणाम भावें करुनि विनवितों गोंधळास यावें ।
स्वातंत्र्यदेवीच्या महाराष्ट्राचें कार्य तडिस न्यावें ॥ ६ ॥
वनवासांतील पर्णकुटीही गोंधळ घालाया ।
वन्य देवता स्वातंत्र्याचा आशिर्वच द्याया ॥ ७ ॥

जुना मावळी मेळा.

---

# विजय पुढें दारांत !

( चालः— सबसे रामभजन. )

राजकारणी आद्य सूत्र हें शठंशाठ्य नीति ॥ धृ० ॥
नाक दाबितां तोंड उघडतें न्याय असा जगतीं ।
जशास तैसें विना वागल्या कैशी हो प्रगती ॥ १ ॥
कोण दिशेचा वाहे वारा, उलट दिशे जाणे ।
प्रसंग पाहुन कर्तव्याचें धोरण ठरविणें ॥ २ ॥
ठेंच मागल्या पुढील शहाणा पाय पुढें टाकी ।
अनुभव येता ध्येयासाठीं तोच कुणाचें ऐकी ॥ ३ ॥
एक गालीं थप्पड बसतां गाल दुजा पुढती ।
करील जो तो ठार बुडाला कार्याची करि माती ॥ ४ ॥
दंश करीतो म्हणून वाटे भीति सर्पाची ।
नसे गांडुळा भीत कुणीहि वळवळ जरि त्यांची ॥ ५ ॥
प्रयत्न करितां निराशवादी कधीं होत नाहीं ।
अशक्य नाहीं जगांत कांहीं हेंचि सत्य पाही ॥ ६ ॥
काशीस जावें नित्य वदावें बीज हेंचि त्यांत ।
कार्यचिकाटी निश्चय असतां विजय पुढें दारांत ! ॥ ७ ॥

भगवा झेंडा मेळा १९२३.

# मूठमाति द्या वादांना

( निर्वाणीचा )

टिळकभक्त हो गांधिभक्त हो एकच सांगण दोघांना ।
एकच आहे ध्येय आपुलं मूठ मातिद्या वादांना ॥ धृ० ॥
तेहतिस कोटी घेऊनि रूपें श्रीहरी प्रभु जगीं अवतरला ।
जसा भक्तगण तसा श्रीहरी भिन्न दिसतसे जनतेला ॥
वादापायीं बरं कुणाचं झालं नाहीं आजवरी ।
पायाखालीं काय जळतसें, उघडा डोळे अजुनि तरी ! ॥
दोन मांजरें भांडभांडती वानर येऊनि खाय खवा ।
तशी न व्हावी गती आपुली सांधा वेकीचा जडवा ॥
चालः—ऐक्याचि ध्वजा रोवावी । कार्याचि धुरा उचलावी ।
वादाचि कीड मारावी । मत्सरी बुद्धि टाकावी ।
स्वातंत्र्य पाहिजे सकलां । मग वाद कुठें राहीला ॥
सुस्थिती मायभूमिला । आणणें कार्य आपणाला ।
देशाची सेवा करणें । त्यासाठीं जगणें मरणें ।
वैभवा देश चढवीणें । ऋण मायभूमिचें देणें ॥
कार्य करावें यशापयश ते ठावे एका देवाला ! ।
एकच आहे ध्येय आपुले मूठमाति द्या वादांना ॥ १ ॥

जुना मावळी मेळा १९२५

———

# ही पुरे आतां अंगाई !

( चालः-- सुनो सुनोजि मेरे यार )

चलो चलो चलो भाई । ही पुरे अतां अंगाई ।। धृ० ।।
मेरुला गिळिले मुंग्यानीं । गरुडास छळिलें काकांनीं ।।
केसरीस कोल्हा खाय । उलटेंचि अनुभव येई ।। १ ।।
तेलंग कुबेरा लुटितो । प्याद्याचा फर्जी होतो ।।
वाघ्याचा पाग्या होई । येळकोट गाणें गाई ।। २ ।।
चाकरा मलीदा मिळला । उपवास घडे रावाला ।।
ना मिळे तया खेटार । उडविती रंक मोटारी ।। ३ ।।
जें घडूं नये तें घडतें । भलतेंचि अनुभवा येतें ।।
उलटाचि कलीचा काळ । गद्धाचि केसरी होई ।। ४ ।।
ललनांचा पुरुषी थाट । पुरुषांचा नारी थाट ।।
स्त्रीपुरुष नुरे हा भेद । संस्कृती लयाला जाई ।। ५ ।।
फुंकिती उकिरडा हंस । मौक्तीकचुरा बगळ्यास ।।
गाभणा राहतो बैल । ही पहा कलीचतुराई ।। ६ ।।
जो यथाधर्म आचार । मायभू करिल उद्धार ।।
बंधुहो करा निर्धार । ओळखा कशी अंगाई ।। ७ ।।

महाराष्ट्र मेळा.

---

# सह्याद्रीचा स्वराज्य दिनकर !

( चालः- विश्ववंद्य गणराज )

तूं कोण मराठा कां संशयो पडला ।। धृ० ।।
सह्याद्रीचा स्वराज्यदिनकर मावळला गेला ।। १ ।।
वैभवशाली दीप जागता कोणी मालविला ।। २ ।।

महाराष्ट्राचा भीम पराक्रम कुठें आज दडला ॥ ३ ॥
जिवंत निर्झर जिवंत वारे कर्मसिंधु आटला ॥ ४ ॥
स्वराज्यदाता गनिमी कावा अस्तंगत झाला ॥ ५ ॥
भगवा झेंडा जरिपटका तो कुणीकडे लपला ॥ ६ ॥
शिवरायाचा मराठमोळा नाममात्र उरला ॥ ७ ॥
उठा मराठे करा जागृती हरहर जय बोला ॥ ८ ॥
जगणें मरणें महाराष्ट्राचें नांव राखण्याला ॥ ९ ॥

विद्यार्थी मंडळ मेळा १९२३.

---

# वादांत शेवटीं नाश

( चालः—बडव बडव रण ढोल )

नका पेटु हट्टास ॥ बंधुहो ॥ नकाहो पेटु हट्टास ॥
वादांत शेवटीं नाश ॥ बंधुहो० ॥ धृ० ॥
कुणी मवाळ म्हणति जहाल । कुणी म्हणति श्रेष्ठ कौन्सिल
ना कुणास कोणा मेळ ॥ बंधुहो० ॥ १ ॥
नाफेर फेर वाल्यांची । लागली झुंज जोराची ॥
शेवटीं आहुति दोघांची ॥ बंधुहो० ॥ २ ॥
बोलणें सोडुनी द्यावें । करणेची करोनी जावें ॥
आपुलें ध्येय गाठावें ॥ बंधुहो० ॥ ३ ॥
मीपणा बाळकडू प्यावें । अभिमान बीज राखावें ॥
आपुल्या हिता जागावें ॥ बंधुहो० ॥ ४ ॥

सार्वजनिक काका मेळा १९२३

---

# कालचक्र उलटें !

( चालः—रणशिंग फुंकिलें. )

सांप्रतकाळीं फिरे भारती, कालचक्र उलटें ॥ धृ० ॥
वनराज केसरी, दैवगतीनें, उकीरडा फुंकी ॥
उमराव थोर, परि आज झेलती, रंकाची थुंकी ॥ १ ॥
आज ब्राम्हणा वाणिज वृत्ती कराविशी वाटे ।
क्षात्र मराठे, आज तयांना ब्राह्मण व्हावें वाटे ॥ २ ॥
शेतकऱ्यांनीं शेती टाकुनि मजुरी पत्करिली ॥
कारागिर जन दलालिची त्या दुर्बुद्धि सुचली ॥ ३ ॥
निसर्गनिर्मित, स्वतंत्रतेला लाथाडुन दिधलें ॥
प्रत्येक बाबतींत, स्वत्व गमवुनि परावलंबी बनले ॥ ४ ॥
दळणकांडणापासुन आमुचें जीवित परस्वाधीन ॥
काडी इकडिल तिकडे न करवे दुसऱ्यांचे आधीन ॥ ५ ॥
युवति जनाच्या पेहरावाची आवड पुरुषांना ॥
पुरुषी वेषीं मर्द बनावें आवड ललनांना ॥ ६ ॥
ताकद नाहीं स्त्रैणपणा हा रोमरंध्रीं भरला ॥
म्हणुनि नाटकें खेळ सिनेमा सुचती या काला ॥ ७ ॥
एका गालीं थप्पड बसतां गाल दुजा पुढती ॥
त्राण नसे प्रतिकार कराया म्हणुनि सर्व वेदांती ॥ ८ ॥
हकालपट्टी करुनि जुन्याची केली नव भरती ॥
आरोग्य येथील कधींच पळालें व्याधि किती जडती ॥ ९ ॥
स्वातंत्र्यसुखेचीं पात्रें होतीं चांदी सोन्याचीं ॥
तिथें रांग उभि परवशतेची असे खापराची ॥ १० ॥

सार्वजनिक काका मेळा १९२३.

# येति गांडुळें प्रत्यहीं जन्माला

( चाल:--सबसे रामभजन. )

कांहीं तरी पुरुषार्थ करोनी देहा ठेवावें ॥ धृ० ॥
जन्मा आला मृत्यु तयाला असे ठेवलेला ।
चिरंजीव तो नर करणीनें नारायण झाला ॥ १ ॥
कार्य सोडुनी जो दुसऱ्यावरि विसंबुनी बसतो ।
त्यासम त्याचा तोचि करंटा दास्यपंकीं रुततो ॥ २ ॥
अखिल तारकांमध्यें चमकतो तारा शुक्राचा ।
श्रेष्ठ तोचि कीं ज्याचा वाजे डंका कीर्तीचा ॥ ३ ॥
केला झोपा बैल गमविला अशी स्थिती ज्यांची ।
जगांत किंमत नाहि तयांना कीव न गरिबांची ॥ ४ ॥
काय थोडकीं येति गांडुळें प्रत्यहि जन्माला ।
महिशा सम नच ओझी वाहण्या जन्मा नर आला ॥ ५ ॥

जुना मावळी मेळा १९२५.

---

# शांतियुगाच्या विश्वकल्पना

तुमची झोंप कधीं सरणार ? । हो । शांत किती राहणार ? ॥ धृ० ॥
शांति युगाच्या विश्वकल्पना जसे मनोरे हवेंतील ।
वरकांती–शांतिचा डोलारा अंतीं दगा देणार ॥ १ ॥
ज्या वेळेला सूर्य–पूर्वेचा पश्चीमेला उगवेल ।
त्या वेळेला हिंदु मुसलमिन शक्य एकी होणार ॥ २ ॥
निर्बल पंगु झाला म्हणुनी शांति–पवाडे गावुं नका ।
बलवानाची सहनशीलता तीच श्रेष्ठ–ठरणार ! ॥ ३ ॥

बलवान जिवानें निर्बल जीवा खुशाल खाऊन टाकावें । -
मार्जारानें मूषक गिळितां पाप काय म्हणणार ? ॥ ४ ॥
निसर्गनिर्मित कडक कायदे दया न तेथें कोणाला ।
जो लाथाडिल निसर्गनियमा शासन त्या मिळणार ॥ ५ ॥
ह्या तत्वाला धरून सारी सृष्टीरचना झाली असे ।
गुणकर्म विभागणि पालन करी तो मोक्षाला जाणार ॥ ६ ॥
करावयाचें करोनि जावें राजकारणांतिल नियम ।
आधीं वाच्यता केल्यावर मग शत्रु कसा मरणार ॥ ७ ॥

जुना मावळी मेळा १९२५.

---

# अर्जुनि उमजाना

( चाल:— शुभ वेळ मंगला आज )

अविनाश पुढें दिसतां, अर्जुनि उमजाना ॥ धृ० ॥
आर्यसंस्कृति, लाथाडून तुम्हीं, स्वैर वागतांना ? ॥ १ ॥
नटुंनी सजुनी, मोहक बनणें, लज्जास्पद जाणा ॥ २ ॥
थाट नाटकी, योग्य शोभतो, वारयोषितांना ॥ ३ ॥
अधोगतीची, कमान चढती, डोळे उघडाना ॥ ४ ॥
सीता, द्रौपदी, अनसूयादिक, कुठें साध्वि ललना ॥ ५ ॥
साध्वि अहिल्या, सावित्रीची गोड कथा श्रवणा ॥ ६ ॥
साध्वि स्त्रियांच्या, पावित्र्याच्या, करा सुधापाना ॥ ७ ॥
धार्मिक बंधन, शिथील पडतां, ढंग सुचत नाना ॥ ८ ॥
मायभूमिच्या, भावि पिढीच्या, तुम्हीच माताना ? ॥ ९ ॥
जबाबदारी, ओळखून द्या, शिक्षण बालांना ॥ १० ॥
जागृति ठेवा, मातृपदाची, तुम्ही वागतांना ॥ ११ ॥

सार्वजनिक मेळा १९२३.

# हें व्यर्थ शांतिचें बंड.

( चाल— बडव बडव रणढोल. )

अजुन अजुन तुम्ही थंड । कसे हो । अजुन अजुन तुम्ही थंड ॥
हें व्यर्थ शांतीचें बंड ! ॥ धृ० ॥

वरकांति सर्व देखावा । खादिचा डौल मिरवावा ।
कां शांति ढोल बडवावा ॥ कसे हो० ॥ १ ॥

स्थापना शांतिधर्माची । शांतता सर्व विश्वाची ।
भलतीच आज्ञा गांधिची ॥ कसे हो० ॥ २ ॥

जें कधीं न पूर्वीं झालें । कोणिही करूं ना शकले ।
पाहती करूं दुधखुळे ॥ कसे हो० ॥ ३ ॥

लागला शांतिच्या नांदीं । त्यामुळेंच बनला ऐदी ।
ओझ्याचे निव्वळ नंदी ॥ कसे हो० ॥ ४ ॥

हा काळ नसे व्यक्तीचा । हा काळ लोकशाहीचा ।
हा नसे राजमुगुटाचा ॥ कसे हो० ॥ ५ ॥

शांतिचा वृथा डोलारा । मग कां न वाजतिल बारा ।
गारुडी खेळ हा सारा ॥ कसे हो० ॥ ६ ॥

जगताचा पाहुनि नूर । बदलावा आपुला सूर ।
फलदायी तोच होणार ॥ कसे हो० ॥ ७ ॥

या उठा चला हो भाई । ही पुरे शांति आंगाई ।
स्वातंत्र्य कधि न जी देई ॥ कसे हो० ॥ ८ ॥

जुना मावळी मेळा १९२४.

## पुरे पुरे वटवट

( चालः— लगाव लगाव लगे ढोल. )

पुरे पुरे वटवट। आतां ही । पुरे पुरे वटवट।
ही नको रडकि कटकट । आतां ही० ॥ धृ० ॥
भारता आठव गतकाल । आत्मत्व करीं घे ढोल ।
कर्तव्यकर्म सांभाळ । आतां ही० ॥ १ ॥
नशिबाला बोल कशाला । जसें कर्म तसें फल त्याला ।
ना मिळे बसुनि कोणाला । आतां ही० ॥ २ ॥
बोलणें अल्प ठेवावें । करणेंचि करोनी जावें ।
ध्येयार्थ गुह्य राखावें । आतां ही० ॥ ३ ॥
कार्याचि वेळ ना आली । स्वस्थता पाहिजे धरली ।
पाहिजे सिद्धता केली । आतां ही० ॥ ४ ॥
येतांच संधि साधावी । कार्याचि धुरा उचलावी ।
शर्थिनें अब्रु राखावी । आतां ही० ॥ ५ ॥
कार्यावर ठेवा लक्ष्य । आपुलें कोणतें भक्ष्य ।
त्यासाठिं रहावें दक्ष्य । आतां ही० ॥ ६ ॥

भारतमित्र मेळा १९२४.

---

## हा का तुमचा असहकार

( चाल— अहो अहो कौन्सिलदार० )

हां कां तुमचा असहकार । हो किती दिवस टिकणार ॥ धृ० ॥
इमारतीचा भक्कम पाया आधिं लागतो बांधाया ।
नातर कच्च्या पायावरचा वाडा ढांसळणार ॥ १ ॥
आडांत नाहीं पाणि मूळ तें कुठुन येइल पोहऱ्यांत ।

साधि गोष्ट ही कळे न म्हणुनी वाया श्रम जाणार ॥ २ ॥
पुढील मागिल धोरण ठेवुनि कार्यदिशा मग आंखावी ।
विचार केल्याविणें कार्य तें अंति दगा देणार ॥ ३ ॥
चुकुन पडे पद अग्नीवरतीं क्षमा न तेथें कोणाला ।
व्यवधान सोडुनि उडी टाकितां तोंडघशीं पडणार ॥ ४ ॥
पावसाळिं ते ओढे वाहति स्वैर गतीनें धो धो धो ।
पूर ओसरे पुन्हा कोरडे, तद्वत असहकार हो ॥ ५ ॥
एक दाखवा उदाहरण तें स्वराज्य मिळलें शांतीनें ।
गगना बघतां घालु गवसणि फुकट लया जाणार ॥ ६ ॥
नाहीं झालें बरें कुणाचें, निसर्गनियमां सोडून ।
पश्चिम दिशेनें जातिल त्यांना उदय कसा दिसणार ॥ ७ ॥
झालें जें तें होऊनि गेलें डोळे उघडा अजुनि तरी ।
नको शांतिचें नांव यापुढें, हाच करा निर्धार ॥ ८ ॥
स्वातंत्र्यास्तव शठा शाठ्य हा धडा बंधुनो गिरवा या ।
केव्हांही तो फलदायी हो, हाचि करिल उद्धार ॥ ९ ॥

भारतमित्र मेळा १९२४.

---

# पेशव्यांचा शनवारवाडा

( चाल— गडावर जाऊं ).

शतक अठरावें । पेशवे नांव आठवावें ॥ ध्रु० ॥
गतवैभव करि हृदयविदारण ।
दुःख फुकाचें कर्तव्याविण ।
आजि ओढवे प्रसंग दारुण ।
ऐक्य जोडावें । गतकार्य पुढें ठेवावें ॥ १ ॥

साधि गोष्ट ही कळे न म्हणुनी वाया श्रम जाणार ॥ २ ॥
पुढील मागिल धोरण ठेवुनि कार्यदिशा मग आंखावी ।
विचार केल्याविणें कार्य तें अंति दगा देणार ॥ ३ ॥
चुकुन पडे पद अग्नीवरतीं क्षमा न तेथें कोणाला ।
व्यवधान सोडुनि उडी टाकितां तोंडघशीं पडणार ॥ ४ ॥
पावसाळिं ते ओढे वाहति स्वैर गतीनें धो धो धो ।
पूर ओसरे पुन्हा कोरडे, तद्वत असहकार हो ॥ ५ ॥
एक दाखवा उदाहरण तें स्वराज्य मिळलें शांतीनें ।
गगना बघतां घालु गवसणि फुकट लया जाणार ॥ ६ ॥
नाहीं झालें बरें कुणाचें, निसर्गनियमां सोडून ।
पश्चिम दिशेनें जातिल त्यांना उदय कसा दिसणार ॥ ७ ॥
झालें जें तें होऊनि गेले डोळे उघडा अजुनि तरी ।
नको शांतिचें नांव यापुढें, हाच करा निर्धार ॥ ८ ॥
स्वातंत्र्यास्तव शठा शाठय हा धडा बंधुनो गिरवा या ।
केव्हांही तो फलदायी हो, हाचि करिल उद्धार ॥ ९ ॥

भारतमित्र मेळा १९२४.

---

# पेशव्यांचा शनवारवाडा

( चाल— गडावर जाऊं ).

शतक अठरावें । पेशवे नांव आठवावें ॥ धृ० ॥
गतवैभव करि हृदयविदारण ।
दुःख फुकाचें कर्तव्याविण ।
आजि ओढवे प्रसंग दारुण ।
ऐक्य जोडावें । गतकार्य पुढें ठेवावें ॥ १ ॥

होते मजले सात जयाला ।
तोंड जयाचें खास दिल्लिला ।
पेशवाइच्या वैभवकाला ।
रिपू जिंकावे । दरबार इथें भरवावे ॥ २ ॥

गज अश्वानीं गजबजलेला ।
महाराष्ट्राचा सुंदर झोला ।
मुत्सद्दीगण हलवि तयाला ।
कवींनीं गावें । स्वातंत्र्यगीत ऐकावें ॥ ३ ॥

येथुन गेल्या फौजा दौडत ।
रट्टे लगवित रिपूच्या पाठिंत ।
अटकेसंन्निध सिंधुस गांठित ।
शिंग फुंकावें । पेशवे नांव गर्जावें ॥ ४ ॥

पेशवाइच्या धनदौलतीला ।
पुणें शहर हें राजधानिला ।
बहु आवडले शूर बाजिला ।
जन्मा यावें । म्हणवून पुणेकर व्हावें ॥ ५ ॥

नशिब शिकंदर होते बाजी ।
नमवित दाढी येती काजी ।
विनवी मोंगल करूनी हां जी ।
दिल्लिला यावें । खंडणी घेउनी जावें ॥ ६ ॥

भाऊ चिमाजीआप्पा शूर ।
शौर्यसिंधुला आला पूर ।
रणदेवीचा एकचि सूर ।
उदया यावें । पेशवे नांव राखावें ॥ ७ ॥

आले उदया गायकवाड ।

शिंदे इमानी होणार जोड ।
बाजि धनी हा पुरवी कोड ।
  शौर्य दावावें । उन्नतीशिखर गांठावें ॥ ८ ॥
हा तटबंदी वाडा बुरुजी ।
कुणी बांधिला, पहिले बाजी ।
हा विध्वंसक दुसरा बाजी ।
  नच विसरावें । हें चित्र पुढें ठेवावें ॥ ९ ॥
एक बाजी और सब पाजी ।
निजाम बोले व्हा व्हा गाजी ।
निजाम और सब हजाम राज्यीं ।
  यशस्वी व्हावें । बाजिचें तत्व उचलावें ॥ १० ॥
शूर सदाशिवभाऊ नाना ।
राघुभरारी योद्धा जाणा ।
बाइलबुध्या माणुसघाणा ।
  सदां भांडावें । सदनांत परांना घ्यावें ॥ ११ ॥
गृहकलहानें विश्वासाचा ।
आत्मयज्ञ त्या सदाशिवाचा ।
अपयश डंका पानिपताचा ।
  कां न निंदावें । हें फितूर घरचे व्हावे ॥ १२ ॥
बाळ कुमारा विश्वासाला !
हाय ! धाडिलें पानिपताला ।
आग लागली गृहसौख्याला ।
  कां न निंदावें । हे फितूर घरचे व्हावे ॥ १३ ॥
राजकारणी माधवराव ।
सागरवृत्ति, न लागे ठाव ।

पेशवाइचा उलटा डाव ।
दान पडावें । लवकरी आयु संपावें ॥ १४ ॥

तो नारायण बालपेशवा ।
आनंदींच्या नयनिं खुपावा ।
राज्यतृष्णेला बळी पडावा ।
पाप घडावें । बोलले राज्य सोडावें ॥ १५ ॥

सवाईमाधव बालपेशवे ।
पुनरपि पहिले दिन गांठावे ।
परि बाजीचे भेदक कावे ।
साह्यक व्हावे । बोलले राज्य सोडावें ॥ १६ ॥

संशयरूपी राहू केतू ।
नानाविषयीं ये मनिं किंतू ।
डाव जिंकितो बाजी स्वार्थू ।
कां न निंदावें । हे फितूर घरचे व्हावे ॥ १७ ॥

फडणिस नाना जरि मुत्सद्दी ।
पेशवाईची सरतां सद्दी ।
दुष्ट बाजिची नाशक बुद्धी ।
दैव उलटावें । हे फितूर घरचे व्हावे ॥ १८ ॥

दिसे न खिडकी प्राणघातकी ।
माधव सर्वां शोकीं टाकी ।
कारंजाचा घाव मस्तकीं ।
हाय ! बोलावें । पेशवे नांव आठवावें ॥ १९ ॥

कारस्थानी आनंदीचें ।
जेथें घडलें कार्य वधाचें ।

पाप घडे त्या रावबाजिचें ।
साह्यक व्हावें । बोलले राज्य सोडावें ॥ २० ॥
वीरबहादर बापु गोखला ।
कसोटिला हा एकचि टिकला ।
मायभूमिच्या कल्याणाला ।
सदा जागावें । परि दैव आडवें यावें ॥ २१ ॥
पटवर्धनही भाऊपणाला ।
नच चुकले सेवा द्यायाला ।
कांताकांचनपाश तोडिला ।
प्राण अर्पावे । बलहीन पेशवे व्हावे ॥ २२ ॥
भोजनभाऊ बारगीर बहु ।
समरिं बायका नुचले बाहू ।
फितूर घरचे केतूराहू ।
पेशवे जावे । हे परान्नपुष्टचि रहावे ॥ २३ ॥
सभोंवार जन परान्नपुष्ट ।
कमवाया किती पडलें कष्ट ।
चाकर बुडवे मालक नष्ट ।
विपर्यिं रंगावें । दिवटाचि म्हणवुनी घ्यावें ॥ २४ ॥
थाट शाहिरी होनाजीचा ।
कुठे पवाडा प्रभाकराचा ।
तलाव कोठें काव्यौघाचा ।
पाट सोडावे । स्फूर्तिचें कलम राखावें ॥ २५ ॥
गतकाळाच्या इतिहासाची ।
शुक्रचांदणी जशी नभाची ।
वीर शाहिरी थाप डफाची ।
सर्व आठवावें । मानसीं स्वस्थ बैसावें ॥ २६ ॥

कटाव केले तसे पवाडे ।
काव्यौघाला बंद कवाडें ।
पढो पंचावन पहिले पाढे ।
तुम्ही घोकावे । बाजिचे बोल ऐकावे ॥ २७ ॥
मिथ्या बोले दाढी हाले ।
राजा बोले दळही हाले ।
मालक तैसा चाकर चाले ।
अनुभवा यावें । पेशवे नांव आठवावें ॥ २८ ॥
दिवसाढवळ्या नाचतमाशे ।
गरति बायकां होय नकोसें ।
खेळे बाजी विषयीं फासे ।
दान पडावें । बोलले राज्य सोडावें ॥ २९ ॥
व्यभिचाराचें झालें आगर ।
राजलक्ष्मि मग काशि रहाणार ।
सत्य म्हणेना मीच पुणेंकर ।
हाय ! बोलावें । पेशवे नांव आठवावें ॥ ३० ॥
वरभरणीचा थाट उडवीला ।
वीरबाजिनें प्रवेश केला ।
टाकुन वाडा नातु पळाला ।
पितर आठवावे । त्यां पिंड देत बैसावें ॥ ३१ ॥
पेशवाइवर उदक सोडिलें ।
ब्रह्मावर्ती ठाणें केलें ।
पापक्षालन करीत बैसले ।
अश्रु ढाळावे । मानसीं स्वस्थ बैसावें ॥ ३२ ॥
स्वातंत्र्याच्या त्या सुखसोई ।

रूपशर्तिची ब्राह्मणशाही ।
दैव लंगडें उलटी घेई ।
   लयाला जावें । रंडकें आयु भोगावें ॥ ३३ ।
वदति मोडकीं तीं कारंजीं ।
निर्घृण काळा आह्मां न गांजी ।
गतशतकाची आठवण ताजी ।
   हाय ! बोलावें । मानसीं स्वस्थ बैसावें ॥ ३४ ।
कधिं अस्मानी कधीं गुलाबी ।
कधीं केशरी कधीं कुसुंबी ।
वेलबुटयांची खुबीच नामी ।
   शालु नेसावे । भिंतिचे बोल ऐकावे ॥ ३५ ।
विटाळ नव्हता अशुद्धतेचा ।
जैसा अनुभव आदर्शाचा ।
तसाचि होता मान आमुचा ।
   लेणें ल्यावें । वैभवें जनां दिपवावें ॥ ३६ ॥
जरिपटक्याचें निशाण भगवें ।
आम्हीं त्याचें मूळ धरावें ।
वाऱ्या वरती फडकत रहावें ।
   लयाला जावें । लागलें खालीं ठेवावें ॥ ३७ ॥
शूरविरांचीं गुप्त खलबतें ।
तिथेंच मंजुळ प्रेम बोलतें ।
स्वराज्यस्फूर्ती बाळ खेळतें ।
   गीत ऐकावें । तल्लीन मानसीं व्हावें ॥ ३८ ॥
इथें बैसले बाजीराव ।
इथें बैसले सवाइ माधव ।

तिर्थांचि दिवटा बाजीराव ।
रोप लावावें । नातुनें तेंचि तोडावें ॥ ३९ ॥

स्नानविधीची इथेंच जागा ।
ब्राह्मणभोजन कितीक रांगा ।
विश्रांतिस्थल हें ह्या अंगा ।
किती सांगावें । भिंतिचे बोल ऐकावे ॥ ४० ॥

खासा घोड्यांची ही पागा ।
ही दरबारी प्रचंड जागा ।
शूर विरांच्या हरिनें रांगा ।
ललकारावें । पेशवे नांव गर्जावें ॥ ४१ ॥

मट्टीसे वा मट्टी मिलना ।
आम्हीं आजला केलें शयना ।
पुनरपि आम्हीं हिंदुस्थाना
भूषणा व्हावें । कारणें लयाला जावें ॥ ४२ ॥

रोडेराडे होउनि पडलों ।
घा घा लाथा चुरडुनि गेलों ।
मरतां मरतां तुम्हासि वदलों ।
ध्येय जिंकावें । भिंतिचे बोल ऐकावे ॥ ४३ ॥

गेलें वैभव आयु रंडकें ।
स्मशानांतलें फुटकें मडकें ।
परावलंबन फल हें सडकें ।
काय चाखावें । कर्तव्यकर्म आठवावें ॥ ४४ ॥

त्यांचि मरावें जन्मा याया ।
यावें जन्मा त्यांचि मराया ।

जन्ममरण हा खेळ न वाया ।
बोल ऐकावे । मनिं सार यांतलें घ्यावें ॥ ४५ ॥
उदया याया रवि मावळतो ।
निसर्ग आपुलें तत्व न चुकतो ।
चहूंकडे हा न्यायाचि दिसतो ।
नच विसरावें । मागलें पुढें चालावें ॥ ४६ ॥
तुं मेलेला आजि दिसावा ।
उन्नति व्हाया तुला विसावा ।
योग्य काल ये उदयचि व्हावा ।
ध्येय जिंकावें । कारणें स्वस्थ बैसावें ॥ ४७ ॥
नांव मराठा गाजुनि गेलें ।
फिरे खराटा नांव लोपलें ।
हाय करित हा वाडा बोले ।
उदया यावें । कारणें स्वस्थ बैसावें ॥ ४८ ॥
जोंवरि सत्ता तोंवरि मत्ता ।
वेळ सद्दिची निघोनि जातां ।
परजूखालीं द्यावा खांदा ।
ठेंचाळावें । मागुनी शहाणें व्हावें ॥ ४९ ॥
× × × ×
जुना जाहलों जरि मी वाडा । मी खेळांतिल दैवें घोडा ।
परी बंधु हो संधि न दवडा ।
कार्य साधावें । उन्नतीशतक वीसावें ॥ ५० ॥
जुन्या गोष्टिची नको आठवण । काय बोलती मजला ते दिन ।
काकवृत्तिचें जगून धिक् जिणें ।
त्यांचि मरावें । कारणें पुन्हां जन्मावें ॥ ५१ ॥
आहे आज उद्यां तें नाहीं । नसे आज तें उद्यांचि पाही ।

असे कायदा निसर्ग पाही ।
नच विसरावें । हें तत्त्व हृदयिं ठेवावें ॥ ५२ ॥
ऊठ बालका पहाट झाली । योग्य संधि ही तुला पातली ।
नवयुग जागृति गंगा आली ।
स्नान साधावें । गांठिला पुण्य जोडावें ॥ ५३ ॥
मेला गेला अनुभव मागें । शनवारांतिल वाडा सांगे ।
जरी आजि तुम्हि फकीर नंगे ।
उदया यावें । उन्नतीशतक वीसावें ॥ ५५ ॥
झालें गेलें होउनि गेलें । मना विचारा काय राहिलें ।
काय पाहिजे तुम्हांसि केलें ।
जागें व्हावें । वेळींच कार्य रोखावें ॥ ५५ ॥
स्वजातक्लिमिषद्वेषा जाळा । महाराष्ट्राचा मराठमोळा ।
ऐक्य निशाणाखालीं गोळा ।
आजला व्हावें । होउनि ध्येय जिंकावें ॥ ५६ ॥
वैभवचित्रें स्मृतिपटलावर । येती जाती पहा भराभर
कवि रामाचें गीत घरोघर ।
शतक अठरावें । पेशवे नांव आठवावें ॥ ५७ ॥

# करुनि पोरकें महाराष्ट्राला

( चालः-- आनंदाचा कंद हरि )

महाराष्ट्राचा केंद्र शिवबा रामदास गुरु जोडिला
तान्हा येसू बाजीसंगें स्वराज्यपाया घातला ॥ धृ० ॥

आदीलशाही मोडकळीला
मोंगल बघती ग्रुसावया
जर्जर केलें महाराष्ट्राला
चहूंकडोनी गांजला ॥ १ ॥

गोरक्तांचे पाट वाहती
धर्म सनातन बुडवीती
पतिव्रतांना नाहक छळती
अनर्थ ऐसा मांडिला ॥ २ ॥

तात शहाजी अविंधपदरीं
माय जिजाई शिवनेरी
विनवि भवानिस दुरित निवारी
प्रसंग दारुण ओढला ॥ ३ ॥

वदे भवानी प्रसन्न चित्तें
भावि कार्य तव होइल फत्ते
स्वराज्य मिळविल महाराष्ट्रातें
तव उदरीं तो राहिला ॥ ४ ॥

शुभकर मंगल वेळा आली
दास्याची रजनी सरली
स्वराज्यकिरणें फांकुं लागलीं
स्वराज्य दिनकर पातला ॥ ५ ॥

सन सोळाशे सत्तावीस
मिळे मातृपद जिजाइस
वेत सदाशिव अवतारास
शिवाजिराजा जन्मला ॥ ६ ॥

प्रथम घेऊनी किल्ला तोरण
भावि यशाचें बांधी तोरण
आखाड्यामधिं दंड थोपटुन
मुहूर्तझेंडा रोविला ॥ ७ ॥

पुण्या नजिकचा गड कोंडाणा
सुर्ती मोतीं गडांत तो
घेउं देइना अविंध कवणा
आधिं पाहिजे घेतला ॥ ८ ॥

मालुसऱ्यांचा धन्य वंश तो
तान्हाजी हा हिरा चमकतो
स्वातंत्र्याच्या मुकुटिं झळकतो
मित्र शिवाचा शोभला ॥ ९ ॥

कोंडाण्याचें लगीन आधीं
भाग्य शिकंदर दे संधी
चढे तयाला मग रणधुंदी
गडी मावळा धावला ॥ १० ॥

आज रात्रिला मी गड घेइन
मारिन किंवा मरेन
स्वदेशसेवा इमान राखिन
वीर मराठा गर्जला ॥ ११ ॥

क्षत्रिय तान्हा मर्द मराठा

अभिमानाचा वट्टु मोठा
जीवंत स्फूर्ती घेउनि सोटा
जलबंधारा फोडिला ॥ १२ ॥

गड आला पण सिंह गमविला
नाम सिंहगड पावला
हा तान्हाचा स्मारक झाला
जगांत हालत राहिला ॥ १३ ॥

विशाळगडच्या खिंडीमाजी
शौर्य गाजवी प्रभुबाजी
प्राण अर्पुनी रक्षि शिवाजी
स्वामीकार्या जागला ॥ १४ ॥

जशास तैसें ह्या न्यायानें
अफजुल्ल्याला वाघनखानें
स्वर्गी धाडिलें उघडपणानें
स्वराज्यकर्णा फुंकिला ॥ १५ ॥

विजयालक्ष्मी हात जोडुनी
ये महाराष्ट्रा मागुनी
ऋद्धी सिद्धी आनंदभुवनीं
मौक्तिक उघडे शिंपला ॥ १६ ॥

-घाहिस्त्याची मस्ती जिरली
बोटावरती सूटला
शिवराजाची करामत भली
औरंगजेबहि चकारला ॥ १७ ॥

सन सोळाशें चौऱ्याहत्तरांत
राजशकाला हो सुरवात

राम चहुंकडे महाराष्ट्रांत
दासबोधें नांदला ॥ १८ ॥

आर्त जनांचें दुरितनिवारण
गोविप्रांचें प्रतिपालन
परस्त्रियांना माता समजुन
स्वराज्यगाडा हांकला ॥ १९ ॥

सन सोळाशे ऐंशी सालीं
काळयमाची हो मात
महाराष्ट्राच्या वांट्या आली
भानु राहुनें ग्रासला ॥ २० ॥

गुडघीनामें रोग शिवाला
अवताराचि तो संपला
करुनि पोरकें महाराष्ट्राला
वैकुंठीं शिव चालला ! ॥ २१ ॥

---

# हे तों स्वराज्यप्राप्तीचें साधन

ओव्या

देशामध्यें धर्मामध्यें ॥ समाजामध्यें गांवामध्यें
जन्म घेतला ज्या कुलामध्यें ॥ त्याचा पाहिजे अभिमान ॥ १ ॥
देशाची परिस्थिती जाणावी ॥ समाजाची परीक्षा करावी
स्वधर्म-आज्ञा पाळावी ॥ सांडूं नये स्वाभिमान ॥ २ ॥
सोडूं नये कुलधर्मकुलाचार ॥ स्वदेश धर्म आचार
स्वाभिमानाचा विचार ॥ थांबवूं नये प्राणांतीं ॥ ३ ॥

स्वाभिमान जेथें नाहीं ॥ जन्मकर्माचा विचार नाहीं
स्वधर्म-पाळणा होत नाहीं ॥ तेथें जाणावी अधोगती ॥ ४ ॥
कैसा तो पूर्वजांचा अभिमान ॥ स्वदेशाचा स्वधर्माचा मान
गगनमंडळा भेदून ॥ त्रिलोकीं गर्जवी डंका ॥ ५ ॥
तीं माणसें ते दिवस गेले ॥ स्वाभिमानाचें वाटोळें झालें
अन्न मेलेलें खात बैसले ॥ जिवंत मुडदे घरोघरीं ॥ ६ ॥
मुडद्यांना द्यावया चेतना ॥ धावला लोकमान्य तिलकराणा
रहस्य संजीवन गितामृतपाना ॥ पाजोनिया मुडदे उठविले ॥७॥
कर्मयोग रवि उगवला ॥ स्वाभिमानाचा प्रकाश पडला
जन्मकर्माचा उलगडा केला ॥ रहस्य गीता ग्रंथानें ॥ ८ ॥
लोकमान्य रहस्यकार ॥ जाहला कर्मयोगावतार
करावया हिन्द-भू-उद्धार ॥ तिलककुलीं प्रगटला ॥ ९ ॥
कर्मयोगस्थापना केली ॥ ही तों यशाची गुरुकिल्ली
सुगम करोनी दाखविली ॥ स्वराज्यमंदिर उघडावया ॥ १० ॥
कवाडें स्वराज्यमंदिराचीं ॥ ती कशीं केव्हां उघडायाचीं
शिकवण लोकमान्यांची । स्वराज्यमंदिरीं जावया ॥ ११ ॥
गुरु लोकमान्यांसारिखा ॥ सदा सर्वदा पाठीराखा ।
तेथें काय न हो शक्य देखा ॥ राम शाहीर ग्वाहि दे ॥ १२ ॥

---

## ( २ )

इतिहास मागला पहावा ॥ तो आपुल्यापुढें ठेवावा
नंतर कार्यभाग उचलावा ॥ राजकारणीं ॥ १ ॥
नाहीं सोपें राजकारण ॥ असावें लागतें सावधान
बारकाईनें निरिक्षण ॥ केलें पाहिजे जनतेचें ॥ २ ॥

काय केलें पूर्वजांनीं ॥ तें आणोनिया ध्यानीं
पाउलावरी पाऊल टाकोनी ॥ चालावें सर्वदा ॥ ३ ॥
कोणावरी विश्वास ठेवावा ॥ कोण आपला मित्र म्हणावा ॥
शत्रु तोहि कसा ओळखावा ॥ हें आधीं शिकलें पाहिजे ॥ ४ ॥
जें सुखदुःख समाजाचें ॥ तें आपुलें समजायाचें
हें तो स्वदेशभक्तीचें ॥ जाणावें लक्षण ॥ ५ ॥
चहूंकडे राखावी नजर ॥ मन ठेवोनी निर्विकार
ओळखावा सावचोर ॥ राजकारण साधाया ॥ ६ ॥
काळ वेळ प्रसंग पाहून ॥ बदलावें आपुलें धोरण
कैसा वारा वाहतो जाणून ॥ पाठ तैशी फिरवावी ॥ ७ ॥
कार्यावरती नजर द्यावी ॥ मनाची स्थीरता ठेवावी
कृती करोनी दाखवावी ॥ वाच्यता नंतर ॥ ८ ॥
जो जसा अर्थ करील ॥ तैसें त्या फळ मिळेल
हे राम शाहीराचे बोल ॥ राजकारण साधाया ॥ ९ ॥

---

( ३ )

जेथें घडती भ्रूणहत्या । स्त्रीहत्या गोहत्या राजहत्या
जेथें घडे स्वराज्य हत्या ॥ तेथें स्वराज्य मिळणें नाहीं ॥ १ ॥
भिक्षुकशाहीचें बंड ॥ माजलें ब्राह्मणेतरांचें बंड
धार्मिक भावना झाल्या थंड ॥ तेथें स्वराज्य मिळणें नाहीं ॥ २ ॥
कांहीं न करितां स्वस्थ बैसती ॥ वितंडवाद काढिती
तंटे बखेडे करिती ॥ तेथें स्वराज्य मिळणें नाहीं ॥ ३ ॥
जाहला लुप्त स्वाभिमान ॥ स्वार्थासाठीं लांगूलचालन
विसरला असे मी कोण ॥ तेथें स्वराज्य मिळणें नाहीं ॥ ४ ॥
देश विसरला वेश पालटला ॥ जन्म माझा कोण कोठला

मोठा गहन विचार पडला ॥ तेथें स्वराज्य मिळणें नाहीं ॥ ५ ॥
तोंड असोनी बोलूं शकेना ॥ कान असोनी ऐकूं येइना
डोळे असोनी पाहूं शकेना ॥ तेथें स्वराज्य मिळणें नाहीं ॥ ६ ॥
बुद्धि असोनि उपयोग कळेना ॥ अन्न असोनि खातां येईना
मित्र कळेना शत्रु कळेना ॥ तेथें स्वराज्य मिळणें नाहीं ॥ ७ ॥
रोमरंध्री स्वार्थ भरला ॥ स्वजन माराया सर्वदा टपला
कारणें शत्रू घरांत घेतला ॥ तेथें स्वराज्य मिळणें नाहीं ॥ ८ ॥
मित्रद्रोही स्वजनद्रोही ॥ देशद्रोही मातृद्रोही ॥
पुढचा मागला पोंच नाहीं ॥ स्वराज्य तेथें अशक्य ॥ ९ ॥
कांहींही मिळवितां येईना ॥ मिळालेलें सांभाळवेना
राखोनिया तें भोगवेना ॥ तेथें स्वराज्य मिळणें नाहीं ॥ १० ॥
करोनिया एकीचें वाटोळें ॥ कर्तव्यमंदिरा लाविलें टाळें
स्वधर्मा फासिलें काळें ॥ तेथें स्वराज्य मिळणें नाहीं ॥ ११ ॥
रूढीचे अभेद्य दरवाजे फोडा ॥ दुहीचा वृक्ष समूळ तोडा
खऱ्या आर्यधर्माचा बांधा वाडा ॥ तेणें स्वराज्य प्राप्त होईल ॥ १२ ॥
जैशी इच्छा तैसें फल ॥ निश्चयाचें पाहिजे बल
परंतु प्रयत्नेंविण सर्व फोल ॥ रामशाहीर बोलिला ॥ १३ ॥

( ४ )

धर्माची पाळणा होत नाहीं ॥ परिस्थितीची जाणीव नाहीं
आत्मत्वाची ओळख नाहीं ॥ तेथें कसलें स्वराज्य ? ॥ १ ॥
स्वार्थाचे बनले दास ॥ एकमेका मारावयास
घरांत घेती वैरियास ॥ तेथें कसलें स्वराज्य ? ॥ २ ॥
जो तो दुसऱ्यावर गुरकावतो ॥ स्वतःला शहाणा म्हणवितो
प्रसंगाला माघार घेतो ॥ तेथें कसलें स्वराज्य ? ॥ ३ ॥
पाहिजे मिरवाया पुढारीपणा ॥ काम कराया नको कोणा

कांहीं केल्या स्वार्थ सुटेना ॥ तेथें कसलें स्वराज्य ? ॥ ४ ॥
तूप ओढी पोळीवर ॥ नाहीं देशस्थितीचा विचार
सदा रंगंढगामधें चूर ॥ तेथें कसलें स्वराज्य ॥ ५ ॥
देशामाजी नाटकी वृत्ती ॥ प्रेमशृंगार वाढे महती
नव्या फ्याशन्‌ला बळी पडती ॥ तेथें कसलें स्वराज्य ? ॥ ६ ॥
पाश्चिमात्य सुधारणा नव्या ॥ किती ह्मणोनी सांगाव्या
अकला सर्व लया जाव्या ॥ तेथें कसलें स्वराज्य ? ॥ ७ ॥
पूर्वजांना ठेवोनिया नांवें ॥ परकीयांच्या सर्वस्वा भुलावें
तुकड्यासाठीं श्वान बनावें ॥ तेथें कसलें स्वराज्य ? ॥ ८ ॥
शेळीमाजी व्याघ्र छावा ॥ आपलेपणा विसरोनि जावा
हें जोंवर आलें नाहीं अनुभवा ॥ तोंवर कसलें स्वराज्य ! ॥ ९ ॥
मी कोण पाहिजे जाणिलें ॥ तैसें आत्मत्व पाहिजे राखिलें
स्वराज्य का वाटेवर पडलें ॥ ह्याचा विचार करा सुजनहो ॥ १० ॥
जरी वाटे भाग्य यावें ॥ तरी उफराटें वागणें सोडावें
राम शाहिरी बोल ऐकावे ॥ त्यांत कल्याण होईल ॥ ११ ॥

( ५ )

आपुला जातभाई बाटला ॥ काय कारणें परधर्मी गेला
ह्याचा पाहिजे विचार केला ॥ पूर्णपणें ॥ १ ॥
त्याला घडलें काय कारण ॥ हें आधीं काढावें शोधून
नंतर त्यांचे निवारण ॥ करणें हेंचि योग्य असे ॥ २ ॥
कोणी ते दुष्काळामुळें ॥ कोणी ते जलप्रलयामुळें
कोणी साथीच्या रोगामुळें ॥ महाग झाले अन्नाला ॥ ३ ॥
कोणी जातबंधू विचारिना ॥ धंदा तोही कोठें मिळेना
भीक तीही कोणी वाढीना ॥ करावें काय मग त्यांनीं ? ॥ ४ ॥
ऐसा ओढवतां प्रसंग दारूण ॥ विधर्मीय घेती संधी साधून

आमीष भूतदयेचें दाखवून ॥ हिन्दूंना पै बाटविती ॥ ५ ॥
जातबंधुना नाहीं विचारिलें ॥ आम्हा सोडोनी परधर्मी गेले
पश्चात्तापें तळमळूं लागले ॥ स्वधर्मी यावया ॥ ६ ॥
धर्माचीं कवाडें बंद केलीं ॥ हिंदवीशक्ती कमी झाली
तिसाची बाविस कोटिवर आली ॥ ह्याला कारण कोण हो ? ॥ ७ ॥
धन्यधन्य श्रद्धानंद ॥ शुद्धीचळवळ करी उदंड
धर्मद्वार उघडे अखंड ॥ संघशक्ती वाढवावया ॥ ८ ॥
जितुके जातभाई बाटले ॥ ते शुद्ध करोनी म्हणा आपुले
सोळा आणे काम झालें ॥ निश्चयें ध्येयप्राप्ति होईल ॥ ९ ॥
ज्या दिनीं बाटला शब्द नुरे ॥ तेंच शुद्धीचें कार्य खरे
हें कार्य सत्वरी कारितां बरें ॥ इच्छीत पूर्तता होईल ॥ १० ॥
शुद्धीकरण गोरक्षण ॥ करणें धर्माचें पालन
हें तों स्वराज्यप्राप्तीचें साधन ॥ रामशाहीर ग्वाहि दे ॥ ११ ॥

---

## घ्या बंधु पुन्हां धर्मात

( चालः—सुनो सुनोजी मेरे यार. )

आ! शुद्धिकरण हातांत । घ्या बंधु पुन्हां धर्मात ॥ धृ० ॥
बाटुनी मुसल्मिन् झाले । पोटार्थी खिस्ती बनले ॥
घातला मुळावर घाव । बाटले गांवच्या गांव ॥ १ ॥
धार्मीक कवाडें उघडा । प्रतिबंध येथला दवडा ॥
हेकाचि आपुला सोडा । नातरीं पायिं तो खोडा ॥ २ ॥
आजला शुद्धिकरणाचें । कार्य हें मोल नच त्याचें ॥
हें भाग्य आर्य संस्कृतिचे । आधारस्तंभ किल्ल्याचे ॥ ३ ॥

हा अजिंक्य होईल किल्ला । देईल जगाला सल्ला ॥
करूं शके न कोणी हल्ला । वाढवा आर्यधर्माला ॥ ४ ॥

अनाथ विद्यार्थिगृह मेळा १९२३

---

# कवाडें आर्य धर्माचीं

[ कवाली ]

कवाडें आर्यधर्माचीं । उघडणें हें कार्य पहिलें ॥ धृ० ॥
आह्मां घ्या परत धर्मांत । वाढवा शक्ति बल आपुलें ॥ १ ॥
सक्तिनें धर्म इसलामी । सेविला कां पूर्वजांनीं ॥
ख्रिस्तधर्मी कितीक गेले । खुशीनें का आणा ध्यानीं ॥ २ ॥
आम्ही तुमचे जातभाई । देशबंधू पूर्वींचे ना ।
हृदय आमुचे आर्य आहे । नाहीं विकलें अजुनी कोणा ॥ ३ ।
आमुचा सर्व आचार । विधी सगळे आर्यधर्मी ।
' बाटलेला ' घोषणा ही । सोसवेना घाव वर्मी ॥ ४ ॥
स्वधर्मे निधनं श्रेय । अन्यधर्मी भयंकर ते ।
वदे जे हें कृष्णभगवान् । आज त्याची साक्ष पटते ॥ ५ ॥

जुना मावळी मेळा १९२४

---

# धर्मडंका वाजवा

( चालः—पांडवा सम्राटपदाला. )

उठा हिंदू, सर्व बंधू, धर्मडंका वाजवा
धर्मतेजें, भारताचें, दैन्य सारें घालवा ॥ धृ० ॥
बाटले जे, बंधु आपुले, अन्यधर्मी जाउनी ॥
आज त्यांना, परत घ्याना, शुद्धी गंगा पाजुनी ॥ १ ॥
धर्मकार्या, शुद्धिकार्या, संघशक्ती वाढवा ॥

शुद्धीच्या ह्या, चळवळीनें, धर्मऱ्हासा थांबवा ॥ २ ॥
अन्यधर्मि गनिमी कावे, ओळखोनी, वागणें ॥
स्वधर्माचें, जतन करणें, धर्मबीजा, राखणें ॥ ३ ॥
हिंन्दभूच्या, धर्मबाळा, विपत् कालीं तारणें ॥
शत्रु येती, जिंकु बघती, सत्वरी त्या कारणें ॥ ४ ॥
विधर्माचे, पाश तोडा, स्वाभिमाना, जागवा ॥
पुण्य जोडा, जातभाई बाटतांना सोडवा ॥ ५ ॥

कुंजीर तालीम मेळा.

---

# मुसलमानी कावा

( चालः-- नारायण अडला )

हा मुसलमानी कावा । महंमदि धर्म वाढवावा ॥ धृ० ॥
भीतिप्रद हा प्रसंग दारुण हिंदू धर्मावरला ।
सर्व हिंदुनीं एक जुटीनें दूर पाहिजे केला ॥ १ ॥
कैक लागती हिंदू नादीं मुसलमान फकिराच्या ।
गुरुस्थानिं त्या वंद्य मानुनी पायां पडती त्यांच्या ॥ २ ॥
सापाला जरि दूध पाजिलें तरी उलट तो चावे ।
तद्वत जाणा ह्या फकिरांचे सारे उलटे कावे ॥ ३ ॥
हिंदू शिष्याकडून ह्यांना जितकी मिळकत होते ।
तितकी सगळी खर्ची पडते हिंदू बाटविण्यातें ॥ ४ ॥
हे वरकांती गोभक्तीचें अवडंबर माजविती ।
अंधभक्तिनें भोळे हिंदू भोंदुगिरीला फसती ॥ ५ ॥
तुमचा पैसा घेउनि उलटी तुम्हांवर कुरघोडी ।
हिंदू धर्माविरुद्ध खटपट ह्यांची लांडि लबाडी ॥ ६ ॥

ह्या फकिरांनीं जागोजागीं अड्डे स्थापन केले ।
अज्ञ हिंदुना बाटविण्यातें ह्यांचे हिंडती चेले ॥ ७ ॥
धर्म सुखाचा इहपरलोकीं ज्याचा त्याला होतो ।
स्वधर्म त्यागिल तोच पातकी अधोगतीला मिळतो ॥ ८ ॥
हिंदु वंधुनो उठा झडकरी अझुनी उघडा डोळे ।
नको भोंदु ते मुसलमान गुरु पुरे करा हे चाळे ॥ ५ ।
आपुल्या धर्मामधें नसती कां संत महात्मे थोर ।
नको ह्यापुढें परधर्मांतिल चोरावरले मोर ! ॥ १० ॥
धर्मासाठीं जगणें मरणें श्रीहरिचा हा बोध ।
स्वतंत्र व्हाया ह्या रिव्यांतुनि तुझा मार्ग तूं शोध ॥ ११ ॥
ऊठ भारता कर्मयोगि हो धर्मरक्षणासाठीं ।
साह्य करी तुज मुरलीवाला श्रीहरि आहे पाठीं ॥ १२ ॥

सन्मित्र समाज मेळा १९२५

---

# कांहीं तरी लाज !

(चाल— मावळी.)

उठा चलारं चला मावळं संमदं जाउ मिळुन ।
रायगडावर शिवरायाचं घेउंया दर्शन ॥ धृ० ॥
तिनशें वरुषें होतिल त्याला जन्मा येऊन ।
म्हणुन तयाचा उत्सव साजरा करुंया जाऊन ॥ १ ॥
जोंवर आपुला गिरि सह्याद्री उभा ठाकलारं ।
पुन्हा तोंवर शिवरायाचा अवतार होणारं ॥ २ ॥
संमद्या गडावर आहेत शिवाचे चिरंजीव वीर ।
शिवरायासह स्वराज्यगादी पुन्हा स्थापणार ॥ ३ ॥

आमचं शिववा आम्ही मावळं त्यांचं वंशज ।
म्हणवुन घ्याया वाटली पाहिजे कांहीं तरी लाज ॥ ४ ॥
अभिमानानं तुम्ही घेतसा मावळं म्हणवून ।
नव्हं फुकटचरं कुठं आहे रं, तसं आपलं वागणं ॥ ५ ॥
शिवराय आमुचा जसं सांगता, तसं दाखवा कृतिनं ।
पुरे जाहलं सदान् कदातें तुमचं वायफट बोलणं ॥ ६ ॥
गडा गडावर जागता पहारा मृतात्मे मावळ्यांचा ।
तुमची तयारी झाल्यावर मग फुटेल त्यांस वाचा ! ॥ ७ ॥

---

## आपल्या रायबाचं लग्न होउं द्या

(चाल-- फटक्याची)

आपल्या रायबाचं लग्न होऊं द्या मधेंच काय काढलं ।
अहो तान्हवा येवढं पाहिजे आमचं म्हननं ऐकलं ॥ धृ० ॥
कसलं रायबाचं लग्न अगूदर घेऊनशानी बसलात ।
तकड कोंडाणा वाट पहातो घ्या समशेर हातांत ॥ १ ॥
चला मर्दांनों फुंका फुंकार शिंग लढाईचं ।
आज रात्रिला घेईन कोंडाना घेतलं वान सतीचं ॥ २ ॥
तथं किल्लेदार उदयभानुरं रजपुत बाटलेला ।
अरं लाविला त्यानं काळिमा रजपुत नांवाला ॥ ३ ॥
कसलं रजपुत अपुल्या बायका देती मोगलाला ।
तुम्हीच सांगा कसं आवडल आई भवानीला ॥ ४ ॥
तिनच केला हुकुम शिवाला घे घे कोंडाणा ।
कामगिरीवर पाठव आपुला बालमितर तान्हा ॥ ५ ॥
चहूंकडुनरं ह्या मोगलांनीं सळो पळो केलं ।

तुम्हा आम्हास्नि बायकावानी रंडक बनविलं ॥ ६ ॥
तुमच्या बायका आया बहिनी धरुनशानी नेती ।
दिवसा ढवळ्या वळजोरीनं विटंबना करिती ॥ ७ ॥
देवळं फोडिती पोथ्या जाळल्या गाया कापत्यात ।
रडता कशाला बायकावानी बांगड्या भरानात ॥ ८ ॥
समदं मावळं एक दिलानं पडूं घराबाहीर ।
शिवरायाला उदयभानुचं बहाल करूं शीर ॥ ९ ॥
अशा नोडग्यांची पोटासाठीं चाकरी करनार ।
आपुन् कोण हो विसरून गेलात् थुःत् तुमच्यावर ॥ १० ॥
तोच मराठा भिणार नाहीं कृतांत काळाला ।
बोलरं बोला हरहर बोला चला कोंडाण्याला ॥ ११ ॥
कोंडाण्याचं लगीन उरकुन थाटानें येऊं ।
शिवराय रायबाच केळवण देईल आनंदानं खाऊं ! ॥ १२ ॥

जुना मावळी मेळा १९२५.

---

# सार वाटोळ संमद्यांच क्याल !

( चाल- फटक्याची )

अहो राणोजी-रावहो तुम्ही दरबारचे ल्वाक ।
आम्हासी सांगा कांहीं तिकुडली खबरबात एक ॥ धृ० ॥
कायराव सांगू तुम्हास्नी आतां कपाळ आपलं फुटलं ।
पिसाळ सूर्याजीनं सार वाटोळ संमद्यांच क्याल ! ॥ १ ॥
लाच खाऊनि फितूर झाला झुल्फिकर खानाला ।
आपल्या हातानं च्वार दरवाजा त्यानं खुला क्येला ॥ २ ॥
अहो लाविला ह्यानं कालिमा मऱ्हाठ नांवाला ।

कुऱ्हाडीचा दांडा गोताला, काळ पिसाळ झाला ॥ ३ ॥
राजलक्ष्मी येसूबाईला तस बाळ राज ।
नेल मोगलानीं कैद करोनी काय राह्यली लाज ॥ ४ ॥
थोरल्या महाराजाना कायर सगींत वाटल ? ।
ह्याची नाहीं कार शरम कुणाला, फितूरीनं घेरलं ॥ ५ ॥
ही फितुरीची कीड लागली मऱ्हाठशाहीला ।
नऱ्हर वर तिच्याच पायीं मुकाल राज्याला ॥ ६ ॥
आपल्या संभाजी महाराजांना गफलतीनं धरलं ।
तुळशी रांडचं शिरक्या गणूच कारस्थान भवलं ॥ ७ ॥
तापलेल्या सांडसानं तर आधीं ड्वाळ फोडलं ।
काय सांगू मी महाराजांच किती हाल झालं ॥ ८ ॥
तरी अस्सल छावा सिंहाचा नाहीं डगमगला ।
' काळ तुलाही बसला खायाला ' बोले अलमगिराला ॥ ९ ॥
महाराजांनीं समद्या परजेला निरोप पाठविला ।
' आम्ही जातो राज्य संभाळा हाकलुन मोगलाला ' ॥ १० ॥

जुना मावळी मेळा १९२५.

---

# मरा किंवा मारा

( चाल - फटक्याची )

हां खबरदार माघार घ्याल तर मरा किंवा मारा ।
नाहीं घडगत उपाय राह्यला काय वी आतां करा ॥ ध्रु० ॥
भ्याडावानी जिवंत मुडदा घरीं घेऊन जाल ।
थुःत् तुमच्या तोंडावरती बायका थुकत्याल ॥ १ ॥
काळतोंड हें नका दाखवूं तेथ कां न मेला ।

पळपूटयाची ही कारभारीण नांव ठेवत्याल मजला ॥ २ ॥
मुर्दाडांनो तुम्हास बायका असं बोलत्याल ।
घरीं जाल तर तुमच्या नांवानं कुंकू पुसत्याल ॥ ३ ॥
षंढावानी पळूनशानी कुठं चाललारं ।
बाप मरुनशानी पडला त्याची शरम नाहीं कारं ॥ ४ ॥
दोर कापुनी चहूं बाजुची केलि बंद वाट ।
फिरा माघारी तान्हासाठीं करा छाति कोट ॥ ५ ॥
समक्ष तुमच्या लाथ मारली तुमच्या बापाला ।
कारं डोळ्याच्या खाचा झाल्या बायका का न झाला ॥ ६ ॥
मावळा मराठा कधीं न दावी शत्रूला पाठ ।
आज होउंद्या रणांगणावर मेजवानि थाट ॥ ७ ॥
कायरं बघता टकमक आतां हर हर हर बोला ।
पहा सर्गाचीं दारं उघडलीं तुम्हास जायाला ॥ ८ ॥

जुना मावळी मेळा १९२४.

---

## अफजुलखानाचा वध

( चाल:— पोवाड्याची. )

ऐका ऐकारं शिवरायानं अफजुलखानाला ।
वाघ-नखानं वाट सर्गाची दाखवली त्याला ॥ धृ० ॥
विजापूरच्या बादशहानं दरबार भरविला ।
विडा पैजेचा ठेवला मांडून शिवाजी धरण्याला ॥ १ ॥
अफजुलखानानं विडा उचलिला मोठ्या घमेंडीनं ।
म्हणे शिवाजी घुंगुरड्याला क्षणांत चिरडीन ॥ २ ॥
डुरकत डुरकत सवारी आली वाई प्रांतांत ।

तिथुन शिवाजिस निरोप धाडिला वकिलामार्फत ॥ ३ ॥
शिवरायानं वकिलाचरं ऐकुन बोलणं घेतलं ।
प्रसंग पाहून बोलणं खानाचं सर्व कबूल केलं ॥ ४ ॥
राजकारणीं डाव टाकलारं वकिला मथवून ।
ठरलं दोघांचं कसं वागण्याचं धोरण ठेवून ॥ ५ ॥
मज भेटाया यावं खानानं जावळी रानांत ।
निरोप ऐकून रंगून गेला खान आनंदांत ॥ ६ ॥
शिवरायाला दिला आशिर्वाद भवानी देवीनं ।
लिंबलोण मग उतरून टाकिलं जिजा मातुश्रीनं ॥ ७ ॥
प्रतापगडावर सर्व बाजूंनीं बंदोबस्त केला ।
ठीकठिकाणीं चौक्यावरतिरं जागता पहारा ठेवला ॥ ८ ॥
सर्व मनसुबारं ठरवुन ठेवला भेटीच्या पुढला ।
शरण तुम्हां मी निरोप ऐसारं पाठवि खानाला ॥ ९ ॥
निरोप ऐकून खान गर्वानं शेफारून गेला ।
संपली लढाई मजा करा तुम् सांगे लष्कराला ॥ १० ॥
खानानं शिवाला भेटप्रसंगीं मगरमिठी मारिली ।
बगलेमाजीरं शिवरायाची मुंडी आवळुन धरली ॥ ११ ॥
होणार असं हें आधिच शिवाला सपन होतं पडलं ।
म्हणून तयानं सावधगिरीनं आपलं कार्य साधलं ॥ १२ ॥
खानाच्या उदरांत शिवाचीं वाघनखं घुसलीं ।
किंकाळी फोडली अफजुल्यानं आंतडीं बाहेर आलीं ॥ १३ ॥
दाणादाण उडविली खानफौजेचि मराठयांनीं ।
शिवराय सुरक्षित गेले गडावर जयजयकारानीं ॥ १४ ॥
महाराष्ट्राच्या दास्यबेडीचा एक दुवा तोडला ।
पहिलाच गडावर शिवशाहीचा दरबार भरविला ! ॥ १५ ॥

मावळे मराठे मुजरे करिती श्रीशिवरायाला ।
थाट शाहिरी थाफ डफाची नाद घुमूं लागला ॥ १६ ॥
तोच मराठा तोच मावळा वंशज शिवबाचा ।
देशकारणीं धर्मकारणीं देह झिजे ज्याचा ॥ १७ ॥

जुना मावळी मेळा १९२७.

---

# लपला होता हिरा मातींत

( चालः— भाव धरारे० )

धन्य धनगर । मल्हारराव होळकर ॥ धृ० ॥
राखि मेंढरें बालपणांत ।
लपला होता हिरा मातींत ।
बाजिरावांनीं केला प्रगट ।
हिरा तेजदार । मल्हारराव होळकर ॥
पळ पळ वाढे तेज तयाचें ।
प्रसंग साधी आणिबाणिचे ।
तेज चमकवी पेशवाईचें ।
शौर्यसागर । मल्हारराव होळकर ॥
कर्तृत्वावर वैभव मिळतें ।
उच्च नीच हा भाव न तेथें ।
ऋद्धी सिद्धी पाणी भरते ।
धन्य सरदार । मल्हारराव होळकर ॥
जरी जातिनें हलका झाला ।
जरी जन्म गरिबाकुळीं झाला ।

पराक्रमानें वरती चढला ।
धडा शिकविला शिकेल त्याला ।
धन्य धनगर । मल्हारराव होळकर ॥

अजापाल मेळा.

---

# सुधारणा ही बोकाळली आज.

पहा पहा कशी सुधारणा ही बोकाळली आज ।
ढंग नाटकी फ्याशन वाढती नित्य नवीन रोज ॥ धृ० ॥
मर्दावानी असूनशानी राव मिशा काढित्याती ।
कोणि बाजूच्या अर्ध्याच काढती 'फिरांच' कट म्हनती ॥ १ ॥
न्हावी दादांची चंगळ झाली हेअरकटिंग सलून ।
दोन आन नुस्त्या दाढीला झुलपास आठ आन ॥ २ ॥
कईक करती घरींच दाढी ईलायती मशीनानं ।
बुरूस वस्तर घरोघरीं राव ईलाइती सामान ॥ ३ ॥
गल्लोगल्लीं झाली हाटेल चहा, भजी, शाव ।
न्याहरी सकाळची तथच त्यांची वडा मिसळ पाव ॥ ४ ॥
संमद्या जातीच सहभोजन आनायास घडत ।
घर टाकुनशानी तथं गेल्याविन परान नाहीं रहात ! ॥ ५ ॥
सिनमान तर याड लावल संमद्या लोकाला ।
ईलायति फिलमा पाहून शिकल चोरी करायाला ! ॥ ६ ॥
सिनेमासाठीं ल्हान पोर पैसे चोरत्यात ।
त्याचा कोनीबी ईचार करीना डोळं झाकल्यात ॥ ७ ॥
तंशी तमाशावजा नाटक वलण [illegible] लावती ।
गंधर्वांच्या हावभावावर कशी दुनया झुलती ॥ ८ ॥

एक घरही सुनं दिसेना नाटकी फ्याशन ।
चांगलं सोडून वाईट तितुकं घेतल शिक्षन ॥ ९ ॥
मोठीं मोठीं देती व्याख्यानं पहा पोपटावानीं ।
एका माळच मनीच संमद् ववायला नाहीं कोनी ॥ १० ॥
बाप मुलांचा अडवुनी पैका लग्नामधी घेती ।
संमद्या चांगुल्या लोकांमधीं कमान ही चढती ॥ ११ ॥
लोका सांगती सुधारनेच्या लांब लांब गप्पा ।
स्वतः कोरड पाषानचि हे ब्रह्मज्ञान थापा ! ॥ १२ ॥

जुना मावळी मेळा, १९२४

---

# तुझें वाटोळें होईल

( चालः— मला मुंबईला जायचं. )

तुझें वाटोळें होईल । कोंडीबा नको जाऊं रेसला ॥
पहिलाः—पुण्यामध्यें जाईन । रेस ग्राऊंड पाहीन । तेथें घोडें लावीन ।
मग होईन बडा पैसेवाला ॥ १ ॥
दुसराः—शहरामध्यें जाशील । लोक नादीं लावतील । तुला भुरळ घालतील।
पडशिल बळी व्यसनी मोहाला ॥ २ ॥
पहिलाः—प्रथम पांच लावीन । त्याचे पंचवीस करीन । पुढें शंभर कमवीन ।
वेळ नाहीं त्याचे हजार व्हायला ॥ ३ ॥
दुसराः—कैक रेस खेळले । श्रीमंत नाहीं झाले । भीका मागूं लागले ।
बायका पोरांना लावुन देशोधडीला ॥ ४ ॥
पहिलाः—खेडेगांवात राहणं । हातीं नांगर धरणं । शेतामध्यें रावणं ।
नाहीं साधन शोक पुरवायला ॥ ५ ॥
मौजच मौज शहरांत । रेस सिझन सुखांत । पैसा खेळतो हातांत ।
यात्रेसारखीच गर्दी लोटते रेसला ॥ ६ ॥

दुसराः—सारे घालवून बसशील । मित्र सोडून जातील । सावकार लोकं
येतील । तुझें दिवाळं वाजलें सांगायला ॥ ७ ॥
नको जाऊं शहरांत । आपल्या खेडेगांवांत । कष्ट करशील शेतांत ।
नाहीं कमतरता पडणार कसली तुजला ॥ ८ ॥
पहिलाः—वेळेवर मला । तुझा बोध पटला । माझा निश्चय ठरला ।
शेतकी टाकून जाणार नाहीं रेसला ॥ ९ ॥
हातीं नांगर धरीन । झटून पेरणी करीन । त्यांत पीक काढीन ।
संपन्न करीन माझ्या खेडेगांवाला ॥ १० ॥
दोघेः—खेडेगांवीं रहाल । शहरें ओस पाडाल । शेतकी करूं लागाल ।
तेव्हांच सुदीन येतील हिंदुस्थानाला ॥ ११ ॥
उठा बंधु सारे । हातीं नांगर घ्यारे । शिक्षणाचे भारे ।
वाहून आपलाच आपण नाश केला ॥ १२ ॥
हिंदुस्थानची शेती । सर्व तीच्या हातीं । आहे ध्येय प्राप्ति ।
म्हणून हिंद बनवा शेतकीवाला ॥ १३ ॥
राम शाहिरी बोल । त्यांतला अर्थ घ्याल । खोलातील खोल ।
राजकारणाचा डाव जिंकायला ॥ १४ ॥

कुंजीर तालीम मेळा.

---

# घडगत नाहीं दिसत !

(चालः— फटक्याची)

कशी रात्र झाली स्थिती आपुली घडगत नाहीं दिसत ।
नाहीं कुणाचा पायपोसही कुणाच्याच पायांत ॥ ध्रु० ॥
संमद्या ठिकाणीं भांडण तंटे विकोपास जाती ।
आपापसामधि एकमेकाचीं टाळकिरं फोडीती ॥ १ ॥

लोकमान्यांनीं गणपती उत्सव कशापायीं काढिला ।
आपण कोणहो व्हतो पूर्वीचं ह्येच तर शिकण्याला ॥ २ ॥
टाकलं बाजुला शिकणं त्यें हो राव बोकाळलं तंटं ।
त्याचा फायदा तुमच्या खर्च्याची तिसरा लावतो वाट ॥ ३ ॥
चहुकंडूनरं आधींच आपुन झालों कंगाल ।
फेशननं तर पुरं गाठलं सर्व लुटून नेलं ॥ ४ ॥
अवर्षणानं शेताचं तर नांव नाहीं उरल ।
पोटासाठीं बनले शेतकरी मजूर गिरणींतलं ॥ ५ ॥
सरकारपट्टी भरण्यापायीं इकती गुरंढोरं ।
संमदं पळत्याती मुंबई पुण्याला सोडून घरदार ॥ ६ ॥

जुना मावळी मेळा १९२५.

---

# ऐका लीला गमतीच्या.

( चालः— हा नारायण अडला. )

ह्या नंदीबैलांच्या । ऐका लीला गमतीच्या ॥ धृ० ॥
बरसातीविण कधीं न होते वळवळ गांडूळांची ।
तद्वत् सगळ्या सभा परिषदां टुर टुर दो दिवसांची ॥ १ ॥
व्यासपिठावर जोर जोरसे ठराव करिती पास ।
लगेच त्याच्या विरुद्ध वर्तन कृतिनें फाल्गुन मास ॥ २ ॥
ठरावाचि ह्या किती वाहिली आजवरी लाखोली ।
तरी म्हसोबा प्रसन्न नाहीं पूजा निष्फळ झाली ॥ ३ ॥
खानेकू हम् लढनेवाला चांदभाई है मेरा ।
ह्या तत्त्वावर सर्व चळवळी, का न वाजतिल बारा ॥ ४ ॥
आज कुणाचा पायपोस हा नाहि कुणाच्या पायीं ।

कुणी कुणाला मोजुन नाहीं घडी विस्कळित होई ॥ ५ ॥
किती स्वयंभू झाले पुढारी दे० भ० ह्मणवुनि घेत ।
एक न बेटा दृष्टीस पडतो खरा मायेचा पूत ॥ ६ ॥
मानपत्र वा हारतुऱ्यांचीं ओझीं ह्यांनीं वहावीं ।
मऊ बिछान्यावरी लोळतां देशभक्ति मिरवावी ॥ ७ ॥
देवपणासी घाव टाकिचे आधीं लागति खावे ।
हवें तुम्हांला स्वराज्य मग हे हाल कुणीं सोसावे ? ॥ ८ ॥
गप्पा ठोकुनि वाद खेळुनी बांधवनिंदा करुनी ।
काय मिळविलें सांगा आजवरी डोळे उघडा अजुनी ॥ ९ ॥

श्रीनामदेव मेळा १९२५.

---

# नाहीं तुमच्या सदना कौल !

(चाल — ऐकावा इतिहास)

नाहीं तुमच्या सदना कौल रे । व्यर्थ कशाला डौल ॥ धृ ॥
ज्या वेळेला स्वातंत्र्याचें उदक सोडिलें बाजीनें ।
स्वराज्य हत्तीवरली तेव्हां फाटुनि गेली झूल ॥ १ ॥
ज्या देशानें स्वातंत्र्याचे हक्क आपुले गमाविले ।
कुणी विचारि न जगीं तया मग वृथा ऐट कां फोल ? ॥ २ ॥
न्याय जगाचा तोचि पारधी ससा जयाचे हातांत ।
सत्तेवांचुनि मत्ता नाहीं राज–सत्य हे बोल ॥ ३ ॥
देश चालला रसातळाला अद्यापी कां उमजाना ।
ह्या सर्वांला कारण एकचि असे दुहीचें मूळ ॥ ४ ॥

अजुनि बंधुनो डोळे उघडा इतिहासाच्या घ्या बोधा ।
ना तरि आपुले सद्गुण होतिल अखेर मातीमोल ।। ५ ।।

अनाथ विद्यार्थीगृह मेळा १९२२

---

# नवरदेवांना शेलापागोटें ! !

( चालः— फटक्याची )

ऐका ऐका गमती ऐका आज कालच्या लग्नांच्या
कॉलेजांतील सुशिक्षितांच्या बी. ए. नंदीबैलांच्या ।। ध्रु० ।।
गोमाजीचा मुलगा होता बी. एस् सी. च्या वर्गात ।
मी पंधराशें घेईन हुंडा बसे ढोलके बडवीत ।। १ ।।
गोमाजीला पेन्शन होतें पन्नास रुपये महिन्याला ।
दोन मुलांची मिळकत होती सव्वाशेंची जोडीला ।। २ ।।
दोन मुलांचीं तीन मुलींचीं लग्नें झालेलीं होतीं ।
कधीं न त्यानें दिला मुलींचा हुंडा सहाशेंच्या वरती ।। ३ ।।
येऊन जाऊन दौलत त्यांची पेन्शन मिळकत पुत्रांची ।
येवढयाचवर गोमाजींची कमान चढली हुंडयाची ।। ४ ।।
" मुलगा आहे, कां ही थट्टा, वाटेवर कां तो पडला । "
वदे प्रौढिनें आहे मुलगा गोरा गोमटा शिकलेला ।। ५ ।।
दिधलें नंतर खमंग उत्तर मुलीच्या आईबापांनीं ।
बी. ए. एम. ए. गल्लोगल्लीं कुणी विचारि न ढुंकोनी ।। ६ ।।
मुलगा आहे म्हणुनच आलों आम्ही तुमच्या सदनाला ।
परंतु मुर्वत किंमत नाहीं तुमच्या बोलक्या तोंडाला ।। ७ ।।
कांहीं झालें तरी सोयरिक नाहीं करणें तुमच्याशीं ।
सैरावैरा खुशाल नाचा सोयर सुतक न आम्हाशीं ।। ८ ।।

नंतर बसले मनगट चावित दीर्घशहाणे गोमाजी ।
ज्याच्या त्याच्या तोंडीं झालें तात मुलाचा हा पाजी ! ॥ ९ ॥

---

## ( २ )

रावबहादुर परांजप्यांची गंमत घडली मिरजेला ।
व्यवहाराचा घ्या पडताळा अक्कल नाहीं गरजेला ॥ १ ॥
परांजप्यांनीं वडिल मुलाचें लग्न काढिलें करावया ।
पुण्यामध्यें त्या जाहिराती वेळ न लागे समजाया ॥ २ ॥
वय सोळाची सुंदर दुहिता जोशी विठ्ठलरावांची ।
पत्रोपत्रीं ठराव केले ठरली मुलगी पहाण्याची ॥ ३ ॥
अमुचे विठ्ठलराव निघाले मुलगी घेऊन मिरजेला ।
तेथें होते साठे स्नेही गेले त्यांच्या सदनाला ॥ ४ ॥
नंतर गेले दोघे स्नेही परांजप्यांच्या भेटीला ।
निर्बंध ठेविला नाहीं त्यानीं ताळतंत्र ना बोलाला ॥ ५ ॥
माल बरोबर नाहीं आणला एकटेच कां आलात ।
परांजप्यांनीं प्रश्न टाकिला वरपक्षाच्या घमेंडित ! ॥ ६ ॥
अहो जिभेला हाड न तुमच्या काय बोलतां बेताल ।
काय मुलींची किंमत करतां बाजारांतिल का माल ॥ ७ ॥
फार शहाणे अहांत आपण कळली तुमची माणुसकी ।
मनुष्य आणि पशू ह्यामध्यें काय ठेविली तुम्हि बाकी ॥ ८ ॥
असो ह्यापुढें कांहीं नाहीं बोलायाचें आम्हांला ।
आलों तैसे जातो आता परत आपुल्या सदनाला ॥ ९ ॥
शरमुन गेले रावबहादुर बोलुं लागले क्षमा करा ।
नका वाच्यता करूं कोठेंही गोष्ट येवढी तरी करा ! ॥ १० ॥

---

३८६१

( ३ )

ऐका तिसरा फार्स मजेचा हसाल मुरकुंडी वळता ।
पहा कशी ही आजकालची उतूं चालली विद्वत्ता ॥ १ ॥
मी सव्वाशें मुली पाहिल्या एकहि नाहीं पासें मला ।
वदे प्रौढिनें बाळासाहेब वाटे कौतुक बापाला ॥ २ ॥
सांगुन आली यमुना दुहिता नानासाहेब काळयांची ।
बाळासाहेबानें नंतर केलि परिक्षा यमुनेची ॥ ३ ॥
यमुनाताई पसंत पडली देणें घेणेंही ठरलें ।
बाळासाहेब खुशींत होते, भवीतव्यता त्या न कळे ॥ ४ ॥
यमूताईनें नवऱ्या मुलाला पत्र धाडिलें झणझणित ।
बाळासाहेब विरमुन गेले जैसें ढेकुळ पाण्यांत ॥ ५ ॥
शे सव्वाशें मुलीमध्यें कां एकहि नाहीं पसंतिला ।
मी ही सुंदर तुम्हा वाटलें कारण हुंडयाला भुलला ॥ ६ ॥
क्षणांत एका तुम्ही परीक्षा केली माझी ज्या वेळीं ।
बारकाइनें मीही केली तुमचि परिक्षा त्या वेळीं ! ॥ ७ ॥
वैषिक तुमचें स्वार्थांधाचें प्रेम दिसोनी मज आलें ।
वैवाहिक सुख तुमच्या येथें लाभणार हो मज कसलें ॥ ८ ॥
ह्या पत्रानें स्पष्ट कळवितें पसंत नाहीं तुम्ही मला ।
धिःकार असो ह्या सुशिक्षितांच्या स्वार्थपणाच्या सीमेला ॥ ९ ॥
वाहवा वाहवा बहार झाली यमूताइची शाबास ! ।
घडणार ह्यापुढें लग्नविधींचा क्रांतीकारक इतिहास ! ॥ १० ॥

---

( ४ )

बडया घराचा पोकळ वासा बोल सार्थ हे खरोखर ।
मूळ नदीचें कूळ ऋषींचें काय दृष्टिला पडणार ॥ १ ॥

एक नुर अदमी दसनुर कपडा जनता भपक्यावरी भुले ।
झुकानेवाला मात्र पाहिजे तशीच दुनिया डुले झुले ॥ २ ॥
वाळी जाऊन भोंक राहिलें अशी आजची श्रीमंती ।
दौलत सरली उसनें वैभव टिकावयाला धडपडती ॥ ३ ॥
असेच होते तोडके मोडके तात्यासाहेब सरदार ।
कर्जाचा बुजबुजाट मागें शक्य जें न कधि फिटणार ॥ ४ ॥
त्यांचे होते वडिल चिरंजीव योग्य जाहले लग्नाला ।
बेताबाताचें जरि शिक्षण किंमत मोठया नांवाला ॥ ५ ॥
अंदरकी ती बात कुणाला ठाऊक आहे कर्ज किती ।
कितिक मुलींचे बाप येउनी वरच्या भपक्यावर फसती ॥ ६ ॥
कल्याण मुलीचें होइल जाणुन विचार केला माटयांनीं ।
खर्च वाढला तरी सोयरिक टाकावी ही जुळवोनी ॥ ७ ॥
यादी झाली खर्च करावा पांच हजारांपर्यंत ।
प्रकार पुढला ऐका, जेव्हां घडलें पूजन सीमांत ॥ ८ ॥
देणें रुपये हजार बारा एका दादू वाण्याचे ।
हीच वेळ त्या मागायाला दैव लंगडे तात्यांचें ॥ ९ ॥
काळे ठिक्कर पडले तात्या पाहुनि दादू वाण्याला ।
भरमसाट तो बोलुं लागला पार न राहे फजितीला ! ॥ १० ॥
कांहीं नाहीं ऐकत तुमचे पैसे द्या ह्या घटकेला ।
मिजास कसली, असे निघाला तुमचा वाडा विकण्याला ॥ ११ ॥
'धाडधप्प' हा अवाज कसला ऐकूं आला गर्दींत ।
चिरंजिवांनीं उडी घेतली मागिल दारीं विहिरींत ! ॥ १२ ॥
लग्न कशाचें काय कशाचें एकचि झाला आकांत ।
नवऱ्यामुलानें जीव दिला हो विघ्न ओढलें लग्नांत ! ॥ १३ ॥
काय पाहिजे कुणा सांगण्या ह्याच्या पुढला वृत्तांत ।

समाज मंदिर इमारतीचा पाया झाला डळमळित ॥ १४ ॥
कवि रामाचा थाट शाहिरी स्फूर्तितडाखा खंबीर ।
यथायोग्य जें तेंच वदाया कधीं न घेतो माघार ! ॥ १५ ॥

---

## ( ५ )

( चालः—फटका. )

सैतानशाही सर्कशींतली नवऱ्यामुलांची करामत ।
पहा कशी ही इराणी घोडी खेळामध्यें पटाइत ! ॥ ध्रु० ॥
निषेध हुंडा सभा भरविल्या एकोणिसशे पंधरांत ।
वैद्यबुवांनीं होति घेतली विरुद्ध हुंडयाच्या शपथ ॥ १ ॥
भाऊ वैद्यावर हा जेव्हां प्रसंग लग्नाचा आला ।
सांगु लागला उलटया गोष्टी दिलें झुगारून शपथेला ! ॥ २ ॥
पाहुन उंदरा जशी मावळे दयार्द्र वृत्ती बोक्याची ।
तोंच मासला वैद्यबुवांचा कमान चढती हुंडयाची ॥ ३ ॥
भलते भलते करशिल चाळे देइन तुजला हाकलुन ।
हें वडिलांचे शब्द ऐकुनी भाऊ गेला गांगरून ! ॥ ४ ॥
चट्टदिशीं तो कबूल झाला लिलाव करुनी घ्यायाला ।
देशभक्तिच्या सुधारणेच्या वाता गेल्या विलयाला ॥ ५ ॥
हुंडयाचा प्रतिकार कराया चंग बांधिती जे तरुण ।
स्वार्थाला हे चटावलेले गेले शपथा विसरून ॥ ६ ॥
सामाजिक घ्या राजकीय ही असो कोणती चळवळ ।
अभाव कृतिचा, नयें अंतरीं कर्तव्याची तळमळ ॥ ७ ॥

---

( ६ )

( चालः--चंद्रकान्तराजाची कन्या. )

बेळगांवचे भाऊसाहेब देव सावकार ।
फ्याशनवाले त्यांचे होते चिरंजीव थोर ॥ १ ॥
केळकरांची उपवर दुहिता नांव तिचें विमला ।
मित्रासंगे सावकारसुत गेले बघण्याला ॥ २ ॥
पहाणें झाल्यानंतर विमला बोले आईला ।
नकोग देऊं इथें मला तूं ऐक विनंतीला ॥ ३ ॥
निस्तेज पाढरा काटकुळा हा चष्मा डोळ्याला ।
असा नोवरा मला नावडे मिशा काढलेला ॥ ४ ॥
स्पष्ट अगोदर बजावते मी कळीव बाबांना ।
नाहीं मुलीला पसंत मुलगा सांगा देवांना ॥ ५ ॥
विमलेसम ह्या जेव्हां दुहिता तयार होतील ।
तेव्हांच मुलांची नवरेपणाची धुंदी उतरेल ॥ ६ ॥

---

( ७ )

विसूभाऊंची सुशील कन्या नांव तिचें सुशिला ।
केशव जोशी नियोजीत वर तिजसाठीं केला ॥ १ ॥
घरांत माझ्या नसे चहाचें कोणाला व्यसन ।
हें व्रत पालन करावयाचें आहे आजन्म ! ॥ २ ॥
लग्नामध्यें चहा कुणाला नाहीं मिळणार ।
आधिं सांगतों नये करावी मागुन तक्रार ॥ ३ ॥
विसूभाऊंचा रोख ठोक हा सवाल व्याह्यांना ।
तीच करावी सोयरीक जी हितकर दोघांना ॥ ४ ॥

देणें घेणें सौदा ठरुनी तिथिनिश्चय झाला ।
मंगलाक्षदा पडुनि मिळाली केशवास सुशिला ॥ ५ ॥
लग्न लागतां जांवईबोवा हट्ट धरुन बसले ।
ह्या वेळेला चहा पाहिजे डोकें कलकललें ॥ ६ ॥
होतां होतां निकरावरती गेली ही गोष्ट ।
चहा न देऊं ! विसूभाऊनी बजाविलें स्पष्ट ॥ ७ ॥
लग्न मोडलें तरी न हरकत चहा नाहीं म्हणुनी ।
दुराग्रहानें जांवई बसले चहासाठीं अडुनी ॥ ८ ॥
त्यांनीं शेवट हाटेलांतुनी चहा आणवीला ।
मध्यस्ताची खरी कुशलता प्रत्यय हा आला ॥ ९ ॥
पारावार न राहे मग त्या छीः थूः फजितीला ।
जो तो बोले उपहासानें केशवरावाला । १० ॥
प्रयोजनाचे दिवशीं नाहीं जेवाया आले ।
खुनशीपणानें सुशिलेलाही नाहीं पाठविलें ॥ ११ ॥
विसुभाऊचा निश्चय पक्का रतिभर ना ढळला ।
वरपक्षाच्या अेरराविचा इंगा जिरवीला ! ॥ १२ ॥

---

## ( ८ )

दाहि दिशा का तुम्हां मोकळ्या तुम्ही पुरुष म्हणुनी ।
मूक कुमारी किती नाडल्या पुरुषांच्या कृतिनीं ॥ १ ॥
पसंत केली तुम्ही मला पण मी न तुम्हा करिते ।
स्वच्छ सांगतें, बरें कोणतें माझें मज कळतें ॥ २ ॥
वाटेल तैशी तुम्ही परीक्षा घ्यावी जर अमुची ।
का न आम्ही मग उलट परीक्षा घ्यावी हो तुमची ? ॥ ३ ॥

सांगा उत्तर स्पष्ट मला द्या काय तुम्हां येतें ।
अंगामध्यें धमक आहे कां दुरित वारण्यातें ॥ ४ ॥
प्रसंग आला उद्यां पत्निचें रक्षण करण्याचा ।
कसा काय मग कराल सांगा नायनाट रिपुचा ॥ ५ ॥
हें कमलेचें स्पष्ट बोलणें श्रीधरपंताला ।
मूग गिळोनी स्वस्थ बैसला खजिल मनीं झाला ॥ ६ ॥

---

## ( ९ )

( चाल—फटका )

प्रश्न वधूला नवरदेव करि जाणे आहे जर्मनीला ।
वाटेमाजी किती बंदरें लागतील हें सांग मला ॥ १ ॥
दिधलें उत्तर पूर्ण बरोबर नवरोजींना जिरविले ।
नंतर वधुचा प्रश्न ऐकुनी नवरदेव मग गडबडले ॥ २ ॥
उद्या मुलाची मुंज निघाली पान दीडशें होणार ।
सांगा तुम्ही श्रीखंडाला दूध किती तें घेणार ॥ ३ ॥
किती पायली तांदूळ घ्यावें डाळ घ्याल किती वरणाला ।
गूळ साखर तूप गव्हाचें 'इस्टिमेट' द्या तुम्ही मला ॥ ४ ॥
" प्रश्न चुकीचा स्वयंपाकाची काय माहिती पुरुषांना ? ।"
" काय माहिती भूगोलाची असते सांगा ललनांना ? ॥ ५ ॥
वधूपरीक्षा करावयाची तऱ्हा निघाली जशी नवी ।
तशी स्त्रियांनीं का न परीक्षा सांगा पुरुषांची घ्यावी ? ॥ ६ ॥
झाले निरुत्तर नवरदेव मग उत्तर देतां येईना ।
आतां यापुढें जपुन वागणें प्राप्त जाहलें पुरुषांना ! ॥ ७ ॥

---

## ( १० )

जशी हवी ती फिरवाफिरवी करूं आम्ही ती कुंडलिंत ।
तुमची मुलगी पसंत करणें आहे आमुच्या हातांत ॥ १ ॥
जुळेल बाकी तुम्ही अगोदर हुंडा ठरवा पहिल्यांदा ।
रुसवाफुसवा करणी ठरवा बोलुन चालुन हा सौदा ॥ २ ॥
खर्च लागला किती मुलाला डॉक्टर होईपर्यंत ।
हुंडा म्हणुनी तितुकी टाका रक्कम अमुच्या पदरांत ॥ ३ ॥
शिवाय लागेल खर्च करावा आणिक तितुका अवांतर ।
बोला इतुकी असेल ऐपत, सोयरीक तरि जुळणार ॥ ४ ॥
हे नेन्यांचे बोल ऐकुनी दिधलें उत्तर जोशांनीं ।
पुरुषार्थाचा खून पाडितां कृती करोनी सैतानी ! ॥ ५ ॥
सर्व बाजुचें देउनि शिक्षण सोळा वरुषें वाढविली ।
चोळी बांगडी परकर लुगडीं काय मुलीला तुम्हीं दिली ? ॥ ६ ॥
खर्च मुलाचा असे त्यामधें खर्च मुलीचा वजा करा ।
मान मुलाचे तसे मुलीचे असति हें तुम्ही नच विसरा ॥ ७ ॥
फक्त मुलाचे मान तेवढे दिसती तुमच्या डोळ्याला ।
ब्रीद ठरोनी गेलें तुमचें लुटणें मुलिच्या बापाला ॥ ८ ॥
मुलगा किंवा मुलगी होणें गोष्ट कुणाच्या हातांतिल ।
खावा लागेल उलटा थुंका आम्हावर जर थुंकाल ! ॥ ९ ॥
तुम्ही मुलाची विक्रि मांडिली लाज कोळुनी प्यालात ।
मर्दपणाला तुम्ही विसरला भरा कंकणें हातांत ॥ १० ॥

## ( ११ )

रत्नागिरिला मामलतदारी गुंडोपंतांना होती ।
वडिलार्जित घर संभाळाया पुण्यांत बंधूंची वस्ती ॥ १ ॥
मुलास त्यांच्या होति चाकरी रेलवे जी. आय. पी. वरती ।
महिना भरल्या नंतर चाळिस रुपये दृष्टीला पडती ॥ २ ॥
गुंडोजींना घमेंड मोठी मी आहे मामलेदार ।
लग्न मुलाचें करावयाला पुण्यास आले रजेवर ॥ ३ ॥
असतो गरजू बाप मुलीचा म्हणुन मुलांना भाव चढे ।
असेच गरजू बंडो गेलो गुंडोजीच्या घराकडे ॥ ४ ॥
गुंडोजीचा सवाल एकचि घेइन हुंडा पंधराशें ।
बाप मामलेदार मुलाचा काय विसरला तुम्ही कसे ॥ ५ ॥
तुम्हीच मुलगी इकडे आणा दाखविण्याला आम्हास ।
इथेच पाहूं आम्हा न द्यावा तिथवर येण्याचा त्रास ॥ ६ ॥
गुंडोजींच्या सर्व मागण्या कबूल केल्या बंडोनीं ।
तेवढयावरती तृप्त न होतां फासे उडविडा गुंडोनीं ॥ ७ ॥
लग्न लागलें जांवईबोवा बोहल्यावरती येईना ।
रुसून बसले रुसवा काढा निरोप गेला बंडोना ॥ ८ ॥
तुमचे तु ही पाहुनी घ्यावें नका विचारू तुम्ही मला ।
गुंडोजींनीं मुग्धपणानें विचार आपुला कळवीला ॥ ९ ॥
रुसन्यापायीं रुपये चारशें देणें जांवई बोवाला ।
विचार पडला बंडोबाना प्रसंग दारुण ओढवला ॥ १० ॥
काय करावें तया सुचेना पैसे कोठुन आणावे ।
बंडोबांची वदली कान्ता माझे दागीने घ्यावे ॥ ११ ॥
नका आणुं हो पाणी नयना वेळ निभावुन ही न्यावी ।
सर्व दागिने तुम्हीच माझे ! गोष्ट येवढी ऐकावी ॥ १२ ॥

रोख 'शिल्लक डाग विकोनी' पैसे देतों तुम्हाला ।
बदले गुंडो पैशा ऐवजी डाग चालतिल आम्हाला ! ॥ १३ ॥
शोचनीय ही हृदयद्रावक करुण काहणी जी घडली ।
ह्याला कारण समाजांतली सात्विक बुद्धि मावळली ॥ १४ ॥
या गुंडोसम नीच वृत्तिचे समाजघातक सैतान ।
अशांपासुनी दूर रहावें विटाळ होइल जाणून ॥ १५ ॥
कवि रामाची शाहिरि समशेर तयार आहे पाजळुन ।
करील शासन जे जे कोणी समाजघातक सैतान ॥ १६॥

---

## ( १२ )

कुणीकडोनी तरी मुलीचें लग्न एकदा उरकावें ।
असो कसाही नवरा मुलगा खुशाल मुलिला वैरावे ॥ १ ॥
परिस्थितीनें वेळ अशी ही आलि मुलीच्या वांट्याला ।
नवऱ्या मुलांची सैतान्शाही जाइल कधि ही विलयाला ॥ २ ॥
जसा नोवरा घाल पाहूनी तयां वागणें भाग तसे ।
जणू धन्याच्या चैनीखातर बकरीचा वध होत असे ॥ ३ ॥
हृदयद्रावक प्रसंग ऐका नुक्ता घडला मिरजेला ।
ऐका गंमत मारूनमुटकुन वैद्यबुवा जो बनलेला ॥ ४ ॥
राव सदाशिव गुंडोशास्त्री बावन वर्षांचा थेरडा ।
अद्यापी हा कुमार अमुचा मिरवूं पाहे वरघोडा ॥ ५ ॥
अट्टल गांजेकस हा होता प्रसिद्ध सगळ्या मिरजेंत ।
मात्र अलिकडे संग्रह केला तोडक्या मोडक्या वैद्यकिंत ॥ ६ ॥
पळोनि आली पुण्यास स्वारी लग्न करोनी घ्यायाला ।

मित्र भेटतां ह्मणे तयांना आहे जाणें नाशकाला ॥ ७ ॥
गुप्त वातमी त्यानें ठेविली लग्न करोनी घ्यायाची ।
एजन्टांना खुराक द्याया थैलि सोडिली पैशाची ॥ ८ ॥
मध्यस्थांनीं बोलबोलतां गळास मासा अडकाविला ।
गरीव बाबा दिक्षित त्याला भपक्यावरती झुलवीला ॥ ९ ॥
बाबा दिक्षित तयार झाला कन्या सोनू द्यायाला ।
सुवर्णमात्रा लागू पडतां आनंद झाला थेरड्याला ॥ १० ॥
अवळा सोनू नवरी मुलगी तेरा वरुषाची होती ।
अखेर पडलें सुंदर माणिक थेरड्या माकडाच्या हातीं ॥ ११ ॥
सोनुताइला काय वाटलें असेल लग्नाचे वेळीं ।
संसारसुखाला आग लागली कर्मभोग घे तिचा वळी ॥ १२ ॥
उद्या नोवरी तयार लग्ना पन्नास वरुषाची वाला ।
चौदा वरुषाचा पति तिजला, पत्करील कां वद मला ॥ १३ ॥
रोख ठोक हा सवाल माझा आजकालच्या तरुणांना ।
ईश्वरनिर्मित हृदय तुम्हाला तसें स्त्रियांना आहेना ? ॥ १४ ॥
तरुण बंधुहो घमेंड सोडून वेळिंच जर ना उमजाल ।
कुमारिकांचे शाप तुम्हाला भोंवल्याविण कां रहातील ॥ १५ ॥
आज उद्या ना येईल उदया कुमारिकांचा एक दिन ।
क्षमस्व म्हणुनी शरण जाल त्या चुंबित दातीं तृण धरून ॥ १६ ॥
तुमच्यासम जर उद्या स्त्रिया ह्या स्वैरवृत्तिनें वागतिल ।
कसें काय मग तुम्हास सांगा त्यांचें करणें आवडेल ॥ १७ ॥
जशी तुम्हाला तशी स्त्रियांना निसर्गनिर्मित स्वतंत्रता ।
काय म्हणोनी तुम्ही तयांच्या स्वतंत्रतेला तुडवीतां ॥ १८ ॥
स्त्रीपुरुषांचा समान दर्जा हक्क सारखे दोघांचे ।
संसार रथाला चालविण्याला प्रयत्न निष्फळ एकाचे ॥ १९ ॥

संसाररथाचीं दोन बाजुचीं चाकें मजबुत असतील ।
काय उणें मग जीवितयात्रा प्रवास सुखकर होईल ॥ २० ॥
कवि रामाचा थाट शाहिरी भिणार नाहीं रूढीला ।
का न तडाखे लगावील तो समाज बहकून जर गेला ॥ २१ ॥

---

# हा हुंडाच हुंडा

( चाल— मला मुंबईला जायचय. )

हा हुंडाच हुंडा चार हजारांचा घेणार ।
लग्न खर्चे काढणार ॥ ध्रु० ॥
एमे. बिएस. झालों । डिग्री घेऊन बसलों ।
अर्ज खरडुं लागलों । आतां मोठी नोकरी मज मिळणार ॥ १ ॥
जवळ नाहीं दीडकी । नाहीं शेतवाडी ।
नाहीं व्यापार तागडी ।' नाहीं इस्टेट माझें घरदार ॥ २ ॥
माझी कांती काळी । तनु काठी मोळी ।
चष्मा सदा डोळीं । माझें मिच वर्णन काय सांगणार ॥ ३ ॥
पाहिल्या दिडशें मुली । पास नाहीं झाली ।
व्युर्नी पॅरिसवाली । असेल तिच्याशीं लग्न मी करणार ॥ ४ ॥
नाकीं डोळीं चांगली । वय सोळाचे पुढली ।
नव्या फॅशनवाली । तिच्यासवें मी टेनिस खेळणार ॥ ५ ॥
पेटी वाजवी सुंदर । जिचा आवाज मधुर ।
बोलण्यामध्यें चतुर । व्याख्यान देणारी बायको मी पहाणार ॥ ६ ॥
माझ्यासारखा जांवई । ज्याची भली पुण्याई ।
त्याच्या वांट्यास येई । परि मोल त्यास जबर पडणार ॥ ७ ॥

नामदेव मेळा १९२५.

# वरकांति दिखाऊ चळवळ

( चालः—राष्ट्रहितास्तव भगवी कफनी.. )

वरकांति दिखाऊ चळवळ तोंवर फलप्राप्ति नाहीं ॥ धृ० ॥
अंतःकरणीं देशभक्तिची नसे पेटली ज्योत ।
पारतंत्र्य नर्कांत पडावें खिचपत अंधारांत ॥ १ ॥
पाटिलकी मुखानें करावयाची संवय नाहिं गेली ।
कृती होईना स्वार्थ सुटेना, स्वराज्य आशा मेली ॥ २ ॥
स्वबांधवांच्या पाय उरावर, स्वार्थ साधण्याला ।
आत्मघातकीं बुद्धि मत्सरी रसातळा जायाला ॥ ३ ॥
चोहों बाजुनीं देश पेटला जुलुम प्रखर ज्वाला ।
अंतकाल ये तरी भांडतां, पार न दुर्दैवाला ॥ ४ ॥
बोल एक परि कृती निराळी वागणूक तुमची ।
तोंवर आशा नष्ट जाहली स्वराज्यउदयाची ॥ ५ ॥
घरांत भांडा परंतु परका घुसूं पाहतो जेव्हां ।
सांभाळ कराया साह्यकारि ही एक जूट तेव्हां ॥ ६ ॥
ज्याला जें जें येइल करितां तेंचि कार्य करणें ।
ध्यानिं असो द्या देशासाठीं जगणें किंवा मरणें ॥ ७ ॥
ज्या भूमीच्या अन्नरसाचा पिंड देह बनला ।
तिच्याचसाठीं देह तिचा तिज खर्च पाहिजे केला ॥ ८ ॥
कुणी कोणच्या असा मताचें किंवा जातीचे ।
स्वराज्य–पंढरि इथें कुणाला भय न विटाळाचें ॥ ९ ॥

राष्ट्रहितैषी मेळा.

---

# फाजिल डौल किती

( चालः-- हा नारायण अडला. )

फाजिल डौल किती । तरुण हे । पोकळ बडबडती ॥ धृ० ॥
देशसेवेच्या गप्पा ठोकिती जोंवर कॉलेजांत ।
शिक्षण सरतां *वाय्. एम्. ओ. एस्चा बसती अर्ज करीत ॥१॥
लग्न करीना देशहितास्तव ब्रह्मचारी रहाणार ।
सांगा नवनित अग्निस्पर्शे घट्ट किती टिकणार ॥ २ ॥
हुंडाशाही प्रस्थ माजलें याला कारण तरुण ।
निषेध हुंडा सभा तयांच्या आत्मप्रौढिची खाण ॥ ३ ॥
लंब्या लंब्या बाता झोकी व्याख्यानाचे वेळीं ।
हुंडयावांचुनि लग्न कराया करिती टाळाटाळी ॥ ४ ॥
स्त्रीनिंदा करण्यांत पटाईत यांची जिव्हा स्वैर ।
झुंजार पहा हे बायकांतले थुः त्यांच्यावर ॥ ५ ॥
यांच्या सदनीं तोंडपाटिलकी नेहमी पाणी भरतें ।
प्रसंग येतां या बेटयांची दांतखिळी मग बसते ॥ ६ ॥
उगाच नसते विषय काढुनि कुटाळक्या हे करिती ।
बापजाद्यांच्या नांवावरति अज्ञ जना झुलविती ॥ ७ ॥
असें करा तुम्हीं तसें करूं नका प्रत्येक सांगतो लोका ।
स्वतः मात्र त्या कांहीं न करवे धुरिण कसे अवलोका ! ॥ ८ ॥

राष्ट्रहितैषी मेळा.

---

*युअर्स मोस्ट ओबिडियन्ट सर्व्हंट.

# विलायती वाटाणा !

( १ )

आय्. सी. जे होऊन येती पिऊन पाणी विलायती ।
ऐका आतां तुम्हां सांगतो त्यांच्या लग्नाच्या गमती ॥ धृ० ॥
आय. सी. एस्. ची नव्हती किंमत एकोणिसशे तीनांत ।
त्या वेळेला अवघी किंमत तीन हजारापर्यंत ॥ १ ॥
आज तयाची चक्रवाढिनें साठ हजारापर्यंत ।
नकळे कुठवर जाइल किंमत लाखालाही तुडवीत ! ॥ २ ॥
पैसा म्हणजे जशी काय हो ह्यांच्या परसांतील भाजी ।
लूट मांडिली खूट न कधि त्या, स्वतःस म्हणवीती गाजी ॥ ३ ॥
विलायतेची हवा निराळी पाणि निराळे तेथील ।
त्या सम नखरा करू पाहती तरूण उल्लू येथील ॥ ४ ॥
अशी पाहिजे वधू आम्हाला पोझीशनला साजेशी ।
रोमान्स् पाहिजे तसा परीचय नव्या इंग्रजी फ्याशन्शी ॥ ५ ॥
स्वरूप उत्तम असे पाहिजे हजारांत ती एक खरी ! ।
वंद्य पाहिजे आमुची आज्ञा उल्लंघन जी कधि न करीं ॥ ६ ॥
विलायतेला जाऊन आलों खर्च जाहला अनिवार ।
हुंडया वाचुन कसा आमुचा खर्च भरोनी निघणार ? ॥ ७ ॥
विलायतेतिल छचोर चाळे घेऊन येती बरोबर ।
देश भक्तिच्या लंब्या बाता दिव्याखाली तो अंधार ॥ ८ ॥
व्यर्थ जाउनी विलायतेला देशाला हे बुडवीती ।
ह्याच्या पौरुषाची किंमत लिलाव लग्नांचे करिती ॥ ९ ॥
हजार पंधरा पासून करिती नानासाहेब सुरवात ।
बोल बोलता लिलाव चढला वीस हजारापर्यंत ॥ १० ॥
तीनवार हा लिलाव झाला बंद ह्या पुढें होणार ।

मुंबईवाला वदे शेटजी बंद कोण तुम्ही करणार ॥ ११ ॥
दुहितेसाठीं नवरदेव हा विकत हाच मी घेणार ।
हजार पंचत्रिस जरि ह्या पडले तरीही ते मी देणार ! ॥ १२ ॥
ह्यावर कोणी नाहीं बोलत लिलाव आतां पुरा करा ।
ठरला सौदा लग्न कराया माघ मास हा असे बरा ॥ १३ ॥
हजार पस्तिस देणेंवाला नंतर भेटे नानांना ।
त्यांच्या तोंडा पाणी सुटले कांहीं करितां येईना ॥ १४ ॥
चारच दिवसाखालीं कांहों नाहीं कां तुम्हि आलात ।
मात्र लागलीं चुटपुट आतां उपाय नाहीं हातांत ॥ १५ ॥
प्रश्न मुलीचा प्रश्न कुलाचा नव्हता मोठा महत्त्वाचा ।
संबंध सुखावह जास्तीत जास्ती हुंडा देणेवाल्याचा ॥ १६ ॥
वाहवा वाहवा बहोत खाशी प्रलाप ऐका नानांचे ।
आय. सी. एस्‌चे कां हें शिक्षण द्यावे सोडून ढुंगाचे ॥ १७ ॥
विचार नाहीं माणुसकीचा काय बोलणें बोलावें ।
नसे शेंपटी म्हणून कांहीं मनुष्य ह्यांना समजावें ? ॥ १८ ॥

---

## ( २ )

ऐका दुसरी सार्थ हकीगत भाऊसाहेब देवांची ।
मी आय. सी. एस्. ठेवूं कशाला पर्वा मुलिच्या बापाची ॥ १ ॥
असेल ज्याला जरूर त्यानें खेपा घालाव्या सदनीं ।
व्यर्थ कशाला शीण आम्हाला येऊन द्यावा गरिबांनी ॥ २ ॥
हजार पंधरा देती हुंडा तात्यासाहेब व्यापारी ।
होकार तयांना मिळे परंतु गोष्ट चुके ना होणारी ॥ ३ ॥
लग्न तयारी करावयाला तात्या गेले मुंबईला ।
परंतु त्यांच्या दुर्दैवानें सारा घोंटाळा केला ॥ ४ ॥

संस्थानिक ते अप्पासाहेब त्यांची दुहिता लग्नाची ।
खटपट चालू केली त्यांनीं भाऊरावा देण्याची ॥ ५ ॥
हजार पन्नासाचा आकडा हुंडा रक्कम मिळणार ।
सहवास बड्यांचा संस्थानाशीं सोयरिक संबंध घडणार ॥ ६ ॥
ऐसें पाहून लगेंच त्यांनीं पत्र धाडिलें मुंबईला ।
तुमची मुलगी नाजुक आहे पसंत नाहीं आम्हाला ॥ ७ ॥
दूधामध्यें खडा मिठाचा तद्वत स्थिति हो तात्यांची ।
पहिले पाढे पढे पंचावन चिंता मुलीच्या लग्नाची ॥ ८ ॥
नंतर त्यानीं पत्र धाडिले भाऊसाहेब देवांना ।
मुलगी नाजुक परंतु सांगा हुंडा नाजुक नाहींना ॥ ९ ॥
आय. सी. एस्ची घमेंड तुमची क्षणांत एका जिरवीन ।
कोर्टामध्यें फसवेगिरीचा जाब तुम्हांला विचारिन ॥ १० ॥
तुम्ही सोडिली परंतु आम्हा आहे अब्रूची चाड ।
सुधारणेची नकोच आशा जोंवर तुमच्या समपुंड ॥ ११ ॥

---

## ( ३ )

ऐका आतां तिसरी वार्ता अमुच्या बंडोपंतांची ।
हजार पंचविस अशी तयांच्या गळ्यांत चिठ्ठी हुंडयाची ॥ १ ॥
अशी तयारी असेल ज्यांची त्यांनिच यावे सदनाला ।
ऐपत नसता उगाच येऊन त्रास न द्यावा आम्हाला ॥ २ ॥
असें बोलतां धन्य वाटली बंडोबांच्या आईला ।
वरचा पोहरा खाली जातो तत्व कळेना बिचारिला ॥ ३ ॥
एक भेटला गरजू व्याही हांजी हांजी करणारा ।
काय तयाला ठाऊक पुढती होईल सारा बोजवारा ॥ ४॥
लग्नामध्यें शक्य तेवढा सूड उगविला व्याह्यांचा ।

कीस काढिला नाहि ठेविला केंस एकही डोकीचा ॥ ५ ॥
दुर्दैवाचा फेरा उलटा वर्ष न झाले हो लग्ना ।
शेवट झाली कफक्षयानें बंडोबांना देवाज्ञा ॥ ६ ॥
शिमगा गेला कवित्व राहे तैशी स्थिति हो आईची ।
झाले गेले परंतु तीच्या बुजे न आठवण बोलाची ! ॥ ७ ॥

---

## ( ४ )

भगिनी बंधुंहो आतां चौथे रहस्य हुंडा ऐकावे ।
तुम्हीच ठरवा कसे काय ते पशू वृत्तिला आवरावे ॥ १ ॥
रहिवाशि पुण्यांतील प्रसिद्ध मोठे अण्णासाहेब सरदार ।
त्यांची कन्या कमला बाला झाली लग्ना उपवर ॥ २ ॥
स्थळें पाहुनी दमले थकले उपाय कांहीं चालेना ।
आय. सी. एस्‌चा मोह परंतु कांहीं केल्या आवरेना ॥ ३ ॥
आय. सी. एस्‌चा नवरा मुलगा प्रयास पडती मिळण्याला ।
कारण जो तो भुलतो त्याच्या विलायतेंतील भपक्याला ॥ ४ ॥
अण्णासाहेबांनीं नंतर इनामदारी हक्काला ।
गहाण टाकून लग्नासाठीं त्यांनीं पैसा जमवीला ॥ ५ ॥
एकुलत्या एक मुलीचे लग्न करावे थाटानें ।
म्हणून त्यांची सर्व बाजुनें चाले तयारी हौसेनें ॥ ६ ॥
अखेर धुंडता आय. सी. एस्‌चा नवरदेव त्या सांपडला ।
बाळासाहेब विकत घेतला हजार चाळिस रुपयाला ॥ ७ ॥
सरदारांचा लग्न खर्च तो पाउण लाखावर गेला ।
तरीही भांडणतंटा शेवट जांवई बोवांनीं केला ॥ ८ ॥
असो ह्या पुढें काय सांगणें फाजिल शहाणे सुशिक्षित ।
पैशासाठीं श्वानासम हे बसती गोंडा हालवित ॥ ९ ॥

तुम्ही जांवया किती दिले तरि कधी न तृप्ती होणार ।
द्या द्या आणखी हें रडगाणें गात सदा ते बसणार ! ॥ १० ॥
कवि रामाची स्फुर्तिदेवता सदैव जागृत राहील ।
समाजांतलीं भीषण कृत्यें पायाखाली तुडवील ! ॥ ११ ॥

---

## दारुचें व्यसन अनिवार.

[चाल--सूर्याजीराव सरदार.]

दारुचें व्यसन अनिवार । कधीं सुटणार ॥ धृ० ॥
तानाजी बाजी एसाजी ।
रणशूर मराठे गाजी ।
तुम्ही त्यांचे वंशज आजी ।
व्यसनांत गुंग होणार कां, परधर्मी बनणार ॥ १ ॥
श्रीमंत पूर्वींचे तुम्ही ।
निर्व्यसनी पूर्वींचे तुम्ही ।
अजी अन्न खावया नाहीं ।
ही दारु द्रव्य नेणार, मग तिथें काय तुम्हा उरणार ॥ २ ॥
दो पैसे मिळवायाला ।
शहरांत तुम्ही जे आला ।
मग दारुबाज कां बनला ।
तुम्ही कर्ज उलट करणार, दारुचें व्यसन घरां नेणार ! ॥ ३ ॥
धर्माची प्रौढी गातां ।
हातांत पताका धरितां ।
पांडुरंग तुकया भजतां ।
भजनाचि टाळ कुटणार, आणि दारुचें शेण खाणार ! ॥ ४ ॥
तुम्ही अभंग ज्यांचे म्हटले ।

ते दारु कधीं नच प्याले ।
तुम्ही आतां झोंकिता पेले ।
ही दारु करिल अपकार, तुम्ही निर्व्यसनि कधीं होणार ? ॥५॥
न्याहरीस भाकरी दोन ।
जो करी फस्त खाऊन ।
तो खरा मराठा जाण ।
अभिमान कधीं धरणार, मराठा दारुस ना शिवणार ॥ ६ ॥
उपदेश ज्ञानदेवाचा ।
उपदेश बाळ टिळकाचा ।
ही दारू सोडायाचा ।
सन्मार्ग कधीं धरणार, कां दारुतची सदा मरणार ॥ ७ ॥
जी मिळेल रोजंदारी ।
दारूंत उडवितां सारी ।
मग होत कर्जबाजारी ।
घरिं द्रव्य काय नेणार, तुम्ही संसार कसा करणार ॥ ८ ॥
धरुं नका दारुचा संग ।
भजनांत सदा व्हा दंग ।
भजनास कधीं नच भंग ।
तुकयाची वाणी वदणार, कधीं नच खोटी ती होणार ॥ ९ ॥
घ्या शपथ आईबापांची ।
घ्या शपथ संत तुकयाची ।
घ्या शपथ पांडुरंगाची ।
कधीं नाहीं दारू पीणार, आम्ही हो पांडुरंग भजणार ॥ १० ॥

गोपाळ गायनसमाज मेळा १९२४.

# ह्या पुरे करा बाता

( चालः—रणशूर मावळ्यांनो ).

यंत्र करुं आम्हि, त्यंत्र आम्हीं करूं ह्या पुरे करा गप्पा ॥ धृ० ॥
कर्तव्याचें शिंग वाजलें चला उठा भाई ।
काकुळतीनें, निर्वाणीनें हाक मारिते आई ॥ १ ॥
हंस बैसले करित वंचना काकापाशीं आज ।
घटकोघटकीं परिस्थितीची पडे दृष्टिला मौज ॥ २ ॥
समरभूमिवर असें लागतें वाण सतीचें घ्यावें ।
देशभक्त ही पदवि न फुकटी, घांव टाकिचे खावे ॥ ३ ॥
उठा बंधुहो वेळ मंगला चला स्वागताला ।
सह्याद्रीवर स्वातंत्र्याचा अरुणोदय झाला ॥ ४ ॥
मुळशींचें रणकुंड पेटलें युद्ध शांततेचे ।
वीर मराठे करा कृतीनें सार्थ नांव तुमचें ॥ ५ ॥
ऐका ऐका 'काळ्या' आईची शेवटली हांक ।
न ये धावूनि संकटीं ऐसा कोण करंटा लेक ॥ ६ ॥
चला बंधुनो करा तयारी जाणे मुळशीला ।
आज आपुली तिथें टांगली अब्रू वेशीला ॥ ७ ॥
संग्रामाची पहिली सलामी मुळशीं पेटयांत ।
सत्यापाठीं **श्री योगेश्वर** हें ठेवा लक्षांत ॥ ८ ॥

सार्वजनिक मुळशी सत्याग्रह मेळा.

---

# नराचा नारायण होतो

चाल—( चलारे गणराया वंदा. )

नराचा, नारायण होतो ।
स्वर्गसुखाचा साम्राज्याचा बादशहा बनतो ॥ धृ० ॥
काल हा, गात सदा फिरतो ।
वदे मानवा माझा अनुभव शिक्षण तुज देतो ॥ १ ॥
जगाच्या, सूत्रा हलवितो ।
जगन्नाटकी जगत्पटावर नारद नाचवितो ॥ २ ॥
कोण मी, ओळख पटवितो ।
सजीव निर्जिव जगता व्यापुन अष्टांगुल उरतो ॥ ३ ॥
आपुला, मार्ग कुठें चुकतो ।
गत काळांचा करी दीप घे साह्यक तुजला तो ॥ ४ ॥

जुना मावळी मेळा

---

# सुतानें जाऊं स्वर्गाला

चाल—( कवाली. )

सुतानें जाऊं स्वर्गाला । सांगतो कोण तुम्हाला ? ॥ धृ० ॥
बोलणें वाटतें सोपें । हृदय कां थरथरा कांपे ? ॥
कृतीनें शक्य तें बोला । सुतानें जाऊं स्वर्गाला ॥ १ ॥
करोनी दाखवी कार्य । वीर तो गाजवी शौर्य ॥
वदे ना व्यर्थ तें बोला । सुतानें जाऊं स्वर्गाला ॥ २ ॥
फुकाची तोंडपाटिलकी । फुटाणे शेवटीं फाकी ॥
चढेना हंडि शिंक्याला । सुतानें जाऊं स्वर्गाला ॥ ३ ॥
भिकेचे सुचति डोहाळे । करितसा फूट सोहाळे ॥

पूर्वींचा काळ पालटला । सुतानें जाऊं स्वर्गाला ॥ ४ ॥
फितुरी हिंद देशाला । पूजिली पांचाविला का॥
देश हा यादविनें बुडला । सुतानें जाऊं स्वर्गाला ॥ ५ ॥
जाहलें, होउनी गेलें । जगाचे रंग पालटले ॥
मार्ग शोधा तुम्ही आपुला । सुतानें जाउं स्वर्गाला ॥ ६ ॥
पराशी एकशें पांच । पदरिं बांधा गांठ हीच ॥
ओळखा नविन काळाला । सुतानें जाउं स्वर्गाला ! ॥ ७ ॥

भारत मित्र मेळा.

---

# वाढवा शारीरिक शक्ति

( चाल—सुनो सुनोजी मेरे यार. )

हे आर्य सुतांनो आज । वाढवा शारीरिक शक्ति ॥ धृ० ॥
जाहला ऱ्हास शक्तीचा । त्यामुळें घात देशाचा ।
कुणि विचार करीना ह्याचा । वाटेन कुणाला खंती ॥ १ ॥
आजला पहा हे तरुण । गालफडें गेलीं बसुन ।
अंगांत नाहि मुळींच त्राण । नाटकी ढंग आवडती ॥ २ ॥
हे दंड खूप पिळदार । मांड्याहि तशा भरदार ।
तशि छाती पल्लेदार । नर श्रेष्ठ होय तो जगतीं ॥ ३ ॥
व्यायाम तरुणवर्गाचा । संपला जोर—जोडीचा ।
मलखांब नाहि जोराचा । डंबेल्स घरोघरीं असती ॥ ४ ॥
पोहण्याचें नाहीं नांव । कुस्तींत नाहि शिरकाव ।
बोलण्यांत पट्टेराव । घोकीत बैसती शान्ती ॥ ५ ॥
जे निर्बल पंगू असती । शान्तिचा धडा गिरवीती ।
ही त्यांची साधूवृत्ती । बलवान झुगारून देती ॥ ६ ॥

पहिल्यांदां शक्ती कमवा । मग जगांत किंमत ठरवा ।
छाती न कुणी ये अडवा । दंडुका असे जर हातीं ! ॥ ७ ॥

जुना मावळी मेळा १९२४

---

# घेऊं कधीं नच विदेशी माला

(चाल—मी नववाला.)

ईश्वर साक्षी करूं शपथेला । घेऊं कधीं नच विदेशी माला ॥ धृ० ॥
परदेशांनीं लुटुनि नेले । नेऊनि धंदे पार लयाला ॥ १ ॥
अन्नासाठीं मरती ऐशा । उद्यम देऊं बंधु जनांला ॥ २ ॥
धननिधि येथिल लुप्त जहाला । सात समुद्रापार पळाला ॥ ३ ॥
सत्तायोगें भक्त जनाच्या । नयनीं घालूं प्रखरांजनाला ॥ ४ ॥
ईशा देई बल या बाला । न ढळो निश्चय पडतां घाला ॥ ५ ॥

भारतामित्र मेळा १९२५

---

# धंदा निंदा करण्याचा

चाल—हा नारायण अडला.

हा मेळेवाल्यांचा, धंदा निंदा करण्याचा ॥ धृ० ॥
देशभक्तिनें प्रेरीत होऊन  मेळे प्रथम निघाले ॥
आज त्यांतले चटोर कांहीं  मेळेवाले बनले ॥ १ ॥
पहा स्त्रियांची निंदा करण्या  यांची जिव्हा स्वैर ॥
पदें तयांचीं निवळ शिमगा  थुः त्यांच्यावर ॥ २ ॥
नाटयमंडळ्या जशा एकिच्या  फुटुनि होती दोन ॥
तोच मासला या मेळ्यांचा गेला धंदा बनुन ! ॥ ३ ॥

पुस्तकविक्री तशी विदागी  बरेच पैसे जमती ॥
शेवट हातीं ससा जयांच्या  तेच पारधी बनती । ४ ॥
सहजच मग त्या मेळ्यामाजीं  दोन पक्ष होणार ॥
पैसेखाऊ शिष्ट शिरोमणी  शिव्या देत बसणार ॥ ५ ॥
दारू पीती माजुम खाती  भांग लागते रोज ॥
उपदेश दुजाला करावयाला ह्यांस न वाटे लाज ॥ ६ ॥
एकिकडे हे म्हणविति आपणा  स्वराज्यपार्टीवाले ॥
कट्टरपक्षा आंतुन सामिल  डोंबकावळे ठरले ॥ ७ ॥
आंत निराळें बाहेर दुसरें  जसे भाटिचे दांत ॥
तद्वत् दादा मेळेवाले  बोल करिति हे सार्थ ॥ ८ ॥
मेळ्यामेळ्यामधील स्पर्धा  कळसा जाउन भिडली ॥
वेळिंच सावध, जोंवर नाहीं  ठोकाठोकी झाली ! ॥ ९ ॥

-खुद्द नगरकर मेळा १९२४-

---

# धन्य तव कुसवा

(चाल—भगवान् भुवन कल्याण.)

हे महाराष्ट्रभूमी । धन्य तव कुसवा ॥ धृ० ॥
तुझ्या कीर्तिचा यशोदुंदुभी । दिगंत गर्जावा ॥ १ ॥
वीरसुतांचा अतुल पराक्रम । डंका वाजवा ॥ २ ॥
हरिनामाचा परागपरिमल । दर्वळुनी जावा ॥ ३ ॥
हरिभक्तांची धर्मपेरणी । दुष्काळ न ठावा ॥ ४ ॥
तव दुहितांच्या सतीप्रभावें । हरि धावुनि यावा ॥ ५ ॥
कर्मभूमि तूं वाण न कसली । जगीं तुझा हेवा ॥ ६ ॥

-जुना मावळी मेळा १९२४.

# स्वराज्यतोरण उभें करा !

( चाल--आनंदीआनंद गडे )

वदतो टिळकांचा दौरा । स्वराज्यतोरण उभें करा ! ॥
चाल पैसा ज्यांचा । हक्क तयांचा । देश आमुचा ।
होमरूलचा पंथ धरा । स्वराज्यतोरण उभें करा ! ॥ धृ० ॥

उत्तर हिन्दुस्थानांत । दिल्लीआग्रा मथुरेंत
खानदानिच्या देशांत । झडली स्वराज्य नौबत
खुशाल झोपा काढाल । देशभूमिला बुडवाल
धराल बुद्धीभेद उरीं । मारिल देशा हीच सुरी
चा० पैसा ज्यांचा । हक्क तयांचा । देश आमुचा
वदतो टिळकांचा दौरा । स्वराज्यतोरण उभें करा ! ॥ १ ॥

पवित्र भावना ठेवावी । फळें मधुर मग चाखावीं
सर्व प्रेरणा ईशाची । दिशा रोखली कार्याची
निष्ठा स्वदेशभक्तींत । स्वराज्य अंतःकरणांत
कर्तव्याच्या नगरींत । लोक उपाशी मरतात
तुझेंच सारें तुजपाशीं । परि तूं जागा चुकलाशी
चा० पैसा ज्यांचा । हक्क तयांचा । देश आमुचा
वदतो टिळकांचा दौरा । स्वराज्यतोरण उभें करा ! ॥ २ ॥

ससा जयाच्या हातांत । त्याशि पारधी म्हणतात
स्वराज्य ज्यांनी कमाविलें । स्वराज्य ज्यांनीं चालविलें
त्यांचे वंशज विचारिती । स्वराज्य शिकवा आम्हाप्रति
मानव नाहीं पशू कसे । शपूटें कोठें दिसत नसे ।
स्वराज्य तुमचें आजि नसे । म्हणून पडलें गूढ असे ।
चा. पैसा ज्यांचा हक्क तयांचा । देश आमुचा ।

वदतो टिळकांचा दौरा । स्वराज्यतोरणा उभें करा ! ॥ ३ ॥
देह जाहला जीर्ण जरी । आपुलीं कार्ये तरुण तरी ।
आत्मिक बल करि देव नरा । प्रयत्नमंदिरं उभें करा ।
दैव लंगडें कधीं नसे । यत्ना अंतीं सिद्धि असे ।
आत्मत्वा जो ओळखतो । नरका नारायण होतो ।
श्रद्धा कर्तव्यीं ठेवा । स्वराज्य मेवा मग खावा ।
चा. पैसा ज्यांचा हक्क तयांचा । देश आमुचा ।
वदतो टिळकांचा दौरा । स्वराज्यतोरण उभें करा ! ॥ ४ ॥
भारत भूच्या पुत्रांनो । भारतभूच्या भक्तांनो ।
मी तूं ऐसा भेद त्यजा । होमरूलचा देव भजा ।
पांच एकशे करु गणती । कौरव पांडव एक मति ।
सान मोठा भेद नसे । कार्य आपुलें एक असे ।
स्वतंत्रतेच्या भाग्याचीं । हींच भूषणें मातेचीं ।
मंगल प्रभातसमयाला । होमरूलचा जय बोला ।
चा. राम कवीची स्फूर्ति । बाला सांगे सकला ।
हांक मारिते वसुंधरा । स्वराज्यतोरण उभें करा ! ॥ ५ ॥

---

# मस्तानी ठेवा–पण ?

( श्लोक. )

बाजीराव समस्त होउ बघती मस्तानि ठेवावया ।
कोणालाहि नकोत कष्ट समरीं युद्धांत सोसावया ॥
घ्या हातीं शिर व्हा तयार मरणा शौर्यें लढा संगरीं ।
संपादून यशा खुशाल मग जा मस्तानिच्या मंदिरीं ॥ १ ॥

---

# लोकशाहीची आरती

जयदेव जयदेव जय लोकशाही ।
अगाध महिमा तुझा तोड जगीं नाहीं ! ॥ धृ० ॥

तुझ्यापुढें तो नमला रशियाचा झार ।
चीं चीं करितचि आला जर्मन कैसर ॥
बेलजम फ्रेंचानाही केलें जर्जर ।
बल्गार, ग्रीस, रुमानी तुजपुढती पोर ! ॥ १ ॥

तशीच टर्किची ही वाताहत झाली ।
राजशाहिची गुर्मी तुजपुढती नमली ।
दुबळ्या दीन प्रजेला आहेस तुं वाली ।
म्हणूनी प्राणप्रतिष्ठा आम्ही तव केली ! ॥ २ ॥

औरंगजेबही पापी गर्वानें फुगला ।
शिवबाकडुनी त्याचा इंगा जिरविला ॥
महाराष्ट्राचा धर्म रक्षण करण्याला ।
शूर वीरांचा तांडा येथें पाठविला ! ॥ ३ ॥

मराठेशाही गेली तैशी पेशवाई ।
ठाणें देऊन बसली इंग्रज कारवाई ॥
त्यांची नोकरशाही येथें जी आली ।
जुलूम अन्यायाची परमावधि केली ! ॥ ४ ॥

आमुचे असुनी नाहीं काडीभर सत्ता ।
ह्यांच्या जैशी कांहीं बापाची मत्ता ॥
काय काय तरि सांगूं होइल भारूड ।
ह्या जंजाळांतुन आतां लौकर गे सोड ! ॥ ५ ॥

जेव्हां सरली सद्दी आमुच्या भाग्याची ।
तेव्हां पाळी आली भिक्षांदेहीची ॥
सुवर्णभूमी आमुची निष्कांचन झाली ॥
तुजविण आतां नाहीं कोणीही वाली ! ॥ ६ ॥
तुझ्या जिवाचा कलिजा तान्हा शिव बाजी ।
समर्थ गुरुचा होवो अवतार आजी ॥
टिळक श्रीगुरुचा चेला रामशाहीर ।
लोकशाहिची नौबद बडवित राहणार ! ॥ ७ ॥

विद्यार्थीमंडळ मेळा १९२३.

५०४ काव्य

ठाणे
३८६१

# पूना प्रिंटिंग
# एजन्सी

आम्ही हरतऱ्हेचीं टाइपाचीं व लिथोचीं कामें
बुकवर्क्स, लेटर फार्म, बिल बुकें
वगैरे किरकोळ कामें
लिथोचीं लेबलें

पोस्टर वर्क्स वगैरे स्वस्त दरांत व सुबक करून देऊं.
तसेंच निरनिराळ्या फॅशनची लेटरहेड
-डिसाइन्स-तयार करून त्यांचे
लाइन व हाफटोन ब्लाक्स
तयार करून देऊं.

## जे. गोपाळ आणि कंपनी

८५४ सदाशिव पेठ पुणें शहर.

दि इंपीरियल कॉक अँड पॉट
मॅन्युफॅक्चरिंग कंपनी

चव्हाण यांचे कारखान्यांत तयार झालेले

पेंचाचे लोटे—
—सांगली तपेल्या—
—चटणी पात्रे

वगैरे माल गिऱ्हाईक पसंत करतात—घेतात—वापरून
खुष होऊन—आपल्या मित्रमंडळीस—

चव्हाण यांचींच भांडीं वापरण्याविषयीं
शिफारस करतात !

बी. के. चव्हाण, रविवार पेठ पुणें

# पूना प्रोसेस ब्लाक वर्क्स.

येथें फोटोवरून व डिझाईनवरून झिंकचे व कॉपर-प्लेटचे लाईन व हाफटोन दोन कलरचे ब्लाकस उत्तम करून मिळतील व ओरिजिनल ड्राईंग्ज व डिझाईन्स करून वेळेवर मिळतील.

५३४ सदाशिव पेठ, पुणें शहर,

---

# आर. जी. पोतनीस फोटोग्राफर.

आम्हीं फोटोची व फोटो एनलार्जमेंटचीं कामें सुबक करून देऊं.

५३४ सदाशिव पेठ, पुणें शहर.

फुकट ! आपलें आवडतें वर्तमानपत्र फुकट !!

टाईम्स, डेलिमेल, क्रॉनिकल, नवाकाळ

केसरी, ज्ञानप्रकाश वगैरे

जास्त माहितीकरितां लिहा अगर समक्ष भेटा

पत्ता भारत स्टोअर्स आणि कंपनी

किराणा भुसार स्टेशनरी व कोळशाचे

व्यापारी व वर्तमान पत्राचे एजंट

डेक्कन जिमखाना मार्केट

पुणें नंबर ४

# सुप्रजोत्पत्ति शास्त्र अथवा दांपत्य रहस्य

अभिप्राय—डॉ. भाजेकर F. R. C. S व डॉ. केळकर M. S ग्रँट मेडिकल कॉलेज बॉंबे. डॉ. खेर B. A. M. D. चीफ मेडिकल ऑफिसर नागपूर पायोनियर इन्शुअरन्स कंपनी नागपूर ' सुशिक्षित तरुण स्त्री पुरुषांस अत्यंत उपयुक्त असें हे प्रयत्नपूर्वक लिहिलेलें 'दांपत्यरहस्य' पुस्तक आपल्या आयुष्यांतील दांपत्य धर्मासंबंधी सर्व माहिती मिळविण्याची इच्छा असलेल्या केवळ मराठी वाचकांकरितां मार्गदर्शक आहे. "

पत्ता ८८४ सदाशिव पेठ पुणें शहर } डॉ. एम. एन. भागवत कर्जतकर H. M. V. F. C. H. I. गोल्ड मेडॅलिस्ट

डोळे अती थंड तेजस्वी व टवटवीत ठेवण्याकरितां

पोरवाळ नेत्रांजन

एजंटस पाहिजेत. सर्वत्र मिळते.

पोरवाल अँड को पुना सिटी.

—आजकाल पुण्यांत—

# आमच्या स्पेशल " टी " चीच प्रसिद्धी कां ?

आम्ही ज्या उत्तमोत्तम चहाचें मिक्श्चर वापरतों तसला भारी चहा कोणीच वापरीत नसून त्यांना चहाचें मिक्श्चर करण्याची हातोटीही पण मुळींच साधली नाहीं. त्यामुळें कोणी कितीही जरी नक्कल केली तरी नक्कल ती नक्कलच तिला अस्सलाची सर कशी येणार?

## गिऱ्हाइकांचे सोईकरतां

विक्रीस तयार ! विक्रीस तयार !!

## सुप्रसिद्ध स्पेशल टी मिक्श्चर.

एकच वेळ वापरा, म्हणजे चहाची लज्जतदार खुमारी कशी असते—हें अनुभवानें कळेल.—

नंबर चहा मिक्श्चर
१ ... " "
२ ... " "
३ ... " "
४ ... " "

शेकडों लोकांकडून आमच्या चहाची बोलबाला होत आहे. गिऱ्हाइकांची पसंती हेंच आमच्या मालाच्या चांगुलपणाचें सर्टिफिकिट.

शिवाय लिपटन, ब्रुक बॉन्ड, स्टेन्स, पीकोडस्ट, पीकोसूचांग व कांगो वगैरे कंपनीचे सर्व प्रकारचे लहान मोठे डबे, व पुडे विकत मिळतील. तसेच सुटा चहा पत्ती व डस्ट उत्तम प्रकारची मिळेल.

**पत्ताः—सुप्रसिद्ध स्पेशल "टी" चें दुकान**

पुणें सदाशिव नं. ६०९ मालकः—गोविंद रामचंद्र जकाते.

# दानधर्माचीं सूत्रें

१ अज्ञान मुलांना विद्यादान करा.
२ क्षुधितांना अन्नदान करा.
३ थंडींत गारठून जाणाऱ्यांना वस्त्रदान द्या.
४ असहाय्य लोकांना सांवलीची जागा द्या.

## असें केल्यानेंच

प्रत्येक पै व धान्याचा प्रत्येक कण

## सत्कारणीं व सत्पात्रीं

लावल्यासारखें होईल.
मूठभर धान्यापासून तों स्वतःची
सर्व मालमत्ता देणाऱ्या

## मनानें श्रीमंत

अशा स्त्री–पुरुषांपैकीं तुम्ही एक आहां !
अनाथांची आठवण ठेवा.

पुणें अनाथ विद्यार्थी गृहाची

# महाराष्ट्र डायरी १९३०

(१) मोठी बुक साईझ. (२) मध्यम बुक साईझ. (३) पॉकेट साईझ.
कापडी—कागदी.
कोर्टाचीं कामें, जमाखर्च, इ० सर्व कामांस उपयोगी
डायरीचे सद्गुण-गुळगुळीत न फुटणारा कागद, मजबूत बांधणी,
सर्व प्रकारची माहिती, बेताची किंमत व स्वदेशी कागद.
कमिशनबद्दल माहिती मागवा.

## जाहिराती छापणें असल्यास लवकर पाठवा.

---

पुणें अ. वि. गृहाचें

# कॅलेंडर—मराठी व गुजराथी

ठळक मोठ्या तारखा, हिंदू तिथि, सण इ. माहिती.

## ऑफिसमध्यें अथवा स्वयंपाक-घरांत

कोठेंही लावा. उपयोगी होईल.
प्रत्येक पानावर एक स्वतंत्र फोटो

किंमत ४ आणे.

…णें अ. वि. गृह—पुणें व नाशिक.

REFBK-0003961

# श्री सरस्वती वाङ्मय-ग्रंथमाला.

पुढील पुष्पें

1. १ राजर्षि विश्वामित्र चरित्र — १-१-०
2. २ श्री परशुराम चरित्र—श्री. म. माटे — १-०-०
3. ३ लो. टिळक चरित्र—श्री. ग. वि. केतकर सहसंपादक केसरी. — १-०-०
4. ४ कूपमंडुक—( सामाजिक कादंबरी, ) ग. त्रिं. देसाई, बी ए. — १-०-०
5. ५ निर्व्याज प्रेम—श्री. स. कृ. बहुलीकर — १-०-०
6. ६ खुनी कादंबरीकार—श्री.य. गो. जोशी — १-०-०
7. ७ खुळा पदवीधर—( ले. पदवीधर ) — १-०-०

सोयीप्रमाणें अनुक्रम नंबर पुढेंमागें होईल.

व्यवस्थापकः— यशवंत गोपाळ जोशी

प्रकाशकः—महाराष्ट्र पब्लिशिंग हाऊस, लि.
१२ बुधवार, पुणें.